# मिरा भाईंदर महानगरपालिका

**महापालिका सभागृह कार्यालय,**
**तिसरा मजला,**
**दि. ०१/०६/२००७**

आज दि. ०१/०६/२००७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. २२/०५/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ७) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ८) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ९) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १०) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ११) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १२) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य़ |
| १३) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १४) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १५) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १६) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १७) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १८) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १९) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २०) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २१) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २२) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २३) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| २४) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २५) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २६) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २७) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २८) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २९) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३०) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३१) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३२) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ३३) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ३४) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३५) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ३६) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३७) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३८) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ३९) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४०) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ४१) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४३) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| ४४) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४५) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ४६) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४७) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ४८) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ४९) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५०) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५१) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५२) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५३) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| ५४) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५५) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५६) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५७) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५८) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५९) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६०) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६१) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६२) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६३) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६४) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ६५) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६६) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ६७) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ६८) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ६९) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| ३) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ५) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ६) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७) | श्री. म्हात्रे परशुराम पद्‌माकर | सदस्य |
| ८) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |
| ९) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| १०) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ११) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| १२) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज दिलेले सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |

(सर्वांनी राष्ट्रीयगीतासाठी जागेवर उभे रहायचे आहे.)
(राष्ट्रीयगीत वंदे मातरम् नंतर महासभेला सुरुवात झाली.)

**मा. महापौर :-**

नमस्कार, महानगरपालिकेच्या सभागृहात आज दि. १ जून २००७ च्या सभेला उपस्थित असलेले या शहराचे उपमहापौर, मा. चंद्रकांत वैतीजी, मा. आयुक्त सुदामराव गायकवाड साहेब, सभागृह नेते मा. हॅरल बोर्जीस स्थायी समितीचे मा. सभापती स्टिवन मेंडोसा, विरोधी पक्षनेते सन्मा. परशुराम पाटील साहेब, सर्व पक्षाचे सन्मा. गटनेते, सर्व प्रभाग समितीचे सन्मा. अध्यक्ष, सर्व समित्यांचे सन्मा. सभापती, सर्व नगरसेवक व नगरसेविका, महापालिकेचे सचिव हरेश पाटील, सर्व सन्मा. उपायुक्त, सर्व खात्याचे अधिकारी वर्ग, सर्व वृत्तपत्राचे गॅलरीत बसलेले प्रतिनिधी, प्रेक्षक गॅलरीतील सर्व नागरिक बंधू आणि भगिनीनो आपल्या मिरा भाईंदर शहरातील काही व्यक्तींनी आपल्या मिरा भाईंदर शहराचे नावलौकिक वाढवलेले आहे. याचा आपणा सर्वांना अभिमान आहे. डॉ. श्री. सुभाष रामचंद्र सोनंदकर व डॉ. रजनी सुभाष सोनंदकर हे दोघेही आहे ता. शहापूर जि. ठाणे व गरुडेश्वर ता. इगतपूरी जि. नाशिक या दोन आदिवासी गांवात गेले १५ वर्षापासून मोफत वैदयकीय शिबिर भरवून रुग्णसेवा करित आहेत. त्यांचे हे समाजकार्य अत्यंत अभिमानस्पद आहे. सदर व्यक्ती मिरा भाईंदर शहराचे नागरिक असून यांनी केलेल्या कार्याबद्दल सभागृहाच्या वतीने तसेच शहरातील नागरिकांच्या वतीने त्यांचे मी अभिनंदन करुन सत्कार करणार आहे. आजच्या सभेत महत्वाचे विषय आहेत त्यावर खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा करुन सचिव सभेला सुरुवाज करावी.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, मी तुमचं या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, आपल्या शहराचे या सभागृहाचे मा. उपमहापौर साहेब हे खाली येवून बसलेले आहेत त्यांची डायसवरची खुर्ची रिकामी आहे. तर मी मा. उपमहापौर साहेबांना विनंती करतो की त्यांनी डायसवर बसावे.

**मा. महापौर :-**

सन्मा. उपमहापौर चंद्रकांत वैती साहेब कृपा करुन आपण डायसवर येवून बसावे.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, आता जी ही सभागृहात चर्चा चालू आहे की मी खाली येवून का बसलो. कारण सन्मा. सभागृहात मागच्या वेळेला सभा लावलेली होती तर त्या अजेंडावर मी पाण्याबाबत विषय घेतलेला होता आणि त्यावर चर्चा ही केली होती. पण त्याच्यावर काही निर्णय लागला नाही. याबाबत काही विषय सभागृहात पण आलेले आहे. या विषयात मा. महापौर, मा. उपमहापौरांची चर्चा होत असताना आपण कुठल्याही विषयावर चर्चा केली नाही. आणि मी आणलेल्या विषयावर ही सुद्धा चर्चा केली नव्हती. त्याच्यावर आपण रुलिंग दिले होते की आपण या विषयासाठी विशेष सभा लावू. तर ती विशेष सभा ही लावली नव्हती. तरी मी आपण दिलेल्या सुचनांचा परवानगीचा विरोध करतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. मा. उपमहापौर साहेब मी सगळ्यांच्या वतीने कॉंग्रेस पक्षाच्यावतीने राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने सर्व पक्षाच्या वतीने मी विनंती करतो की, कृपया करुन आपण डायसवर बसावे. आणि तशीच सभागृहाची ही विनंती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आता या सभागृहामध्ये जे प्रश्न उपस्थित केलेले आहे तर मी सुद्धा एक प्रश्न उपस्थित करु इच्छितो की आपल्या या शहरामध्ये काय चाललेले आहे. आपल्या या शहरामध्ये नागरिकांचा मृत्यू होतो. तर आपण महापौर या नात्याने काय केले. या शहरात काय चाललेले आहे. शहरामध्ये काही लोकांना डेंग्यू झालेला आहे. हे सुद्धा तुम्हांला माहित आहे का?

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य ओमप्रकाश गाडोदिया यांनी जे वक्तव्य केलेले आहे. त्याच्याशी मी सहमत आहे. कारण, आमच्या येथे सुद्धा मृत्यू होतात. मी ह्या बद्दल ही सुचना दिलेली होती की या शहरामध्ये काही लोकांना डेंग्यू झालेला आहे. तर आपण ह्याच्यावर काय उपाय केला?

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांचे अभिनंदन करायला पाहिजे कारण यांनी मा सभागृहामध्ये हा विषय आणल्यामुळे .......

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण खाली बसून घ्या. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल खाली बसून घ्या. सन्मा. सदस्य एकेकांनी बोलावे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये हे काय चाललेले आहे. येथे लोकाच्या हिताचा विषय घेतलेला आहे, तर त्या वरती चर्चा करायला सांगा ना. आणि आपण ही जी चर्चा झालेली आहे ते कामकाजातून वगळून टाका आणि पुढील कामकाजाला सुरुवात करा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सेवा नियमावर मा. उपमहापौर साहेब यांना बोलू दया कारण त्यांनी तो विषय आणलेला आहे तर त्यांना बोलण्याचा अधिकार आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, मला ही ह्या विषयाबद्दल बोलायचे आहे. तर मी आपल्या परवानगीने बोलतो. हा जो विषय आलेला आहे हा नागरिकांच्या हिताचा विषय आहे. आणि हे जे विषय आहे हे सुद्धा शासनाचे विषय आहे. महापालिकेच्या संबंधितांचे नाही का? येथे अजेंडयामध्ये महत्त्वाचे विषय दिलेले आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, आपण जे निवेदन केले होते की तो विषय अजेंडावर आणा तर हा विषय आम्ही सभागृहासमोर घेतला. मागे आम्ही सेवा नियमाबद्दल बोललो होतो. याचा प्रस्ताव ही झालेला आणि मागच्या मा. महासभेत घेतलेला होता आणि मी पाण्याचा ही विषय काढलेला होता. आपल्या शहरात जास्त पाणी कधी आणणार. तर आपण निवेदन केले होते की या शहरामध्ये ३५ एम.एल.डी. पाणी आणणार म्हणून मग पाणी अजून का आणले नाही?

**मा. महापौर :-**

३ मे २००७ रोजी मा. उपमहापौरांनी काही महत्त्वाचे विषय अधिकाऱ्यांनी काढून ह्या विषयांवर गोषवारा मिळावा म्हणून मागणी केली होती आणि ते विषय या पटलावर घेतले होते. ३ मे २००७ च्या बाबतीत मी सुद्धा दोन दिवसांपूर्वी चर्चा केली होती. त्यावेळेस मा. उपायुक्त श्री. बालाजी खतगांवकर साहेब उपस्थित होते. सचिवांना सुद्धा हे विषय दाखवले होते. त्यामुळे १७ मे २००७ रोजी नालेसफाई, घनकचरा हे विषय विषयपटलावर घेण्याची गरज नाही. पुन्हा सर्व करुन शहरातील माझे काम करुन तोच विषय पुन्हा महासभेपुढे आणला आहे. सन्मा. सदस्यांनी फुकटचा गैरसमज पसरवू नये. त्यांना आणि शहरातील सर्व नागरिकांना सेवा देणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. एस.ई.झेड. चा विषय हा सुरुवातच होवू शकत नाही. मागील सभेमध्ये ह्या योजनेमुळे लोक गेले तेव्हा सदस्यांनी हा विषय घ्यावा असे सांगितले म्हणून रुलिंगप्रमाणे हा विषय सभागृहापुढे काढलेला आहे. गेल्यावेळेस हा विषय काढला होता. तेव्हा आपल्याला याचे महत्व समजले असते तर आपण सहकार्य केले असते. विषय पटलावर मा. महापौरांनी विषय नसेल तर कुठला विषय काढायचा. हे पुन्हा तोच विषय या सभागृहापुढे आणलेला आहे. प्रशासनाने दिलेला विषय सभागृहात काढलेला आहे. मा. उपमहापौरांना माहिती आहे. आपण चर्चेला विषय आणलेला आहे. आपण सर्वांनी सहकार्य करावे. आपल्याला आवश्यक वाटतील ते विषय आपण घ्यावेत.

**मिलन पाटील :-**

हे गेल्या पाच वर्षापूर्वीचे आहेत. तुम्हांला दोन वर्षे पूर्ण झाली तेव्हा तुम्हांला वाटले नाही. आत्ता इलेक्शनला काही दिवस असताना आपण हा विषय काढलेला आहे. हा माझा आरोप आहे.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

खाली बसले त्यांचा निर्णय लावा. ते एक पदसिद्ध सदस्य आहेत.

**रतन पाटील :-**

दिनाकं ११/०५ रोजी मी एक पत्र दिले होते. आपली निवडणुक करताना आपणामुळे महानगरपालिकेचे उपयोग दिले त्या सेवेप्रत आपण रस्ता केलेला आहे. मी वेळोवेळी प्रश्न करुन आपण त्यावर रुलिंग देवून काही कार्यवाही झालेली नाही. आपल्याला खरोखरच या रस्त्याचे वाटत असेल तर हा करावा. आपण या रस्त्याचे काय करणार आहात?

**मा. आयुक्त :-**

मा. स्थायी समितीमध्ये आपण निर्णय घेतला होता. त्या स्थायी समिती सभेमध्ये आपण उपस्थित होते. त्याच्यामध्ये त्यांनी मान्य केले होते. एक महिन्याच्या मुदतीत त्यांना दंड केलेला आहे. अतिक्रमण विभागामार्फत कार्यवाही केली जाईल. त्याच्यावर जेवढे अतिक्रमण असेल ते काढण्यांत येईल. असे मी सभागृहाला आश्वासन देतो.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांनी त्यावर रुलिंग दयावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण वक्तव्य केले. आपण जो निर्णय घेणार तो योग्य आहे. त्याठिकाणी जे टेम्पो उभे राहतात. तर आपल्या प्रशासनाला जर काढता येत नसेल तर आपण आर.टी.ओ. ला दया. गाडया काढून घ्यायच्या असेल तर त्या माणसांचा विचार करायला पाहिजे की गाडया ठेवण्यासाठी जागा आहे का? रस्त्यावर गाडया नाहीत. तुम्ही आर.टी.ओ. ला कळवा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. संबंधित विषयावर सन्मा. आयुक्तांनी खुलासा केला. तर त्यांनी आपल्या जागेवर बसून घ्यावे.

**शशिकांत शहा :-**

मा. महापौर मॅडम साहब ने चार बार मिटींग बुलाया।

**मिलन पाटील :-**

पुढच्या मिटींगमध्ये याचा निर्णय झाला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज पाच साल से ना फेरिवाला क्षेत्र का विषय चल रहा है।

**अजित पाटील:-**

सन्मा. सदस्य श्री. शशिकांत शहा ह्यांनी आज प्रश्न उपस्थित केला. पाच वर्षामध्ये अनेक वेळा सभा झाल्या. पण याच्यावर निर्णय झाला नाही. फेरिवाल्यांसाठी उद्याच सभेची मागणी करावी.

**रोहित सुवर्णा :-**

फेरिवाले आणि टपऱ्या हा विषय मागील पंधरा वर्षापासून प्रलंबित आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परवाना विभागाने परवाने दिलेले आहेत. त्या टपऱ्या दुसऱ्या जागेवर हलवण्याची कार्यवाही करा. फेरिवाल्यांना उचलून या ठिकाणी हलवणार असे सांगतात. मग मात्र असे होत नाही. सदर बाबतीमध्ये महाराष्ट्र शासनाचा निर्णय होता. त्याचा पहिल्यांदा स्पष्टीकरण करा. दुसरा नगरसेवक त्यांच्या बाजूने बोलतो. फेरिवाला झोन आणि ना फेरिवाला झोन, त्याच्यामध्ये प्रशासनाची कुठली जागा आहे ते तुम्ही सांगाल की नाही? एकावर अन्याय करायचा आणि एकाच्या फायदयासाठी काम करुन घ्यायचे. हे सुद्धा आपण लक्षात घेवून कार्यवाही करा.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बोलतो. मला फेरिवाल्यांबाबत बोलायचे आहे. बऱ्याच वर्षापासून आपल्या येथे जॉईन्ड ला लागून इमारत आहे ते आपल्या प्रशासनाने पाहिले देखिल नाही. प्रशासनाला आपले ऐकायचे नाही का? आमचे काँग्रेसचे सन्मा. नगरसेवक शशिकांत भोईर साहेबांनी सुद्धा अर्ज दिलेला होता की फेरिवाल्याचे हटवणार की नाही कारण आम्हांला तिथे त्याची आवश्यकता नाही. कारण तेथे हजारो लोक अर्ज देतात. ह्याच्याबद्दल स्टॅण्डींग कमिटीमध्ये ते सदस्य म्हणून आहेत. तर तुम्ही तिथे ना फेरिवाला क्षेत्र कशी हटवणार?

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी तुम्हांला सांगतो की काय आहे. सगळे फेरिवाले भाईंदरमध्ये आलेले आहेत. आणि येथे येवून ते धंदा करतात. तर इथे बाजार बसवतात आणि येथे सगळे नविन माणसे येवून धंदा करायला बसतात. जेव्हा येथे संपतराव शिंदे साहेब होते तेव्हा व्यंकटेश पार्कच्या समोर सुद्धा हाकलून लावले होते. तेव्हा ते येत नव्हते. आणि आता ते परत येतात तर तुम्हांला त्याच्याबद्दल वेळही नाही.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, स्थायी समितीमध्ये सुद्धा हा विषय घेतलेला होता. तर त्याच्यावर काहीही इम्प्लीमेंट झाली नाही. तर त्याच्यावर अजून कारवाई झाली नाही. तर तुम्ही हे सामावून घ्या. आणखिन एक सर्व्हिस रोडबाबत काय झाले. कारण सदरचा विषय हा बांधकाम विभागाबद्दल होता तर त्याच्यावर कारवाई करा आणि आपण रुलिंग दिली होती की ह्याच्यावर इंम्प्लीमेंट झालेले आहे तर प्रशासनाने आम्हांला सांगावे.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, सिल्व्हर पार्क, विजय पार्क जांगिड व्ह्यू ह्याचे देखील मी आपल्याला पत्र दिलेले होते. तर ते नक्की होईल का? आणि जर ते झाले तर आपल्या अधिकाऱ्यांवर कारवाई काय करणार?

(सभागृहात गोंधळ)

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर मध्ये राई गावात मोठा अपघात झाला आणि त्याच्यात तीन चार लोक जखमी झाली. तर तुम्ही मा. आयुक्त साहेब मा. उपमहापौर आपण जावून तेथे पाहणी केली का? आणखीन दुसरी गोष्ट म्हणजे जे लोक मयत झाले त्यांच्या कुटुंबांना आपल्या महापौर निधितून काही मदत मिळेल का? आणि जर मिळत असेल तर ती मदत आपण करावी. अशी मी आपल्याला विनंती करतो.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, त्यांच्याशी मी ही सहमत आहे.

**शशिकांत शहा :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या जैन मंदिराच्या येथे बाजार बसतो. फेरीवाला क्षेत्र आणि ना. फेरीवाला क्षेत्रात बसतात. कारण आम्हाला मंदिरात जायला होत नाही. तिथे खुप गर्दी असते. तर अतिक्रमण विभागाने तिथे जावून पाहणी करून ते हटवून टाकावे. अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा. महापौर :-**

फेरीवाला क्षेत्र आणि ना. फेरीवाला क्षेत्राबद्दल आपण धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आपण एक समिती गठीत केली. अजुन पर्यंत कुठल्याही प्रकारचा निर्णय झालेला नाही. हा विषय मा. महासभेत यावा अशी सर्व सदस्यांची अपेक्षा होती. पण तोपर्यंत आपण सभागृहात चर्चा केली असताना अशी मागणी केली. या सभागृहात आपण अशी रूलिंग देउ आणि ना. फेरीवाला क्षेत्र ज्याठिकाणी आहे. ते त्या ठिकाणाहुन हटवण्यात यावे.

**अजित पाटील :-**

मा. पिठासिन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो फेरीवाला क्षेत्र आणि ना फेरीवाला क्षेत्र संदर्भात २००३ मध्ये नेमलेले होते. याच्यात नागरिकांची ही सुचना होती आणि याचा अहवाल मा. आयुक्त साहेबांनी दिलेला होता व हा अहवाल स्थायी समितीमध्ये सुद्धा ठेवण्यात आला होता. स्थायी समितीने हा अहवाल दि. ०६/११/०४ रोजी मंजुर केलेला होता मा. महासभेमध्ये सभासदांची सुचना ही होती. की महापालिकेमध्ये समाविष्ट करून घ्या. दि. ०६/११/०४ ते २००६ पर्यंत त्या सुचनेमध्ये निर्णय दिलेले होते. या समितीत सर्व अपेक्षित गटनेते, सभागृह नेते मा. उपमहापौर यांची समिती गठित करण्यात आली व ही समिती गठित केल्यानंतर तीन बैठकी ही बोलावली होती आणखिन मा. महापौर, मा. उपमहापौर असताना सुद्धा एक बैठक झाली. तर भाईंदर पुर्व भाईंदर पश्चिम या भागामध्ये सुद्धा ५ सभासद सदस्यांचा औद्योग झालेले नाही. तर गोषवाऱ्यामध्ये अहवाल सादर केलेला आहे. तर हा अहवाल मा. महासभेमध्ये सादर करावा लागेल.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहाला मी विनंती करतो फेरीवाला क्षेत्राबाबत जे निवेदन केलेले आहे. सन्मा. सदस्य गटनेत्यांनी सुद्धा निवेदन केलेले आहे. त्या बाबतीमध्ये आपण सजेशन द्यायचे होते. त्याबाबतीमध्ये बैठक घेण्याची आवश्यकता होती व ती बैठकसुध्दा बोलावली होती. पण त्या बैठकीमध्ये मा. महापौर मॅडम उपस्थित नव्हत्या. तर मग स्थायी समिती महापालिकेने निर्णय घेतले ते सगळे ठराव एकत्रित करून घेण्याची आवश्यकता आहे. मग केलेला प्रस्ताव हा मा. महापौरांना निवेदन करावे व संबंधित बैठक घेतल्यानंतर त्याचा गोषवारा सादर करण्यात यावा.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, एकदा गटनेत्यांनी ह्या बद्दल चर्चा केली होती आणि हा विषय स्टँडींगमध्ये सुद्धा घेतलेला होता व त्याच्यावर चर्चा ही झाली होती. त्या बद्दल आपल्याला पत्र ही दिलेले होते आणि आपण चर्चा ही केलेली होती. तर त्याच्यावर कारवाई करायची आहे कारण मा. महासभेचे निर्णय आहेत. अजित पाटील साहेब हल्ली ना फेरीवाला क्षेत्रामध्ये बाजार बसलेला आहे. तर तुम्ही जावून तिथे पाहिले का? मिरा रोडच्या बाजारामध्ये सुद्धा काही लोक येवून बसतात. सोमवारचा बाजार, शनिवारचा बाजार देखील भरतो. तर मी आपल्याला सांगितले होते तर तुम्ही तो बाजार हटवायला गेले होते का? आपण जेव्हा त्यांच्या टपरी, माल, गाड्या वगैरे उचलतो तेव्हा ते न्हायला येतात तेव्हा आपण २५०० रू. दंड लावत असतो. आणि ते लावताना फेरीवाले बोलतात की आम्ही पुन्हा लावणार नाही पण ते तिथे गाड्या पुन्हा लावतात.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, स्टँडींगला मी स्वतः सदस्य होतो. तेव्हा हा विषय स्टँडींगमध्ये घेतला होता. त्यावेळेला निर्णय झालेले होते. केंद्र सरकारच्या फेरीवाला क्षेत्रात आणि ना फेरीवाला क्षेत्रात हे निर्माण केले होते. त्याचे सुद्धा करण्यात आलेले आहे. त्याबद्दल ठराव ही झालेला होता. त्यानंतर मा. महासभेमध्ये सुद्धा ठराव झालेला त्यानंतर तीन ठराव झालेले की हा ठराव सुद्धा तुम्ही नक्की करा.

(सभागृहात गोंधळ.)

**मा. महापौर :-**

ना फेरीवाला क्षेत्र आणि फेरीवाला क्षेत्र याबद्दल आपल्या सुचना सुचविलेल्या आहेत. त्या संबंधित व अतिक्रमण विभाग, सन्मा. आयुक्त साहेबांनी यांच्यावर कारवाई करण्यास सुरूवात करावी व सन्मा. सदस्य शशिकांत शहा साहेबांनी सांगितले की जैन मंदिराच्या येथे बाजारात फेरीवाला क्षेत्र आणि ना फेरीवाला क्षेत्र बसतात. अतिक्रमण विभाग आहे तर त्यांनी तेथुन ते हटवून द्यावे व सन्मा. सदस्य अनंत पाटील साहेब यांनी

जी सुचना केली आहे की राई गावामध्ये जी घटना घडलेली आहे. त्यामध्ये जे मृत झालेले आहे. तर त्यांना मदत करावी अशी त्यांनी मागणी केलेली आहे. तर कुठल्याही प्रकारे अशी घटना मिरा भाईंदर या शहरात होउ नये. याची आपण दखल घ्यावी व मृत व्यक्तीच्या कुटुंबांना मदत करायला माझी काही हरकत नाही पण आपण एकत्र बसुन त्या बद्दल चर्चा करावी की त्यांना विचार विनिमय करण्यात यावा आणखी जे जखमी लोक आहेत त्यांना २०-२० हजार रू. महापौर निधितून देण्यात येत आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, जे जखमी लोक आहेत त्यांना के.ई.एम. हॉस्पीटल मध्ये नेलेले आहे तर तुम्ही २० – २० हजार रू. देण्याचे ठरवले ही खुप चांगली गोष्ट आहे. मा. महापौर मॅडम आपण जे निर्णय घेतले की २० हजार रू. डिक्लेअर केलेले आहे. तर ह्यामध्ये आणखिन काही वाढ होत असेल तर आपण वाढ करावी अशी माझी विनंती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, लक्षवेधी आहे. आपण आता त्याच्यावर बोला.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या महापालिकेत ५० लिपिक काम करतात तर त्यांना अजूनपर्यंत पगार दिलेला नाही. तर तुम्ही त्यांना पगार केव्हा देणार ते आधी मला सांगा. कारण सहा महिने झाले त्यांना पगार दिलेला नाही.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, माझे निवेदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मी लक्षवेधी दिलेली आहे.

**लिला पाटील :-**

फंडातून निधी देणार का? कारण मागच्या वेळेला सुद्धा आपण असे बोलला होता. त्यांना अजुन पर्यंत मिळालेला नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. महापौर मॅडम, ५० लिपिकांना पगार दिलेला नाही. तर तुम्ही त्यांना पगार कधी देणार ते सांगा.

**मा. महापौर :-**

सचिव विषयाला सुरूवात करावी.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ठेका घेताना आपण त्यांच्या सहवासात होतो. ५० क्लार्क आपल्याकडे कामाला लावले आहे. ते काम करतात आणि ठेकेदार त्यांना त्यांचा पगार ही देत नाही. ठेकेदाराने त्यांना पगार दिला पाहिजे. आज पाच महिने झाले त्यांना पगार दिलेला नाही.

**मा. महापौर :-**

सचिव विषयाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

सभागृहात शांतता राखा. मा. महापौर मॅडम आणि मा. उपमहापौर श्री. शांताराम ठाकुर यांचे सत्कार करतात.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी शांताराम ठाकुर यांना सभागृहामध्ये असे सांगते की, आपले जे ड्रायव्हर आहे ते खुप पायलेट आहेत. कोणाला कशी उडवतील आणि कसे काम करतील त्याचा त्यांना पत्ता नसावा. तर त्यांनी त्यांच्याकडे लक्ष द्यावे.

(श्री. शांताराम ठाकुर यांचा सत्कार करण्यात आला.)

**शांताराम ठाकुर :-**

हा सत्कार माझा नसुन आपण सगळ्या सन्मा. सदस्यांचा आणि हा आर्शिवादाचा सत्कार आहे. तुम्ही मला वर्षभर सगळे जण सहकार्य करणार आहात ह्यासाठी मी नम्र विंनती करतो आणि सत्कार स्विकारतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स तसेच सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. याचा खुलासा संबधित अधिकाऱ्याने करावा.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या निधी बाबत बोलते की आपल्या मृत व्यक्तिंना आणि जखमींना काही मदत जाहीर केली त्याप्रमाणे आणखीन पण काही लोकांचे प्रश्न होते. मॅडम, आपल्याकडे

शहरातल्या लोकांच्या काही फाईली आहेत. काही गोरगरीबांच्या आजाराचे फाईली आपल्याकडे आहे. अतिशय गरिब आहेत ते खर्च करु शकत नाही तर त्याच्यासुध्दा पण निकाली काढावेत अशी आपणास विनंती आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यानी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या बाबतीमध्ये ५ महिन्यापासुन त्यांना पगार नाही. या बाबतीमध्ये मागच्या स्थायी समितीमध्ये सुध्दा सन्मा.सदस्यांनी त्या विषयावर चर्चा केलेली होती आणि त्या चर्चेच्या अनुषंगाने हा जो विषय आहे तो विषय आपण ऑलरेडी सचिवांकडे दिलेला आहे आणि दि. ५ ला स्थायी समितीची बैठक आहे. त्या ५ तारखेच्या बैठकीमध्ये टेंडर मंजुर होणार आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

कमिशनर साहेब, ७ महिने झाले टेंडर मंजुर होवुन तर आता टेंडर मंजुर कसे होवु शकते.

**जयंत पाटील :-**

टेंडर मंजुरीचा विषय कुठे आहे? त्या लोकांनी काम केले आहे. आणि तुम्ही लोकांनी पगार दिला नाही. ठेकेदाराने त्यांना पगार का दिला नाही? प्रश्न तो आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या स्टेटमेंट मध्ये गफलत झाली स्टेटमेंट मध्ये हा विषय झाला.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या शहरामध्ये आपल्या आरोग्य तपासणीच्या चुकी मुळे ५ रुग्ण डेंग्युने आजारी आहेत. जर तुम्ही रुलिंग द्याल तर मॅडम चांगले होईल.

**सुर्यकांत भाईर :-**

मा. आयुक्त साहेब, आरोग्य खात्यामध्ये जे डॉक्टर आहेत त्यांना पगार किती आहे?

**रोहिदास पाटील :-**

हा विषय टेंडरचा नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आरोग्य खात्यातले डॉक्टर आहे. त्यांना ही तीन चार महिने पगार दिलेला नाही.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रिक्स यांचा प्रश्न होता की, शहरातील जे तरुण मुले आहेत. भविष्य त्यांच्यासमोर आहे. त्यांनी आपल्याकडे काम केले आहे इतक्या महिन्यानंतर सुध्दा पेमेंट दिला नाही ज्यांना मुल बाळ असेल तर त्यांची कूटुंब कशी चालली असती. तरुण मुले आहेत म्हणुन चालते ते आपल्यासाठी काम करतात.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की, त्याच्यामध्ये एक्सट्रा १० जर काम करतात. त्यांची नावे समाविष्ठ करण्यात यावी.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आरोग्य खात्यामध्ये जे हॉस्पीटलचे नर्स आहेत. डॉक्टर आहेत. त्यांना ही ७ महिन्यामध्ये पगार मिळत नाही. तर त्यांना पगार मिळाला नाही तर त्यांची उपासमार होईल विषय आता आलेला आहे. पण ७ महिने झाले त्यांना पगार दिलेला नाही.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. तर त्या अधिकाऱ्यांशी मी चर्चा केली तर १० तारखेपर्यंत त्यांना पगार दिला जाईल.

**जयंत पाटील :-**

साहेब, आपण म्हणता १० तारखेला पगार देणार आपण दुसरी निवीदा कधी काढली आणि किती तारखेला काढली?

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये काय झाले की, स्थायी समितीने जो निर्णय घेतलेला होता. त्या संबधित ठेकेदाराला द्यायला पाहिजे होता. तो दिला गेला नाही. असे ते फाईलीवरुन दिसते त्या संदर्भामध्ये स्थायी समितीने पण निर्णय घेतलेला होता की, त्या ही जाहिर निवीदा पुन्हा काढा त्या निवीदा प्रक्रिया आपण पुर्ण केली.

**जयंत पाटील :-**

आपण निविदा कधी काढली? मी आपल्या सांगतो ना मार्च च्या दोन तारखेला निविदा काढली. जुन ची दोन तारीख उद्या आहे. म्हणजे गेल्या चार महिन्या मध्ये आपण त्या ठेकेदाराला पुन्हा दुसरा ठेकेदार नेमु शकला नाही. आपण त्याचीच वाट बघतो. आणि या शहरातल्या लोकांनी काम केले. त्यांना आपण पगार देत नाही. तुम्ही आज १० तारीख डिक्लेर करता. आपण त्याच्यांवर मेहरबानी करत नाही. ठेकेदाराने पगार दिला पाहिजे. आपण का जाहीर करता? तूमचा ठेकेदार सक्षम नाही. तुम्ही पगार द्या असे मी कुठे म्हणतो. ठेकेदाराने पगार दिला पाहिजे. असला कुठला रस्त्यावरचा ठेकेदार आपण आणतो. ज्याच्याकडे कुठलीही यंत्रणा नाही. त्याच्यात ताकद नाही. आणि ह्यामुळे आमचे काम त्यांनी केले असल्या ठेकेदाराला आपण पुन्हा काम देवु नये.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, ह्याच्यावर निट क्लेरिफिकेशन व्हायला पाहिजे. संपुर्ण सभागृह ह्याच्यामध्ये संभ्रमात राहते. कोणीतरी चर्चा करते. तुम्ही उत्तर देता त्याला ही कुठेतरी निट आधार राहत नाही. ह्या लोकांनी सहा महिने काम केले. ठेक्यात काम करतात. तर आपण, ठेकेदाराने पेंमेट केले की, केले नाही. आणि केले नसेल तर आपली जबाबदारी होती की नव्हती. त्यांना त्या कर्मचाऱ्याला पगार देणे हे त्याचे कर्तव्य होते. तरी पुन्हा आपण सांगतो की, आपण टेंडर त्याचे काढले. आता देतो. आपण टेंडर काढले तर उद्याचे काढणार सहा महिने होवुन गेले. त्यांचे टेंडर निघणार आहे का? आपण गुंता कसा निर्माण करतो ते समजत नाही. एकतर त्या ठेकेदाराकडुन पेंमेट निघेल किंवा त्याचे पेंमेंट बाकी असेल तर पेंमेट शिप करुन त्या कर्मचाऱ्यांना देणार आहे. अशी शास्वती द्यायला पाहिजे. तुमच्या उत्तर वस्तुस्थिती आहे. असे कुठेच तालमेळ जुळत नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ज्या ५० कर्मचाऱ्यांपैकी घ्या. मुलांची लग्न झाले नाही. त्यांचे आई वडील बोंबा मारायला लागले. की, सरळ कपडे घालुन बाहेर पडतात. पण ज्याचा खरोखर परिवार आहे, बायको मुले आहेत. ते कुठे पळतील. बायकोचे तर घरामध्ये ऐकायला लागते ना मग, त्या लोकांनी घरामध्ये काय करायचे? मॅडम, जर ठेकेदार असा हलगर्जी पणा करत असेल तर त्याला महानगरपालिकेचा कुठल्याही ठेका देवु नका.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, याच सभागृहामध्ये देविदास पाटील आणि दुसरे कोण होते. त्या दोघांचा आपण विषय काढला होता. संपुर्ण सभागृहाने अंत्यत सहानुभुतीने मा. आयुक्त साहेबांनी उत्तर दिले होते. तुम्ही उत्तर दिले होते. तरीपण एक, पाउलपण काम सरकले नाही. कशापध्दतीने कामकाज चालते. प्रशासनाने उत्तर द्यायचे किंवा मा. महापौरांने उत्तर द्यायचे कोणी उत्तर द्यायचे. सभासदाने विचारायचे असे व्हायला नको की, सभासद विचारतात. मा. महापौर त्या प्रश्नाला उत्तर देतात. किंवा मा. आयुक्तसाहेब उत्तर देतात. तर कुठेतरी पुर्तता व्हायला पाहिजे ना. कुठे अडलेले आहे. कोण सांगेल का? जे अडण्यासारखे होते ते पहिले सांगायचे नाही. नाहीतर ते एक्स्ट्रा व्हायला पाहिजे. त्याच्या घरची माणसे आहेत. त्यांच्या हक्काचे पैसे आहेत. देविदास पाटील, संतोष पाटील यांचा तुम्ही ......

**प्रभात पाटील :-**

ज चा प्रस्ताव आलेला होता. आणि आपण तो ठराव पण पारित केला होता. ती फाईल सध्या बनसोडे साहेबांकडे आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, निकालच तर लागायला पाहिजे. सगळे अधिकारी काम करता असे आपण दाखवतो. काम चालले असे ही लोक म्हणतात मग, काम कोणते चालले?

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. मा. आयुक्त साहेब, दोन दिवसापुर्वी मला एका माणसाने सांगितले होते की, ती फाईल खतगांवकर साहेबांकडे पडलेली आहे. तिथे माझी सही झालेली नाही.

**मा. महापौर :-**

डिक्लेर झाले.

**परशुराम पाटील :-**

डिक्लेर झाले. तर ठिक आहे.

**रिटा शहा :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. माझे विषय पेंडीग आहे. अगोदर विचारले. होते की, तुमच्या सर्व्हीस रोड वरचे अनधिकृत बांधकामावर तुमचे रुंलिग झाले त्याला चार महिने झाले. त्याच्यावर प्रशासनाने काय कारवाई केली?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. एक देविदास पाटील आणि संतोष पाटील तर त्या संदर्भामध्ये फाईल माझ्या दालनात मागवुन घेतो. आणि आपले समाधान होईपर्यंत खुलासा देईल आता सभागृहामध्ये माहिती नसल्यामुळे मी माहिती देवु शकत नाही.

**रोहिदास पाटील :-**

मला तुम्हाला सन्मान द्यायला आनंद वाटेल तूमच्या केबिनमध्ये येवुन त्याची मला काही आवश्यकता नाही. अन्य कोणा सभासदाला नसावी. त्यांना पैसे मिळायला पाहिजे . तुम्ही दोन दिवसात तिन दिवसात निर्देश द्या.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य त्याबाबतीमध्ये संपुर्ण माहिती घेवुनच मी आपल्याला सांगु शकेल.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, एवढी मोठी आपली चर्चा झाली. आणि तुम्हीच रुलिंग दिले होते. आम्ही एवढीच अपेक्षा करतो. की जितक्या लवकर होईल तितक्या लवकर सांगा भावना जागृत कुठे होतात. १७० कर्मचाऱ्यांना लावायचे होते. सर्व मुलांनी इंटरव्ह्यु दिल्या तो ही निर्णय झाला. साहेब, लोक विचारतात ना. तुम्हालाही विचारतात. आम्ही तुम्हाला विचारतो. लोक आम्हाला विचारतात.

**मा. आयुक्त :-**

त्या दोन कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये मी आपल्याला फक्त एवढ सांगु इच्छितो की, लंच टाईम मध्ये जरी तुम्ही माझ्याकडे आला तरी मी डिटेल माहिती घेतो आणि तुम्हाला सांगतो.

**रोहिदास पाटील :-**

दोन कर्मचाऱ्यांसाठी मी येतो दोन कर्मचाऱ्यांसाठी नक्की येतो. १७० साठी पण येतो.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, माझा प्रश्न अगोदरच विचारला होता आणि मा. महापौरांनी सर्व्हिस रोडबद्दल रुलिंग दिले होते. अनधिकृत बांधकामाबद्दल की, आठ दिवसाच्या आत त्याच्यावर कारवाई करा. मग, प्रशासनाने त्याच्यावर काय कारवाई केली?

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. ५० लिपीक मध्ये जास्त १०, ५ कर्मचारी असतील तर त्यांचा पण आपण विचार करावा आणि रुंलिग द्यावे.

**रिटा शहा :-**

मॅडम, माझ्या प्रश्नाचे उत्तर आपण लॅच टाईम नंतर देणार ना.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

एक लक्षवेधी आलेी आहे. ती सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांची लक्षवेधी आहे. ती मी मा. महापौर मॅडमकडे देतो.

( लंच टाईम १.५० )

**मा. महापौर :-**

सचिव सभेला सुरुवात करावी.

(नगरसचिव यांनी ओमप्रकाश गारुडीया यांच्या लक्षवेधीचे वाचन सभागृहात करण्यात आले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, डेंग्युची साथ भाईंदर शहराला नवीन नाही असे वाटते. या दोन वर्षाच्या कराकिर्दमध्ये ही साथ दुसऱ्यांदा महापालिकेमध्ये आलेली आहे. ही डेंग्युची साथ जेव्हा भाईंदर शहरामध्ये सुरु झाली. सर्वात प्रथम मुंबई सहारा या चॅनल ने तसेच हिंदमाता, गुजरात मित्र यांनी ही बातमी पसरवली की, भाईंदर मध्ये डेग्युची साथ सुरु झालेली आहे. आणि अनेक रुग्ण महापालिकेच्या वेगवेगळ्या रुग्णामध्ये उपचार घेत आहे. हा प्रश्न जेव्हा मा. आयुक्त साहेबांना विचारला गेला. तर त्या पत्रकारांचे असे म्हणणे आहे की, ही गोष्ट त्यावेळेला मा. आयुक्त साहेबांना पण माहित नव्हती की या शहरामध्ये डेंग्यू आलेला आहे. याचा अर्थ मा. आयुक्त साहेबांचे बरोबर आणि आरोग्य खात्याचे समन्वय

नाही. शहरामध्ये काय चाललेले आहे? कुठली रोगराई चाललेली आहे. याची जाणीव आरोग्य खात्याने मा. आयुक्त साहेबांना वेळोवेळी दिली पाहिजे. ती दिली गेली नाही. आणि हया मिरा भाईंदरमध्ये एकंदर चाललेला कारभार व त्याच्यावर गंभीर बाब अशी आहे की, हया महापालिकेमध्ये आरोग्य खात्याचे जे डॉक्टर्स होते. ते ॲन्टीकरप्शनमध्ये पकडले गेले. आणि आज या खात्याचे काय बघण्यासाठी कोणताही सक्षम अधिकारी नाही. म्हणजे या शहराला कोणीही मायबाप नाही. अशी परिस्थिती झालेली आहे. मागच्या वेळी जेव्हा डेंग्यू झाला होता. या सभागृहामध्ये अनेक नगरसेवकांनी हा विषय उचलुन धरला होता. मा. महापौर मॅडम, त्यावेळेला आपण ही हया सभागृहाला आश्वासन दिले होते. या परिसरामध्ये ज्या ज्या रुग्णांना डेंग्यू झालेला आहे. त्यांचा उपचार महापालिका स्वखर्चाने करणार. आणि ज्यांचा मृत्यू झाला त्यांना आम्ही पैसे देणार आहोत. अनेक रुग्ण आजही महापालिकेत पैसे घेण्यासाठी किंवा उपचाराचे जे पैसे खर्च झाले. त्यासाठी आपल्याकडे निवेदन पाठवतात. त्यांना उत्तर ही मिळत नाही. मागच्या एक आठवडयापूर्वी सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल यांनी एक असे निवेदन आपल्याकडे दिले होते. आज शहरामध्ये डेंग्यू चालू आहे. याची स्थायी समितीमध्ये सदस्य रोहिदास पाटील, गटनेता यांनी हे स्थायी समितीत प्रश्न उपस्थित केल्यानंतर ही प्रशासन गंभीर नाही. आज आपले जे आरोग्य केंद्र आहे. या आरोग्य केंद्रामध्ये जे अनुभवी डॉक्टर पाहिजे. ते डॉक्टर नाही का? असा प्रश्न या शहराला उपस्थित झालेला आहे. मा. महापौर मॅडम, सर्व प्रथम माझ्या लक्षवेधीचे उत्तर देण्यासाठी किंवा या संपूर्ण माहितीसाठी कोण सक्षम अधिकारी या सभेपुढे आहे. तर त्याला माझ्या निवेदनासमोर उभे करावे.

**मा. महापौर :-**

आपल्याला आता खुलासा पाहिजे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सक्षम अधिकारी आहे का? म्हणजे डेंग्यूबद्दल त्याला माहिती आहे का?

**मा. महापौर :-**

डॉ. पडवळ आहेत. ते आपल्याला डेंग्यूबद्दल माहिती देतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

डॉ. पडवळ ने हे सांगावे की, या शहरामध्ये डेंग्यू आहे ते आपल्याला कळलेले आहे का? आपण त्या रुग्णाला पाहिले का?

**डॉ. पडवळ :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आपल्या भाईंदर शहरामध्ये मे महिन्याची आकडेवारी माझ्याकडे आहे. १० आणि १६ मे ला भक्ती वेदांन्त हॉस्पिटलमध्ये दोन रुग्ण होते. आणि २६, २७ आणि आजची ३१ तारीख ह्या तीन चार दिवसामध्ये ५ पेशन्टची आमच्याकडे नोंद आहे म्हणजे टोटल ७ रुग्णाची नोंद महापालिकेकडे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता या भाईंदर शहरामध्ये किती लोक उपचार घेतात? कितींचे मृत्यू झालेले आहे. किंवा भाईंदरच्या बाहेर किती रुग्णांना उपचारासाठी पाठवलेले आहे.

**डॉ. पडवळ :-**

यापैकी १ रुग्ण के.ई.एम. मध्ये रेफर केलेले आहे. त्याची परिस्थिती स्थिर आहे. आता येथे जे रुग्ण उपचार घेत आहे. त्या सगळ्यांची प्रकृती स्थिर आहे. आतापर्यंत ह्याच्यात एकही डेथ झालेला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, फक्त डेथ झालेला नाही. किंवा उपचार चालू आहे. स्थिर स्थिती आहे. याचा अर्थ आपण हे समजायचे की ७ रुग्ण झाल्यानंतर अजून डेंग्यु पसरणार नाही. आपण ह्याच्यावर उपाययोजना काय केलेली आहे.

**डॉ. पडवळ :-**

ॲक्च्युअली डेंग्यू पसरणे हा सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. नागरीकरणामुळे सर्व शहरामध्ये झालेला आहे. मोठया प्रमाणावर जे कन्स्ट्रक्शन चालू असतात. त्याच्यामुळे शहरामध्ये पसरलेला डेंग्यू हे इमरजन डिली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे भाईंदरलाच. पक्कं बांधकाम चालू आहे. असे म्हणणे आपले आहे.

**डॉ. पडवळ :-**

फक्त भाईंदरला आहे असे मी म्हणत नाही. सर्वच ठिकाणी हे रुग्ण दिसत असतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आतापर्यंतचा वर्तमान पत्र बघितले भिंवडी महापालिका, मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका कुठे ही नाही. मग भाईंदर का आहे? म्हणजे भाईंदरला बांधकाम चालु आहे. बाकीच्या ठिकाणी बांधकाम नाही.

**डॉ. पडवळ :-**

तिकडच्या बद्दल मी काही बोलू शकत नाही. परंतु आपल्या येथे ......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग, तुम्ही असे कसे सांगतो की, बांधकामामुळेच म्हणजे अन्य काही कारण नाही.

**डॉ. पडवळ :-**

ह्याच्या मागची कारण अशी आहे की, डेंग्यु पसरवणारा डास ॲडी एजिप्ती जो आहे. तो छोट्या प्रमाणात पाणी साचलेले असते. म्हणजे जसे घरातल्या कुंड्या, फुलदाणी, मनी प्लांटच्या बॉटल किंवा नारळाच्या करवंट्या आजुबाजुला पडलेल्या असतात. ह्याच्यामध्ये पाणी साठुन त्याच्यामध्ये डासांची उत्पत्ती होते, त्याच्यामुळे डेंग्युचा प्रसार होतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याचा अर्थ तुमचे हे म्हणणे आहे की, नागरिकांच्या बेपर्वाईमुळे किंवा जे रहिवासी घरात साहित्य वापरतात. फुलदाणी समजा किंवा पाण्याची कूंडी ते व्यवस्थित वापरत नाही. म्हणुन डेंग्यु होतो.

**डॉ. पडवळ :-**

हो तसेच आहे. आपण जो सर्व्हे केला. रुग्णांच्या आसपास आपण सर्व्हे करतो. आपल्या भाईंदर पुर्वेला ५ रुग्ण आहे. त्या ठिकाणाच्या सर्व्हेमध्ये पाण्याच्या टाकीमध्ये आपल्याला ॲडी एजीप्ती ........

**रोहिदास पाटील :-**

भाईदर पुर्वेला रुग्णांच्या आजुबाजुला कोणते बांधकाम चालु आहे. त्यामुळे बांधकाम ........

**डॉ. पडवळ :-**

पाण्यांच्या टाकीमध्ये .........

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही निवेदन करता ते कसे करता, डेंग्यु रोग होता तो बांधकामामुळे दहा – दहा, पधंरा – पंधरा वर्षाच्या ज्या इमारती आहेत. त्यामुळे आदल्यावेळी पण आला होता ह्यावेळी ही आल्या. ज्यावेळी तुमच्या लक्षात तेव्हा तुम्ही काय प्रिकॉशन घेतले? असे निवेदन करणार नाही तर काय फायदा? तुम्हाला तासभर ही सभा तर चालवायची आहेका? जेव्हा तुम्हाला या मिरा भाईंदर मध्ये डेंग्युचा पेशन्ट आहे हे लक्षात आले. किंवा दुसऱ्या कोणी लक्षात आणुन दिले तर तुम्ही काय प्रिकॉशन घेतली?

**डॉ. पडवळ :-**

केसची माहिती मिळाल्या मिळाल्या आम्ही त्या रुग्णाच्या घरी भेट घेतली व आणखीन काही रुग्ण आहे........

**रोहिदास पाटील :-**

जो रुग्ण आहे त्याला भेटले दुसरे रुग्ण तयार होवु नये म्हणुन काय केले?

**डॉ. पडवळ :-**

रुग्ण होवु नये ह्याच्यासाठी सर्व्हे करुन सर्व कंन्टेनर, कंन्टेनर म्हणजे पाणी साठा आहे. त्या सर्वांची तपासणी घरी आणि १०० मि. परिसर या सर्वामध्ये तपासणी करुन आपण पाणी साठा रिकामी करुन कोरडे करुन जनजागृती करुन लोकांना सांगतो.

**रोहिदास पाटील :-**

घडा पालथी करणे म्हणजे नियंत्रण करणे झाले का? तुम्ही कोणाला काय पत्रक वाटले का?

**डॉ. पडवळ :-**

पत्रक वगैरे छापुन घेतलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

कधी माणसं मेल्यानंतर. तुम्हाला पहिल्या दिवशी माहिती पडले. ह्याची तारीख किती सांगितली.

**डॉ. पडवळ :-**

२७ तारखेला माहिती मिळाली. त्यानंतर लगेच आपण फॉलो-अप केला.

**मिलन पाटील :-**

कुठल्या महिन्यातील २७ तारीख?

**डॉ. पडवळ :-**

मे महिन्यातील २७ तारीख.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, अनिल इंदरमल जैन तुम्ही ९ एप्रिलला त्या रुग्णाच्या आराधना बिल्डींग, तिसरा माळा ह्या रुग्णाच्या घरी गेला होता तर मी तुम्हाला पर्सनल केम्प्लेंट केली. माझ्याकडे एक अकाउंट आहे. त्याचा मुलगा आहे. तर, तुम्ही ९ तारखेला चाचणी घेतली, त्याचे रक्त घेतले, पाण्याचा झाडा घेतला. तो घेवून तुम्ही मला बोलला की, मी एका महिन्यात तुम्हाला त्याचा रिझल्ट देतो. त्याला तर आजार झाला पण त्याच्या भावाला सुध्दा आजार झाला आणि कस्तुरी हॉस्पीटलमध्ये ते दोघे १५ दिवस होते. मी तुम्हाला दोन वेळा कळवले की, हा रुग्ण डेंग्युचा आहे. डॉक्टरांनी त्यांना डेंग्यु आजार सांगितलेला आहे. त्याची चाचणी झालेली आहे. तरी तुम्ही जावून त्याची चौकशी घ्या. रक्त घ्या आणि त्याची चौकशी करा तुम्ही ९ एप्रिलला तिकडे गेले होते तर त्याची नोंद आहे का?

**डॉ. पडवळ :-**

फक्त मे महिन्याच्या रुग्णांची माहिती आहे.

**मिलन पाटील :-**

मी एप्रिल महिन्याची गोष्ट करतो. तुम्हाला रुग्ण मिळाला २७ मे ला मी एप्रिलच्या ९ तारखेची गोष्ट करतो. ९ एप्रिलची तुमच्याकडे नोंद आहे. तुम्ही नोंद घेतली का?

**डॉ. पडवळ :-**

एप्रिल महिन्याची सध्या माझ्याकडे आकउेवारी नाही.

**मिलन पाटील :-**

तुम्ही ५ रुग्ण कुठले सांगता?

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, आपको मालुम है। कौनसा हॉस्पीटल आपको मालुम नही। आप पेशन्ट बोलते है वो लिलावती मे है। मैने फोन पे बात किया है। मै साई आशिर्वाद मे भी गया था। मै रात के ११ बजे भी फोन कर रहा था, तभी मोबाईल बंद था। फिर उन्होने दुसरे दिन १२ घंटेके बाद डॉ. पटेल के यहा भेजा।

**मिलन पाटील :-**

तुम्ही तशी नोंद घेतली का? कस्तुरी हॉस्पीटलमध्ये ९ तारखेपासून १५ दिवस ॲडमिट होता. त्याच्या आई वडीलांनी पैसे भरलेले आहे. तुम्ही त्याच्या चौकशीला गेले का? मी तुम्हाला फोन केला होता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, ह्याचा अर्थ असा की, पेपरवाले छापता, ह्या टी.व्ही. न्युजच्या माध्यमाने जे दाखवले. हिंदमाताने सांगितले, गुजरात मित्रने सांगितले की ही बाब मा. आयुक्त साहेबांच्या लक्षात नाही. मा. आयुक्त साहेबांना माहित नाही ही गोष्ट खरी आहे. डॉक्टरांना सुध्दा माहित नाही की, हे कधी रुग्ण आले? कुठून आले? ह्याचा अर्थ असा झाला की, गोष्ट मला केव्हा मिळाली. काल माझ्या बिल्डींगच्या खाली एक दुकानदार आहे. त्याला सकाळी ७.३० वाजता तिव्र ताप आला. ९.३० वाजता आम्ही त्याला नाकोडा हॉस्पीटलमध्ये भरती केले. पण तेव्हा ३.०० वाजता डॉक्टरांनी सागितले की, हा उपचार माझ्याकडून होणार नाही. ५.३० वाजता आम्ही त्याला तन्वर हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले. तेव्हा त्या लोकांनी रक्त घेतले आणि ११.०० वाजता तो मेला. डॉक्टरांना मी विचारले की, काय झाले? आणि अजून डायग्नोजिस झालेले नाही. मी काय सांगु शकत नाही. पण हे सिंपटम डेंग्युमुळे किंवा लेप्टोमुळे होउ शकतात. एवढ्या लवकर डिसिजन मुळे माणसाचा मृत्यु होत नाही. त्या माणसाचा मृत्यु झाला. मृत्युनंतर १० तास त्याची बॉडी पोस्टमार्टम करण्यासाठी नातेवाईकांना येथे तेथे फिरायला लागले. म्हणजे शेवटी प्रशासनाला काहीच पडलेले नाही. ह्याच्यावर काही झालेले आहे. शहरामध्ये सफाई झालेली आहे. डॉक्टर तुम्ही सांगता की, हॅन्ड बिल छापली. मागच्यावेळी सुध्दा हॅन्ड बिल छापली. मी तुम्हाला सांगतो की, ती हॅड बिल कचऱ्यामध्ये गेले. एक ही हॅड बिले नागरिकांच्या घरी गेलेले नाही. आमच्या वॉर्ड मध्ये स्वच्छता आहे. आम्ही प्रत्येक गोष्टीकडे लक्ष देतो. एक हॅड वेल शहरातल्या नागरिकांना मिळाले नाही. मा. आयुक्त साहेब, तुम्हाला दुसरी गोष्ट सांगतो की, जेवढे डॉक्टर्स आहेत, नर्स आहेत या भाईंदर महापालिकेमध्ये त्यांना आपण बसण्याचा पगार देतो. त्यांना काही गरज नाही. भाईंदर मध्ये काय चाललेले आहे? ह्याच्यांकडे रुग्ण आल्यानंतर त्यांना सुध्दा नाही प्रायव्हेट डॉक्टरांना जावुन दाखवा. की, तुम्हाला मोठा रोग आहे. अशी परिस्थीती आहे की, स्वतःला ही कळत नाही. मग

त्याचा उपचार काय करणार. तुम्ही मला हे सांगा की, मागच्या वेळेला जे ८, ९ रुग्ण मिळाले होते. त्यावेळी डॉक्टरांनी तुमची बाजु घेतली की, डेंग्यु जो पर्यंत होत नाही. तोपर्यंत डेंग्यु सांगत नाही. मागच्या वेळेला ब्लडची रिर्पोटींग केली होती. त्याचे रिपोर्ट काय आले? त्याची तुम्ही छाननी केली. मागच्या वेळी ९ रुग्णांची रिपोर्ट आणली का? तुमच्या रेकॉर्ड मध्ये आहे का?

**डॉ. पडवळ :-**

मागच्या वर्षी चिकन गुनियासाठी १० रुग्णाचे नमुने आपण पाठवले होते. त्याच्यामध्ये तीन पॅझिटिव्ह आले होते. डेंग्युंसाठी अजुन पॉझिटिव्ह आले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यावेळेला ७ ते ९ पेशंट भाईंदर वरुन गेले होते. त्यावेळेला ह्या सभगृहामध्ये गोधंळ चाललेला होता. त्यावेळी डॉक्टर रमेश जैन नक्की तुमच्या बाजुने बोलले. की, जो पर्यंत पुर्ण तपासणी होत नाही. तोपर्यंत डेंग्यु बद्दल आपण सांगु शकत नाही. म्हणुन तो विषय आपण थांबवला. त्या नउ रुग्णा बद्दलची रिपोर्ट मागवली. हा विषय सभागृहात आला आणि विषय संपला तुमच्या कडे रेकॉर्ड आहे काय?

**डॉ. पडवळ :-**

त्यावेळेला मी सांगितले होते की, प्रिझन डायग्नोसिस किंवा एक सस्पेक्टेड डायग्नोसिस म्हणुन त्याला आपण डेंग्यु म्हणतो. त्याचे कन्फरमेंशन तिकडुन आल्यानंतर ते कन्फम म्हणतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

रिपोर्ट आला नाही की, तुम्ही मागितला नाही. तुम्हाला इनट्रेस्ट पण नाही. तुम्ही त्या रुग्णानंकडे गेले का? होते तर त्यांचा तुमच्या कडे रिपोर्ट आला आहे. कारण सभागृहात बोलले की, रिपोर्ट पाठवला पण तुमची सुध्दा ड्यूटी आहे आठ महिन्यापुर्वी जेव्हा मा. सभागृहामध्ये डेंग्यु आला होता. त्यावेळी ते रुग्ण बघितले होते. त्यांचे रिपोर्ट गेलेले आहेत. ते रिपोर्ट आल्यानंतर त्या रिपोर्टच्या आधारे भाईंदर मध्ये प्रिकॉशन घेतले पाहिजे होते. आपण त्यावेळी प्रिकॉशन घेलले नाही. सभागृहामध्ये विषय झाला आणि संपला. बोंबाट मारला विषय गेला. तुमच्या कडे रेकॉर्ड आहे काय? तुम्ही एक पण रेकॉर्ड मागवले का?

**डॉ. पडवळ :-**

आपल्याकडे याचे कन्फेरमेंशन आहे ते पुण्याला फक्त एन.आय.व्ही मध्ये होते ब्लड चेकींग साठी...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्हाला मिळत नाही.

**डॉ. पडवळ :-**

त्याच्या साठी पाठवुन मागणी करुन घेतो. परंतु, त्याचा उपयोग कधी होतो जेव्हा आपल्याकडे एखाद्या मोठ्या प्रमाणात पेशंट आले तर पाठीचे डायग्नोसेशन प्रत्येक व्ही कॅन एव्हरी पेंशट चे पाठवले जाते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा तुम्ही सभागृहाला सांगता डायग्नोसिस झाला नाही म्हणुन डेंग्यु म्हणता येत नाही. तुम्हाला आजही हेच उत्तर सभागृहाला द्यायचे आहे का?

**डॉ. पडवळ :-**

नाही आपण सस्पेक्टेड डेंग्यु म्हणुन त्याचे ह्याच्यामध्ये अंतर्भुत करुन त्यांना आपण मदत पण दिली आहे. आणि उपाययोजना आपण.........,

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा तुम्ही सभागृहाला सांगता डायग्नोसिस झाला नाही. म्हणुन डेंग्यु म्हणता येत नाही. म्हणजे तुम्हाला आज पण हेच उत्तर सभागृहाला द्यायचे आहे का?

**डॉ. पडवळ :-**

नाही. आपण सस्पेक्टेड डेंग्यु म्हणुन त्याचे ह्याच्यामध्ये अंतर्भुत करुन त्यांना आपण मदत पण दिली आहे. आणि उपाययोजना आपण ......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मदतीचा प्रश्न विचारत नाही. आता सांगितले त्यांना २५ हजार ते २ लाख रुपये द्या. दोन लाख रुपये ठिक आहेत. त्याच्या परिवाराला कामाला येणार पण त्याचा जिव कळवळलेला आहे. तुम्ही मला एक सांगा की, मागच्या वेळीचे रिपोर्ट तुम्ही पुण्याहुन का मागवले नाही. ह्या सभागृहामध्ये एवढी चर्चा

झाली. तुम्ही त्याचा रिपोर्ट मागवणे का गरजेचे समजले नाही. किंवा तुम्हाला मा. आयुक्त साहेबानी सांगितले की मागवायचे नाही.

**डॉ. पडवळ :-**

रिपोर्ट आपण पाठवलेला आहे. परंतु त्याच्या रिपोर्ट मध्ये डेग्यु नाही तर त्या रिपोर्ट मध्ये चिकन गुनिया असा रिपोर्ट आलेला आहे. रिपोर्ट आपण पाठवलेला होता.

**मिलन पाटील :-**

९ तारखेचा रिपोर्ट काय आला?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्हाला अजुनही सांगतो की, माझ्याकडे रिपोर्ट आहे. तुम्ही रिपोर्ट आणलेला नाही. तुम्ही चिकन गुनिया बोलले परंतु तुम्ही हात झटकवले आणि तुम्हाला माहितच नाही. तेव्हा तुम्ही या पदावर नव्हते. म्हणुन तुम्हाला माहिती नव्हते. तुम्ही खोटे रिपोर्ट सांगु नका. तुम्ही हे सांगा की, आम्ही त्या ८ रुग्णांची रिपोर्ट मागवलेली नाही. तुम्ही सभागृहाला खरं सांगा. नाहीतर येथे तुम्ही सादर करा की, चिकुनगुनियाचा रिपोर्ट मागवलेला आहे.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मी तुम्हाला तारीख देतो ८ एप्रिल. तर तुम्ही त्याचा रिपोर्ट काय आणला? अनिल इंदरमल जैन, आराधना बिल्डिंग ही मारुती देउळच्या बाजूला आहे. त्या तिथे त्या रुग्णावर तीन बाई दोन डॉक्टर गेले होते. त्यांनी त्याचे नाव घेतले. ८ दिवस कस्तुरी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होता, १० दिवसानंतर, १० दिवस ॲडमिट असताना हयांना मी दोन वेळा फोन केले होते. डॉक्टर तिथे तो रुग्ण आहे. तो बघा. तो डेंग्यूचा रुग्ण आहे. तुम्हाला मी बोललो होतो ना.

**डॉ. पडवळ :-**

डॉ. लहाने म्हणून भाईंदर वेस्टचे डॉक्टर आहेत. त्यांच्याशी तुमचे बोलणे झाले असेल.

**मिलन पाटील :-**

मला माहित नाही. त्यावेळी मी माझे काम केले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाहीतर तुम्ही असे सांगा की, ही माझी जबाबदारी नाही. मी सक्षम नाही. तुम्ही सभागृहाची दिशाभूल करु नका. तुम्ही असे सांगा की, मी सक्षम नाही. मला तात्पुरता नेमलेले आहे. किंवा सभागृहामध्ये उत्तर द्यायला उभे केलेले आहे. नाहीतर हे सांगा की, मला त्याच्याबद्दल माहिती आहे. मी या केंद्राचा डॉक्टर आहे, मला ह्याची माहिती असे तुम्ही सांगा. तुम्ही कुठे गेलेच नाही ना. तुमचा दोष नाही. तुम्हाला या सभागृहामध्ये उभे केलेले आहे. तुम्ही फक्त हे सांगा की, माझी डयुटी नाही. उपकेंद्र क्र. २ मध्ये ती समाविष्ट नाही. माझ्यावर ती जबाबदारी नाही. तुम्ही उलट उलट उत्तर देवून या सभागृहाची दिशाभूल करु नका.

**मिलन पाटील :-**

परमन्टकरिता आपल्याकडे केलेले आहे. जर असे अधिकारी आपल्याकडे परमनन्ट केले. तर आपल्या दवाखान्याची काय वाट लागेल. मी तर म्हणतो ह्यांना परमनन्ट करुच नका. हे आता टेम्पंररी आहे. तर ते टेम्पररी पण काढून टाका. जे डॉक्टर रुग्ण तपासू शकत नाही, रुग्ण बघू शकत नाही. त्यांना डॉक्टर का बोलायचं? तुम्ही रुग्णांना बघू शकत नाही. तुम्हांला तारिख देतो. त्या तारखेचे तुम्ही सांगू शकत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून सांगतो की, डॉ. साहेब, आपण या विषयासाठी सक्षम आहे का? आपण तपासणी केली का? आपण सर्व्हे केला का? आपण रुग्णाला बघितलेले आहे का? आपण रिपोर्ट घेतले का? जर नसेल घेतली तर आपण कृपया बसा. मा. आयुक्त साहेब, त्यांना कोणाला निवेदन करता येईल त्यांनी दयावे. नाहीतर ते स्वतः करतील. कारण या शहराची खेळणी चाललेली आहे. अजून पाउस पडला नाही. आज शहरामध्ये १५ दिवसापूर्वी आपण ठेका दिलेला आहे. साहेब घाण निघालेली आहे, पण घाण सर्व रस्त्यावर पडलेली आहे. त्यांच्याकडे डंम्पर नाही, गाडया नाही. घाण कोण उचलणार आहे. आपण ठेका देताना हे पण विचार करत नाही की, त्यांच्याकडे गाडी आहे की नाही, डंम्पर आहे की नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, डॉ. पडवळ बसले. याचा अर्थ काय होतो. म्हणजे सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी म्हणतात, ते सक्षम नाही. तर कसे काय? जर ते अधिकारी असतील तर त्यांनी उत्तर दयायला पाहिजे. हे सभागृह आहे. सभागृहात उत्तर देण्यासाठी ते उभे होते. ते बसले. म्हणजे काय? जर त्यांच्याकडे उत्तर नसेल तर पटीक्युलर जो कोणी उत्तर देईल त्यांना उभे रहायला सांगा. नाहीतर

तुम्ही उत्तर दया. कारण आम्ही ओरडत राहणार. त्याचा निर्णय काय होणार नाही. मग त्याचा फायदा काय?

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य ओमप्रकाश गारोडिया यांनी डेंग्यू साथीचा जो मुददा उपस्थित केलेला आहे. त्याच्यामध्ये पाच लोक मिळाली. असे डॉ. पडवळ साहेबांनी सांगितले. आणि एक रुग्ण त्यांच्या बिल्डिंगमधला होता तो रात्री ११.०० वा. वारला. परंतु, ह्या सर्व परिस्थितीची जबाबदारी ही ॲन्टी करप्शन ब्युरो द्वारा ज्याची धरपकड झाली. असे रुंदन राठोड म्हणून त्या विभगाचे प्रमुख म्हणून होते. आणि त्याचे उत्तर तेच देवू शकले असते की डेंग्यू कसा आला? कसा झाला? आणि कोण मेला? आणि त्यांच्याकडे केवढी रुग्ण आली. कुठल्या रुग्णाला त्यांनी कुठे पाठवले. त्याच्यावर काय उपचार केला? त्याचा रिपोर्ट काय आला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, मागच्यावेळीचा रिपोर्ट ही मागवायला तयार नाही. याचा अर्थ असा की, या सभागृहामध्ये चर्चा करायची. आणि विषय संपवून घ्यायचा या शहराचा गंभिर विषय आहे. हा साधा विषय नाही. अजून हा विषय चालू आहे. डॉक्टर ॲन्टी करप्शनमध्ये पकडले. ते डॉक्टर गेले. म्हणजे या महापालिकेमध्ये उदया मा. आयुक्त साहेब, गेले तर याचा अर्थ ही महापालिका कोरडी झाली काय? या सभागृहामध्ये मला बोलले गेले होते की, ८ रुग्णांचा रिपोर्ट या महापालिकेत आलेले होते. त्यातले पॉझिटिव्ह किती, निगेटिव्ह किती? कशामुळे डेंग्यू झाला? फक्त सभागृहात चर्चा झाली आणि विषय संपला. आपल्या रेकॉर्डमध्ये कुठली गोष्ट आपण मागत नाही. मॅडम, माझे म्हणणे हेच आहे मी तुम्हाला वाईट बोलत नाही. तुम्ही जे सांगता की, डॉक्टर ॲन्टी करप्शन मध्ये गेले. ते डॉक्टर ॲन्टी करप्शनमध्ये आता गेले. ते रुग्ण आठ महिन्याआधी होते. त्याचे ही रिपोर्ट यांच्याकडे नाही. हयांच्या कडून तुम्ही काय अपेक्षा करणार? डॉ. पडवळ येथे बसलेले आहे. याचा अर्थ असा की, त्यांना गांभिर्य माहित नाही.

**रिटा शाह :-**

सर्व गांर्भिय एका व्यक्तीनेच सभागृहामध्ये घेतलेले आहे. बाकी नगरसेवकांना गांर्भिय माहित नाही.

**रोहिदास पाटील :-**

एखाद्या चांगल्या विषयाला तुम्ही ट्विस्ट का करता?

**रिटा शाह :-**

मी तुमच्या बाजूनेच बोलते. तुम्ही थोडी समजुन घ्या. ऐकून घेण्याचा थोडा धिर ठेवा की मी काय बोलणार आहे ते मी तुमच्या बाजूनेच बोलतो.

**रोहिदास पाटील :-**

अधिकारीला उत्तर देवू दया.

**रिटा शाह :-**

चर्चेच्या नंतर अधिकारी उत्तर देणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ही लक्षवेधी माझी आहे.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य रिटा मॅडम, हा रुग्ण मी जे सांगतो तो तुमच्या वॉर्डमधला आहे. आराधना बिल्डिंगमधल्या दुस या माळ्यावरचा तो मुलगा आहे. हा प्रश्न तुम्ही केला पाहिजे. मी तुमच्या वॉर्डमधले सांगतो.

**रिटा शाह :-**

तुम्ही माझे सांगू नका. आराधना बिल्डिंग ही माझ्या वॉर्डमध्ये नाही. तुम्ही समज घ्या की ती बिल्डिंग कोणाच्या वॉर्डमधली आहे ती.

**मा. महापौर :-**

मॅडम, तुम्ही जरा दोन मिनिट बसून घ्या त्यांचे पूर्ण झाले की तुम्ही बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, डॉ. पडवळ हे बसलेले आहेत. याचा अर्थ असा की, सक्षम अधिकारी जो कोणी असेल. त्यांनी या विषयावरती काय गांर्भिय घेतलेले आहे. या शहराच्या आरोग्याबद्दल नागरिकांच्या सुरक्षाबद्दल काय उपाययोजना केलेली आहे? याचे आम्हाला उत्तर पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी ह्यांनी मांडलेली जी लक्षवेधी आहे. शहरामध्ये असणारे डेंग्यूचे पाच रुग्ण या शहरात पूर्णपणे आरोग्य विभागाने घ्यावयाची काळजी दलित माध्यमातून व प्रसार माध्यमातून जनतेपर्यंत हे आजार कशामुळे होतात. ही साथ कशामुळे पसरते. त्याच्यासाठी काय काळजी घ्यायला हवी. आणि त्याच्यावरील उपाय योजना यासाठी प्रसिद्धी करायला हवी. या संबंधित याही पेक्षा पुढे जावून आता आपल्याला आढळलेले पाच रुग्ण आहे. यावर जास्तीत जास्त कुठली खबरदारी घेता येईल. याचा आपण अधिक विचार केला तर बरे होईल आणि या संबंधित मा. आयुक्त साहेब, आपण विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा करतील आणि समाधान करतील.

**रिटा शाह :-**

मा. आयुक्त साहेब, आपण खुलासा करायच्या अगोदर माझे दोन शब्द ऐकून घ्या. मग खुलासा करा. ते बोलतात तेच मी बोलू इच्छिते की, त्यांच्या वॉर्डात किंवा माझ्या वार्डात. मिरा भाईंदर शहरामध्ये कुठलाही रोग उपद्रव झाला. तर त्याची जबाबदारी प्रशासनाची असते. रुंदन राठोड यांच्यावर तुम्ही जबाबदारी ठेवली होती. ॲन्टी करप्शनमध्ये त्यांना पकडले त्याच्या अगोदर बाविस्कर साहेब होते. त्यानंतर डेंग्यु आणि चिकनगुनिया हा विषय आपल्याकडे पहिलांदा चर्चेला आलेला नाही. ह्याच्या अगोदर सुध्दा मा. महासभेमध्ये चर्चा केलेली आहे. साहेब, ह्याच्यामध्ये डॉ. रुंदन राठोड ची चुकी आहे की, डॉ. पडवळांची चुकी आहे की, आरोग्य विभागाचे कांबळे साहेब, की शिंदे साहेब यांची चुकी आहे. साहेब ह्याच्यामध्ये डेंग्यु निर्माण झाला नाही. त्याच्यावर मा. महासभेमध्ये आपल्या निर्णय झाला की, सदर रोगाअंतर्गत जे औषध लागणार आहे जे पॅम्प्लेट लागणार आहे. त्याचा सर्व ठराव करुन आपण प्रशासनाला दिलेला आहे. मग, परत परत आपण ठराव करायचा किंवा डायरेक्शन द्यायची गरज नाही. त्याच्यावर काम करणारा कुठलाही सक्षम अधिकारी असु दे. जसे डॉ. पडवळ, रुंदन राठोड, शिंदे किंवा कांबळे साहेब असु दे. जे कोणी मागे पडलेला कमी पडलेला आहे आणि ह्याच्यावर हलगर्जीपणा केलेला आहे. तशा अधिकारीला मी सस्पेंड करायचा ठराव मी या लक्षवेधी अंतर्गत मांडते. पण मांडायचा अधिकार मला नाही. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी हा ठराव मांडला पाहिजे की, अशा अधिकारीला तुम्ही ससपेंन्ड करा. दोन चार महिने घरी बसवा. तेव्हा त्यांना अक्कल येणार की, अरोग्याच्या अंतर्गत त्यांना काय लक्ष द्यायला पाहिजे. आणि काय करायला पाहिजे मा. महासभा एकदा ठराव करुन देणार की, पॅम्प्लेट काढा. त्याच्यावर औषध फवारणी करा रुग्णाच्या घरी जा. आणि त्यांचे ब्लड घ्या. त्याला तपासणी करायला पाठवा. पुण्यावरुन त्याचा रिपोर्ट आणा. घडी घडी मा. महासभेमध्ये लक्षवेधी आणुन चर्चो करायला विषय नाही. तो प्रशासनाचा विषय आहे. प्रशासनाने ते करुन घ्यायला पाहिजे. आज या लक्षवेधीच्या अंतर्गत मी अशा सुचना देत आहे की, ह्याच्यामध्ये कमी पडलेला कुठलाही अधिकारी असेल त्याला तुम्ही ताबडतोब सस्पेंड करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, आपले बोलणे बरोबर आहे. तर मी विचारतो की, येथे माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी कोणी सक्षम अधिकारी आहे का? तुम्ही संस्पेंड कोणाला करणार? त्यांना जेव्हा मी विचारले तुम्ही सक्षम आहात का तेव्हा ते बोलायला लागले. त्यांच्याकडे काही रेकॉर्ड नाही. त्यांना उभे केले गेले पण त्यांना उभे का केले त्याचे उत्तर मा. आयुक्त साहेबांनी उत्तर द्या म्हणुन ते उभे राहिले पण ते बसले कारण, त्यांच्याकडे उत्तर नाही. सस्पेंड करणार कोणाला? मिरा भाईंदर शहरामध्ये असे असे हॉस्पीटल आहे. असे असे डॉक्टर्स आहेत त्याच्याकडे सर्टिफिकेट नाही. असे बघण्याचे काम आपले आहे. आपण कोणीही लक्ष देत नाही. आपण केबिनच्या बाहेर पडत नाही. जेव्हा वर्तमान पत्रामध्ये मा. आयुक्त साहेबांना विचारले आता ते किती सत्य आहे ते आपल्याला मा. आयुक्त साहेब सांगतील मा. आयुक्त साहेबांना जेव्हा वर्तमान पत्र छाया चित्रकार विचारतात की, या शहरामध्ये डेंग्यु झाला. ते आपल्याला माहित आहे का? तर त्यांचे उत्तर असे होते की, मला माहित नाही. मी माहिती घेतो. म्हणजे कॉडीनेशन नाही. कुठल्याही डिपार्टमेंटच्या मा. आयुक्तांशी कॉडीनेशन नाही. म्हणुन माझे असे मत आहे. मा. आयुक्त साहेबांनी ह्याच्यावर आपले निवेदन करावे. काय झालेले आहे. आणि काय करणार आहोत अशा पध्दतीने तुम्ही या शहरातल्या नागरिकांची खेळणी करणार आहात काय?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, डॉ. रुंदन राठोड यांना अटक झाली ती २६ टक्के ही त्यांना भोगलेली आहे. आता तुम्ही विचार करा. की मेडिकल मध्ये औषधामध्ये २,५ टक्केवर धंदा चालतो. आज जर एवढी मोठी रक्कम मागवली तर आपल्याला जे औषध पुरवले ती खरोखर निकृष्ठ दर्जाचे असतील. तर तो माणुस त्याला २५ ते ३० टक्के कमीशन त्याला देवु शकेल. अगोदरची जी औषधे आली आहेत. त्याच्या मागच्या वेळी पण असेच झालेले आहे. त्याची शहानीशा करुन त्याची चौकशी करुन हे निकृष्ठ दर्जाचे

आहेत की, काय आहे ते बघितल्या शिवाय आपल्या रुग्णांना देवु नये. असे कुठल्याही डॉक्टरचे सर्टिफिकेट घेवुनच तुम्ही ती औषधे वापरा. मागच्या वेळी सुध्दा आपल्याला सांगितले होते. आपल्या रुग्णाला पुन्हा पुन्हा देतात. ती औषध आपल्या मुंबईमध्ये वापरली जात नाही. डॉक्टर चांगले बोलतात. आम्ही तुम्हाला असे उलटे सांगणार नाही. परंतुं ही औषध जी आहे ते बाहेर वापरतात की आम्ही जे डोस देतो. आम्ही जी औषध देतो. त्याच्या ८ दिवसामध्ये इफेक्ट ताबडतोब जाणवतो. आणि मुलगा ८ दिवसामध्ये बरा होणार असेल. तर तुम्ही औषध २० दिवस खावे लागेल. आणि २० दिवसाने त्याचे इफेक्ट पडेल. म्हणजे किती विकृत दर्जाचे असतात. म्हणजे २० दिवस माणुस तुमचे औषध खाणार का? ह्याची तुम्ही चौकशी करा आणि औषध पुन्हा द्यायची बंद करा. नाहीतर रुग्णाला काहीतरी होण्याची शक्यता आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी एक सुचना करु इच्छितो. या शहरामध्ये नविन डास आहे तो, गुरांच्या अंगावर बसायचा त्या डांसाची संख्या वाढली आहे. आणि ते भाईंदर शहरामध्ये दिसतात. तर त्याचा शोध लावुन त्याच्यावर काय उपाययोजना करता येईल. किंवा त्याच्यावर काय औषध फवारणी करता येईल ते जरा करुन घ्या.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहामध्ये मघासपासुन लक्षवेधी सुचनेवर चर्चा सुरु आहे. त्या चर्चेच्या अनुषंगाने सन्मा. सदस्यांनी जी चर्चा उपस्थित केलेली आहे. त्याच्यामध्ये अन्य सदस्यांनी पण भाग घेतलेला आहे. आरोग्य विभागाचा जो अधिकारी या ठिकाणी कार्यरत होता त्या अधिकाऱ्यांचे मागच्या मा. महासभेममध्ये त्याच्यावर सुध्दा चर्चा झालेली होती. आणि त्यांनी चांगल काम केले त्याच्याबद्दल सुध्दा एक चांगली पोचपावती मिळालेली आहे. त्या पोचपावतीच्या बाबत मी ह्या सभागृहात बोलणार नाही. परंतु ते अधिकारी या ठिकाणी त्यांना कार्यमुक्त केल्यानंतर अजुन पर्यंत अन्य अधिकाऱ्याकडे चार्ज सोपवलेला नाही. परंतु ह्या पुर्वी ते अधिकारी येण्यापुर्वी डॉ. पडवळ हे कार्यरत होते. त्यांना आज मा. महासभेमध्ये मी पाचारण केलेले होते. की, एखादी लक्षवेधी आहे किंवा अन्य कुठली चर्चा उपस्थित झाली तर त्याच्यावर त्यांनी डॉक्टर या नात्याने उत्तर द्यावी. अशी एक अपेक्षा त्यांच्याकडे होती. सन्मा. सदस्यानी जी लक्षवेधी उपस्थित केली आहे. त्या लक्षवेधी मध्ये त्यांनी आतापर्यंतच जे काही भाषण केले. त्या भाषणामध्ये दोन तीन वेळा असा उल्लेख केला की, गुजराथी वर्तमान पत्रामध्ये अशा प्रकारची बातमी आल्यानंतर बातमी मध्ये नमुद केले असेल की, एखादे पत्रकार, वार्ताहर आयुक्तांशी बोलले आणि मा. आयुक्तांना या शहरात डेंग्युची लागण झालेले आहे हे माहित नाही. मी आपल्याला सांगु इच्छितो की, जे कोणी वार्ताहर आहे त्यांचा मला फोन साधारण रात्री साडे नउ, पावणे दहाच्या दरम्यान फोन आला आणि त्यांनी मा रात्री विचारणा केली की, अशा प्रकारे झालेले आहे. तर ते तुम्हाला माहित आहे का? तर मी त्यांना सांगितले की, मला ह्या बाबतीमध्ये माहित नाही. परंतु मी जेव्हा दुसऱ्या दिवशी माझ्या कार्यालया मध्ये आलो तेव्हा त्या वर्तमानपत्राची कात्रण घेवुन मी मा. उपायुक्तांना पत्र लिहले की जी काय डेंग्युची साथ पसरलेली आहे. त्या हॉस्पीटलमधुन डेली रिपोर्टस त्यांच्याकडुन मागवुन घ्या. जसे आपण मागच्यावर्षी मागवुन घेतले होते. आणि त्यांनतर ज्या ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे आणि मागच्या वर्षी आपण डेंग्युच्या संदर्भामध्ये ज्या ज्या उपाययोजना केलेल्या होत्या त्या त्या दृष्टीने तातडीने आपण पुन्हा करावयाच्या आहेत अशाप्रकारची सुचना मी त्यांना दुसऱ्या दिवशी दिलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याला रात्री ९.३० वा कळले तर रात्री ९.३० ते सकाळी ९.३० पर्यंत म्हणजे १२ तास आपण काय केले. ते आपण सांगा साडे बारा तास आपण आयुक्त म्हणुन काहीही केलेले नाही. हे कबुल करा. उगाचच कशाला मोठ्या मोठ्या गोष्टी करतात. मिरा भाईंदर महापालिकामध्ये मा. आयुक्तांचा बंगला कशासाठी? कुठलीही आपातकालीन घटना घटली तर मा. आयुक्त साहेब हे काही मिनिटात हजर झाले पाहिजे. काही व्यक्ती मेले आणि आपण साडेबारा तास काहीच बोलले नाही. आणि आता तुम्ही बोलता पत्रकारांनी सांगितले होते आणि तुम्हाला सांगितले होते आणि तुम्हाला माहित नव्हते साहेब, नवघर लांब नाही. उपायुक्त जर आजारी पडले असते तर हे प्रशासन धावत गेले असते. हे लक्षात घ्या. जिकडे आपला बंगला आहे तिकडे पण प्रंचड मच्छर आहे. ईश्वर न करो उद्या तुम्हाला डेंग्यु हो. तुमच्या वास्तव्याचे जे ठिकाण आहे तिथे बंगला आहे. तिकडुन घटना घडलेली आहे तिथे फक्त काही मिनिटाचा अंतर आहे. आपल्याकडे महापालिकेची गाडी आहे. सगळ आहे. आणि आपल्या एवढ्या कमी अंतरामध्ये बारा, साडे बारा तास लागतात. हेच आमच्या मिरा भाईंदरचे दुर्भाग्य आहे म्हणुन मी गप्प आहे. कारण, ही चर्चा करुन काहीही होणार नाही आता पुढचे विषय आहे. त्याच्यावर

आम्हाला बरेच बोलायचे आहे. या महापालिकेचा हाउस भरतो. त्याची ही किंमत राहिलेली नाही. कारण काही गोष्टी माझ्याकडे आल्यात. ते आता मी पुढे आणतो मा. महापौर मॅडमने आदेश द्यायचे आणि आपण काही तरी भाषण द्यायचे. सन्मा. सदस्य ओमप्रकाश जी आणि आमच्या सारखेने बरेचसे विषय आणायचे. मा. आयुक्त साहेबांनी मान्य केले की, साडेबारा तासानंतर मी ऑफीसमध्ये गेलो मग, म्हणजे सकाळी ९.३० वाजता ते कार्यालयामध्ये १०.३० आले. आणि त्याच्यानंतर त्यांनी उपआयुक्तांना पत्र लिहले की, मा. उपाआयुक्तांनी काय केले. काही नाही. मा. उपायुक्त किती वाजता आले कोण कार्ड पंचींग करते का? मा. उपायुक्त साहेब त्याच्यावर कोणाचे लक्ष आहे का? मा. उपायुक्त साहेब जरी ११ वाजता आले. मा. आयुक्त साहेब जरी १२ वाजता आले. तरी त्यांच्या दालनाचा ए.सी.टी.एन. पंखा, लाईट सगळे चालु असते. महापालिकेच्या कॅम्पसच्या सगळ्या लाईटस ६ वाजता बंद झाले पाहिजे मा. आयुक्त साहेब, बघा हा विषय एवढ्या महत्वाचा आहे की, मी मागच्या मिटिंगमध्ये बोललो होतो. की आपण स्वतः गोडाउनला जावुन पाहणी करु या. त्यानंतर टिल टुडे आजपर्यंत तुमचा एक सिंगल फोन मला नाही. की, म्हात्रे साहेब, आम्ही जाउन बघीतले गोडाउनची परिस्थीती ही आहे. किंवा तुम्ही आमच्या बरोबर चला आपण एक आश्वासन दिले होते आपल्याला सगळ्यांना आपण आश्वासन दिले की, उद्या आम्ही जावु. अजुनपर्यंत आपण गेलेलो नाही. गोडाउन मध्ये कुठलेही औषध नाही.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आपण जो आता मुद्दा उपस्थित केला आणि बरेच मुद्दे त्याच भाषणामध्ये आपण उपस्थित केले. परंतु, आपण आता शेवटी शेवटी म्हणाला होता मागच्या सभागृहामध्ये मी आश्वासन दिले होते त्या आश्वासना प्रमाणे मी त्याच दिवशी संबधिंत अधिकाऱ्यांना बोलावुन स्टॉक आपल्याकडे किती आहे? औषध किती आहेत? ह्या औषधांच्या साठ्याचाही आम्ही आढावा घेतलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पण नविन औषध आली नाहीत. ती एक्सपायर डेटची आहेत. असे सन्मा. सदस्य बोलतात. मी बोलत नाही.

**मिलन पाटील :-**

एक्सपायर डेट मी बोललो नाही. विकृत दर्जाची औषध आहेत. असे मी बोललो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, आपण निवेदन करावे. आपण आता काम उपाययोजना केलेली आहे. मा. आयुक्त साहेब, मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो. जेव्हा हा डेंग्युचा प्रकार मागच्यावेळी सुध्दा झाला होता. तेव्हा तुम्ही आदेश दिले की, शहरामध्ये मोठे मोठे कटाव टाकतात. मा. आयुक्त साहेबांचे पण लागलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभा करण्यासाठी पण डेंग्युसाठी ही उपाययोजना करावी. एक ही पोस्टर या शहरामध्ये लावला का? मागच्या एक वर्षाच्या काळामध्ये एक ही पोस्टर दाखवा. की, ह्या डेंग्यु बद्दलच हा पोस्टर आम्ही लावलेला आहे. कारण, साहेब तुम्ही खोटे बोलता तुम्ही एक ही पोस्टर आम्हाला दाखवा. या शहरामध्ये एक ही पोस्टर नाही. आम्ही लोंखडी ग्रिल बनवली त्याच्यावर आम्ही लिहिले. पण, अधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही. तुम्ही १ लाख इनव्हलप छापले असाल. नोंद आहे. पण १ हजार सुध्दा इनव्हलप या शहरामध्ये वाटले गेले नाही. तुम्ही आतातरी काय उपाययोजना केलेली आहे. ते आम्हाला सांगा आम्ही त्याची दक्षता घेवु जर दुसऱ्या अधिकाऱ्याला वेळ नसेल तर आम्ही दक्षता घेवु आपण काय काय उपाययोजना केली. त्याबद्दल आम्हाला सांगावे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आपण १५ मिनिट वेळ दिली होती. परत परत तेच विषय येतात. ह्याच्याहुन आपल्याला फार मोठे हित आहेत. ह्याच्यावर मा. आयुक्त साहेबांनी निवेदन करावे. मा. महापौर मॅडम हा विषय आपण कुठेतरी संपुष्टात आणा. आपल्याला अजुन भरपुर विषय घ्यायचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्हाला या विषयांवर गांर्भिय वाटते की नाही. तुम्ही एकतर समजुन घ्यायला पाहिजे. पण नक्की झाले होते. ह्याच सभागृहात तुम्ही दखल घेतली होती. मुलांची रॅली काढली. २००० हजार मुल रस्त्यावर निघाली. टी. व्ही वर बातमी दिली. केबल वर बातमी दिली पोस्टर काढले. डॉक्टरांची तातडीने मिटींग बोलवली. आपण काय केले. त्याचे कोण निवेदन करत नाही. किंवा काय केले ते ही बोलत नाही. मी हा आरोप करत नाही. पण साहेब तुम्ही उत्तर कशाला देत नाही. सिरियस कसे होत नाही. ह्याचे आम्हाला गांर्भिय वाटते. एवढा मोठा विषय असतांना आपण गंभीर कसे होत नाही. आपले सगळे सहकारी आपल्याला साथ देत नाही? तुम्ही सांगा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य हे सगळ सांगण्यासाठी मी उभा राहिलो होतो. परंतु तुम्ही प्रश्न विचारले होते. त्याच्या मुळे मी थांबलो.

**रोहिदास पाटील :-**

जे मुद्द्यांचे आहे ते जर तुम्ही सांगितले असते. तर आम्ही विचारलेच नसते. किंवा आता जर नक्की लक्षात आलेले आहे. आपण हे करु या. आमच ही सहकार्य मागा. डॉक्टरांचे सहकार्य घ्या. जनतेचे घ्या.

**मा. आयुक्त :-**

मगाशी माझ्या निवेदनामध्ये मी सांगितले की, मागच्या वर्षी आपण ज्या ज्या प्रमाणे प्रसिध्दी केलेली आहे. हॅड बिल आपण छापलेले आहे. ह्यावर्षी पण आपण हॅड बिल छापु. एक दोन दिवसामध्ये हॅड बिल छापुन वर्तमान पत्रामध्ये प्रत्येक घरोघरी जाईल. अशी व्यवस्था आपण करु या. त्याच्यानंतर टि. व्ही वर केबल वर सुध्दा आपण लोकांना जनजागृती करण्यासाठी अशा प्रकारची आपण स्किप देवु. सन्मा. सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मागच्या वर्षी जसे आपण मोठे पोस्टर, बॅर्नर तयार केले होते. तसे ह्या ही वर्षी आपण तयार करु.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, हे काम कोण करणार? हे उपायुक्त करतील किंवा हे अधिकारी ते अधिकारी करतील असे होत नाही. तुम्ही आम्हाला असेच सांगुन रुंलिग देता.

**मा. आयुक्त :-**

काका तसे नाही.

**रोहिदास पाटील :-**

ह्यासाठी ह्या अधिकाऱ्यांकडे जबाबदारी सोपवली असे सभागृहात सांगितले.

**मा. आयुक्त :-**

डेग्युच्या बाबतीमध्ये संपुर्ण जबाबदारी ही श्री. शिंदे कडे चार्ज दिलेला आहे. प्रशासकीय कामकाजासाठी दिलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

श्री. शिंदे हे एस. आय आहेत. त्यांच्या हातात तुम्ही १० लाख लोकांचे भवितव्य देतात. साहेब तुम्ही सांगा आम्ही त्याच्यावर टिका करत नाही. मा. उपआयुक्त हे काम बघतील आणि त्यांनी त्यांच्या टिम कडुन काम करुन घ्यावे.

**मा. आयुक्त :-**

मा. उपायुक्तांच्या नियंत्रणाखाली ते कामे करतील.

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यात तुम्ही पुढारपण घ्या. आता मा. महापौर आहे. त्यांना ही धन्यवाद देतो. आधी होत्या त्यांना ही धन्यवाद देतो. या अशाच बैठकी झाल्यानंतर मा. महापौर, मा. आयुक्त, मा. उपायुक्त, आरोग्य अधिकारी ह्यांनी २४ तास सर्व घालवले. २४ तासात रॅली निघाली होती त्यात अनेकांनी सहभाग घेतला होता. वॉर्ड बुकींगवर असे व्हायला पाहिजे. शहरात अन्य लोकांना माहित झाले पाहिजे की, डेंग्युची साथ पसरत आहे. ती आणखीन वाढवु नये म्हणुन सगळ्या नागरिकांनी त्यामध्ये सहभागी व्हावे असे चित्र तयार करावे.

**मा. आयुक्त :-**

नक्की करु. दुसरा महत्वाचा मुद्दा सन्मा. सदस्यांनी विचारला होता की, डासांच्या बाबतीमध्ये, डासांच्या बाबतीमध्ये स्थायी समितीने आता परवाच काम बंद केलेले होते. ठेकेदाराला पुन्हा मुदत वाढ दिलेली आहे. आणि आपण तातडीने पाच ही प्रभागामध्ये फवारणीच्या सुचना त्यांना देण्यात आलेल्या आहेत त्याच्यावर ही ताबडतोब नियंत्रण ठेवणार आहेत. आणि आता सन्मा. सभागृहामध्ये जी काही जी चर्चा झाली. त्या चर्चेप्रमाणे २४ तासामध्ये तर आपण नक्की प्रिकॉशन घेवु रॅलीचे आयोजन करुन प्रत्येक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना ह्या ठिकाणी प्राचारण करुन किंवा अन्य ज्या ज्या सेवाभावी संस्थांना आपण एकत्र आणुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेने जास्तीत जास्त जनजागृती करण्याचा आपण प्रयत्न करु.

**मिलन म्हात्रे :-**

२६ जुलैच्या प्रलयानंतर दोन वर्ष आपल्याला आपातकालीन पथक ह्याच्यामध्ये त्या त्या एरियाचे एस. आय औषध, डॉक्टर आणि हे पथक आपल्या इकडे होते. मागच्या २६ जुलै २००५ ला जी घटना

घटली त्यानंतर यावर्षी अशा पथकाची आज १ जुन झाला. काल भरपुर पाउस पडला आपण काही घोषणाच केली नाही.

**मा. आयुक्त :-**

आपातकालीन व्यवस्थेमध्ये आपण जे आराखडा तयार केलेला आहे. त्या आराखड्यामध्ये आपण संपुर्ण भेटीची तत्काल सेवा आपण प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या अधिकाऱ्याच्या ड्युट्यापण लावलेल्या आहेत आणि ते सुध्दा कार्यरत होणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय म्हणतो की, ते जे पथक आहे पुर्वी रात्री कोणी रुग्ण गेला तर आम्हाला रात्री १२ वाजता पण औषध मिळायचे. डॉक्टर आणि तो स्टाफ हसायचा. पथक कार्यरत झाल्याबद्दल बोला. काय झाले ते महत्वाचे आहे. हे पथक नेमके लागले का? ते लागणार आहे का? त्या पथकाची रचना काय असेल आणि ठिकाण म्हणजे त्याचा औषध देण्यारे डॉक्टर आणि त्यांची टिम आणि २० मजुरांचा संच असायचा आता काल जी घटना घटली तिथे जर पथक असते तर त्या एरियामध्ये तुम्ही रात्री सुध्दा ॲप्रोज होवु शकला असता. आणि साफसफाई जे काय असेल किंवा प्राथमिक काय उपाय असेल ते आपण करु शकलो असतो.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आता आपल्या सभागृहामध्ये डेंग्युबाबत एवढी चर्चा झाली. आणि डॉ. पडवळ साहेब ही बोलले की, आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये ७ पेशन्ट आहेत आणि त्यांची माहिती देखील त्यांनी दिली. संपुर्ण चर्चा झाली. परंतु आपल्या खुलासामध्ये अजुन त्या रुग्णांना आपण काय मदत करु. ह्या बद्दलचा खुलासा आपल्याकडे अजुनपर्यंत आलेला नाही. सध्या हे जे पेशन्ट आहे ते अतिशय गरिब घराण्यातले आहेत. त्यांच्याकडे हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी पैसा नाही. तर आपण ह्याच्याबद्दल कसलाच खुलासा केला नाही. आपली चर्चा भरपुर झाली त्याच्यावर उपाययोजना करण्यासाठी .......

**सुधा गोयकां :-**

मा. महापौर मॅडम, एक जानकारी देना चाहुँगी। कल केबीन रोड के नाले की साफसफाई चल रही थी। जो रेल्वे समान अंतर है। उसके उधर एक साईड है। दिवार बंधी हुई है। एक साईड मे पुरी पट्रीयो काम बिछा हुआ है। उसे जो कचरा निकाला गया है वो वापस मे उसमे गिरने वाला है। और आगे उसका मुँह इतना छोटा है की, बरसात का सिजन सुरु हो रहा है। और बरसात जिस ढंगसे आती है उस तऱ्हेसे नालो की साफसफाई हो नही रही है। और स्टाटींग का जो उसका मुँह है। इतना छोटा है की, वह नाला नक्की डुबने वाला है। उसके लिये क्या तयारी है। वह जरा क्लिअर करो। केबीन रोड तो पुरा डुबेगा ही डुबेगा कारण कल की स्थिती मे जब नाले मे से कचरा निकाल रहे थे तब नाला पुरा भरा हुआ था। और वह कचरा जो निकल रहा है वो उसमे गिरने वाला है। जगह नही है उसमे से कचरा बाहर निकलनेके लिये। इसके लिये अधिकारीयोने क्या व्यवस्था कि है। जरा उनसे खुलासा करवाईये ना।

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. आमचे प्रभाग समितीचे ३ चे सभापती श्री. नलावडे साहेब यांनी जो विषय घेतला. राई येथे जे घडले होते. त्याच्यासाठी आपण जे निधी डिक्लेर केलेला आहे. त्यापध्दतीने त्यांचा विचार आहे की, अमुक म्हणुन माणूस हॉस्पिटलमध्ये आहे. तर त्याच्या साठी आपण काय निधी देणार? त्यांना आपण मदत करणार काय? हा त्याचा मुद्दा आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, वैद्यकिय निधी देणार की नाही ते सांगा ना.

**सुधा गोयंका :-**

मा. आयुक्त साहेब प्लिज उसका खुलासा करवाईये।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांना जे डेंग्युचे पेशंट आढळलेले आहेत. त्याबद्दल आर्थिक मदत मागितलेली आहे. तर महापौर फंडातुन त्यांना आपण १५,०००/- रु. प्रत्येकी मदत घोषित करते. आणि ती लवकरच मिळेल यासाठी जी कागदाची पुर्तता आहे. ती आपण लवकर करुन ती मदत घेवुन जावु. धन्यवाद.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण अशी मदतच वाटत राहु. पण मॅडम ने जो प्रश्न विचारला तो अंत्यत आवश्यक आहे. आणि जे जर भरले तर आणखिन मदत द्यायला लागेल त्याच्यासाठी पण फंड तयार ठेवा.

**सुधा गोयंका :-**

एक साईड मे फाटक के सबवे का काम चालु है। एक साईड पे वह नाला इतना छोटा बनगया है। की, पाणी जाने को उधर रस्ता ही नही है।

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आपण खुलासा केला.

**राजकुमार कांबळे :-**

जो कचरा काढलेला आहे तो उचलुन घेण्यात येईल.

**सुधा गोयंका :-**

बात उठाके लेनेकी नही कर रही हुँ मे। बात यह है की, जो नाले के आगे के साईड का रस्ता है वह एकदम छोटा है। फाटक के पास उसमे सबवे का भी काम चालु है।वह कचरा उठाने का तात्पर्य नही है।

**शशिकांत भाईर :-**

मा. महापौर मॅडम, याच्यावर मी मा. आयुक्त साहेबांशी खुलासा विचारु शकतो. पण मा. आयुक्त साहेबांनी यावर खुलासा करायचा आहे.मध्यंतरी त्यांना मी प्रश्न विचारला होता की, केबिन रोड जवळ रेल्वे समांतर तेथे नाला आहे. त्या नाल्याच्या समोर जिथे फाटक कलव्हर्ट मधुन पाण्याचा निचरा होतो. तो अरुंद आहे. तेथुन सांडपाण्याचा निचरा होत नाही. तर आपण त्यात काय उपाययोजना केल्या आहेत. मी तुम्हाला वारंवार पत्र ही दिलेले आहे. परंतु आपले प्रशासन असे बोलते की, आता आपली मिटींग संपली तर उद्या जायचे पण मा. आयुक्त साहेब, उद्या पर्यंत तिकडे बघायला आले नाही. आणि आरोग्याचे संबधित अधिकारी पण अजुन आले नाही. आपला कलव्हर्टचा प्रोग्राम कुठ पर्यंत झाला ते ही आपण सांगत नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, हा विषय केबिन रोडच्या लोकांच्या जिवन मरणाचा विषय आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, ज्याप्रमाणे डेंग्युचे पेशन्ट अन्य किंवा अनेक आजाराचे रुग्ण असतील. तर त्यांना आपण असे निधी वाटत गेलो . आपल्याकडे निधी आहे का अगोदर ते पण बघा. त्याच्यासाठी आरोग्य वाले काम करणार नाही. आणि आपण निधी वाटावा. जर, रेल्वे समांतर नाला आहे तो व्यवस्थित साफ केला नाही तर आपल्याला अन्य आणखिन रुग्ण आपल्याला सापडतील यात काही शंका नाही.

**शरद पाटील :-**

मॅडम, रेल्वे समांतर नाला अजुनपर्यंत साफ का झाला नाही ते आम्हाला समजत नाही.

**शशिकांत भोईर :-**

त्यांना आपण वारंवार सुचना पण दिली की, नाला दोन्ही बाजुने बंद करा. अगोदर पाणी काढा. नंतर गाळ काढा. आपल्या प्रशासनाची काही मदत होत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण नाल्यासंबधीत जे बोलत आहात. त्याबाबत प्रशासन जरुर खुलासा करेल. परंतु, आपण लक्षवेधीवर चर्चा करत आहोत. त्यांना सोडून हे इतर विषय सुरु झालेले आहे. आणि आपल्या विषय पटलावर अनेक विषय आहे. आपण जो विषय उपस्थित केलेला आहे. तो अतिशय आवश्यक आणि महत्वाचा विषय आहे. तो अतिशय आवश्यक आणि महत्वाचा विषय आहे.त्याबाबत प्रशासन खुलासा करेल. त्या खुलासानंतर आपण सर्वानी पुढील विषय सुरु होण्यासाठी सहकार्य करावे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, जी लक्षवेधी आहे. त्या लक्षवेधी वर चर्चा करा. असे आपण म्हटला. पण, प्रथम मा.महापौराना अशी विनंती आहे की, आपण प्रथम पहिला ज्या शहरामध्ये ही नालेसफाई आहे.त्याचा आढावा घ्यायला पाहिजे होता. जो पाउस उशिरा येणार होता. तो आता लवकर सुरु झालेला आहे. काल एवढा पाउस पडला की, बी.पी.रोडच्या संपूर्ण दुकानामध्ये पाणी गेलेले आहे. याचा अर्थ असा समजा की, आपली नालेसफाई कुठल्या पध्दतीने होत आहे.

याच्यावर आपण पहिला आढावा घ्यायचा पाहिजे होता. हा तर महत्वाचा विषय आहे.त्याला आम्ही नाकारु शकत नाही. या शहरामध्ये जे साथीचे रोग चाललेले आहेत. त्याची उपाययोजना करणे महापालिकेचे कर्तव्य आहे. त्याची उपाययोजना करणे महापालिकेचे कर्तव्य आहे. त्याचबरोबर या शहरामध्ये काही ठिकाणी पाणी तुंबु नयें त्याच्यासाठी नालेसफाईचे हे फार उशिरा टेंडर दिलेले आहे. का उशिरा दिला? यात कोणची मक्तेदारी होती? की, कोणाची त्याच्यामध्ये सेटिंग आणि टक्केवारी होती? उशिरा का झाला ? हे फेबुवारी पर्यन्त नालेसफाईचा आणि खोदाईचा टेंडर यायला पाहिजे होता ते आपण ऐन टाईमावर अवघे १५ दिवस असतांना हा विषय आणला. असे नालेसफाई होतील. आपण पाहणी केली का? त्याचा आढावा पहिला घ्या. मग, आपल्याला समजेल काय आहे ते.

**मा.महापौर :-**

सन्मा.सदस्य रतन पाटील, प्रशासनाने ज्यावेळी गोषवारा दिला त्यावेळेला मा.महासभेमध्ये तो विषय आलेला आहे. आणि तो विषय पटलावर घेतलेला आहे.

**रतन पाटील :-**

मॅडम, गोषवारा दिला. बरोबर आहे. पण, आता त्याची कारवाई काय केली.त्याबददल बोला ना. आढावा घ्या.

**मा.महापौर :-**

प्रशासन खुलासा करेल. आपण बसून घ्या.

**रतन पाटील :-**

तो विषय घ्या.म्हणून घ्या, परिस्थिती तशी आहे म्हणुन घ्या. आमच्या बी.पी. रोडची, केबिन रोडची तशी परिस्थिती आहे.

**रिटा शाह :-**

मा. आयुक्त साहेब तुम्ही सर्व एकत्रित खुलासा द्या भाईंदर वेस्टला स्टेशन रोडला समांतर जो नाला आहे. स्टेशन रोड पासुन ते शेवट पर्यंत त्याच्यामध्ये गंमत अशी झाली की, तिथे नाले सफाईचे काम सुरु झालेले आहे. त्याच्यामध्ये माणस उतरुन, पण गेली आणि जे.सि.बी पण लावली पण शांती नगरचा जो विभाग आला तिथे माझी शाळा आहे. तिथे भिंत नडत होती ती भिंत तोडली आणि तो नाला साफ करुन घेतला. पण मॅडम जे.सी.बी ने एक ट्रक कचरा काढला. तो ट्रक परत जावुन यायला ८ तास लागले म्हणजे दुसरा ट्रक गेलाच नाही. आणि दुसऱ्या दिवशी पासुन तो जे.सी.बी बंद झाली मग, शांती नगर येथे निर्मल निकेतन शाळा आहे. तेथुन शाळेच्या एन्ड पर्यंत आपण गाळ काढुन घेतला नाही. आणि शेवटचा जो एन्ड आहे. तेथे आपल्याला खोल करुन डिपमध्ये जायला लागेल नाहीतर संपुर्ण परिसर विनायक रोडपासुन शांती नगरच्या इंद्रप्रस्थ पर्यंत संपुर्ण परिषद पाण्याने डुबेल कारण, ज्या ठेकेदाराकडे जे.सी.बी नाही. त्याच्याकडे कचरा उचलायला लॉरी नाही. मग, तशा ठेकेदाराला आपण ठेका देतो. आणि शेवटी एक लॉरी कचरा काढायला २४ तास घेतले. माझा नजरे समोरची गोष्ट आहे. सकाळी ८.०० वाजता जे.सी.बी लागले होते. जर भिंत तोडायची त्यांनी परवानगी मागितली शांती नगरच्या रहिवाशीकडुन ते रहिवाशी आणि आम्ही सर्वांनी परवानगी दिली. ती भिंत तोडली तोडल्यानंतर फक्त १ लॉरी कचरा काढुन घेवुन गेले. नंतर जे.सी.बी तसाच पडला होता. आपण १२ तासाचे, १६ तासाचे पैसे दिले. जे.सी.बी लावायची गरज आहे. पुर्ण नाला अजुन भरलेला आहे. जे.सी.बी लावायची गरज आहे. परंतु, आपण नुसते मा. महासभेमध्ये ठराव करुन देतो. आपण ठेका देतो. लाखो रु. खर्च करतो. नंतर आपण सगळे सभासद मिळुन बोंबलतो. डेंग्यु झाला. नी चिकनगुनिया झाला. पण अशी परिस्थिती आरोग्य विभागाची राहणार. तर डेंग्यु आणि चिकनगुनिया होणार कसा नाही? अजुन दोनच आजार आलेले आहे. अजुन पुष्कळ साथ आहे. जसे टायफाईड आहे. मलेरिया आहे. तापाची साथ आहे. झाडा आहे, उलटी आहे. या सर्व बिमारी मिरा भाईंदर शहरामध्ये आहेत. परंतु आपण ज्या ठेकेदाराला ठेका दिलेला आहे. आपण घनकचरा व्यवस्थापनाच्या मोठमोठ्या गोष्टी केल्या त्याच्यावर सुप्रिम कोर्टाची ऑर्डर झाले. आपण ह्याचा ठेका कंटीन्यु करायचा म्हणुन मा. महासभेमध्ये सुध्दा आपण ठराव पारित करुन दिला पण त्यांच्याकडे इक्वरमेंट नाही. माणस नाही. तर ते कसे नाला साफ करुन देणार आहे. त्याच्यावर प्रशासन आपल्याला काय जवाब देणार आहे?

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम,मा. आयुक्त साहेब को कल्वर्ट के बारेमे खुलासा करवाने के लिये बोलीऐ। रुलिंग दिजीए ना।

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, चेना येथे जसा आता हा विषय चाललेला आहे. त्या विषयाला धरुनच आहे. परंतु ज्या ठिकाणी तिवारी म्हणुन जिथे भरणी केलेली आहे. तो तिथे नाल्याचे पाणी जाण्याचा मार्ग

आहे. तिकडच्या लोकांनी दोन गावाच्या नागरिकांनी आपल्याकडे अर्ज दिलेला आहे. आणि अजित पाटील यांना हे माहित आहे. या नाल्याची जर साफसफाई केली नाही. तर त्या गावात पुर आला तर ते गाव जाण्याचे संभव आहे. आणि त्याची जबाबदारी ही प्रशासनाची राहिल. ध्यान ठेवा. कारण, ही लोक माझ्याकडे आलेली म्हणुन अर्ज दिलेला होता. आणि अर्जावर सगळयांच्या सही आहेत. आताच लोक माझ्या जवळ येवुन गेलेत. पण त्यांचा काही विचार केलेला नाही. म्हणजे आपल्याला त्या लोकांची घर आणि गाव फिरवायचा विचार आहे का? अजित पाटील साहेब तुम्ही दोन शब्द सांगावे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम मे अबतक खडी हु मुझे जवाब नही मिला।

**परशुराम पाटील :-**

चेना चे उत्तर आपण देता का?

**सुधा गोयंका :-**

कल्वर्ट का अन्सर आप दे रहे क्या? रेल्वेका भी आप अन्सर देंगे या उठाके लेके जाऐगें। उठाके लेना तो आपका काम है ना।

**सुधा गोयंका :-**

सन्मा. सदस्य त्यांना खुलासा पुर्ण करु द्या. त्यानंतर तुम्ही विचारा. आरोग्याच्या बाबतीत त्यांना इतर सदस्यांनी पण प्रश्न विचारलेला आहे. त्यांना त्याचा खुलासा करु द्या. आपण जरा ऐकुन घ्या ना.

**शरद पाटील :-**

कांबळे साहेब, रेल्वे समांतर नाला कितपर्यंत साफ झालेला आहे.

**राजकुमार कांबळे :-**

६० टक्के साफ झालेला आहे.

**शरद पाटील :-**

रेल्वे गटारावर स्लॅपचे काम कितपर्यंत झालेले आहे.

**राजकुमार कांबळे :-**

स्लॅपचे जवळ जवळ पुर्ण झालेले आहे. स्लॅप सगळीकडे आहे.

**शरद पाटील :-**

रेल्वे समांतर गटारावर कितपर्यंत स्लॅप टाकलेले आहेत.

**राजकुमार कांबळे :-**

स्लॅप पुर्ण टाकलेले आहेत.

**शरद पाटील :-**

कुठपर्यंत टाकलेले आहे.

**राजकुमार कांबळे :-**

केबिन रोड ते नर्मदानगर पर्यंत स्लॅप टाकलेला आहे.

**शरद पाटील :-**

तुमची माहिती चुकीची आहे. मा. आयुक्त साहेब, तुम्ही आता आमच्या जोडीला चला. स्लॅप कुठपर्यंत टाकलेला आहे. ते आपण बघु कांबळे साहेब म्हणतात पुर्ण झाले आणि माझी माहिती अशी आहे की, ते पुर्ण झालेले नाही.

**राजकुमार कांबळे :-**

संपुर्ण काम झालेले नाही. असे मी सांगितले

**शरद पाटील :-**

मी स्लॅपच विचारले होते.

**राजकुमार कांबळे :-**

मी साफसफाई बद्दल सांगतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य शरद पाटील यांनी विचारले की, स्लॅप कुठपर्यंत टाकलेला आहे. कांबळे साहेबांनी दिलेले उत्तर चुकीचे आहे. रेल्वे समांतरचे स्लॅप पुर्ण झालेले नाही.

**परशुराम पाटील :-**

प्रत्यक्षात आपण पाहणी न करता त्यांना आपण खोटे बोलते ते कितपत योग्य आहे.

( सभागृहात गोंधळ )

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, जब वो लोग कल नाला साफ कर रहे थे।

**शरद पाटील :-**

त्यांना मी १५ दिवस आधी बोलवले होते की, कांबळे साहेब कधी तरी आमच्या येथे या आम्हाला भेटा पण तुम्ही आला नाहीत. आणि तुम्हाला विचारले तुम्ही सांगता स्लॅप रावलनगर पर्यंत पडलेला आहे कुठच्या रावलनगरला स्लॅप पडलेला आहे. रेल्वेची जे.सी.बी जेव्हा चालते तेव्हा आम्ही तेथे उभे असतो की, साहेब गटारात हा कचरा पडु नये.याची तुम्ही व्यवस्था करा आणि तुम्ही तिथेच साफसफाई करा. आणि तुम्ही म्हणता सगळे साफ झालेले आहे. ६० टक्के साफ झालेले नाही. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब, त्या दिवशी घेवुन उभे होते ना. तेव्हा ५ टक्के सुध्दा साफ झाले नसेल.

**सुधा गोयंका :-**

काल मी सुध्दा उभी राहिली होती. तेव्हा सुध्दा साफ झालेले नव्हते. काल ते पुलाजवळ होते. २० माणस कामाला लागलेली होती आणि त्या बाजुला माणस चालु शकत नाही.

**शरद पाटील :-**

२० माणस किती साफ करणार ते आम्हाला माहित नाही. आम्हाला त्याच्यातुन ४ नं.ची खडी काढायची आहे. नुसता कचरा आणि गाळ काढायचा नाही. रेल्वेची ४ नं. खडी पडलेली काढायची आहे. आणि ती काढायची एवढे सोपे नाही. कारण या साईडला रेल्वेचे काम चालु आहे. आणि दुसऱ्या साईडला भिंत आहे. ती तर बाहेर काढुन टाकली तरच ती होईल नाहीतर आज काढली आणि उद्या परत पडणार आहे.

**शुभांगी नाईक :-**

महापौर मॅडम, एका साईडला रेल्वेचे काम सुरु आहे.आणि एका साईडला रेल्वेचे काम सुरु आहे. आणि एका बाजुला बांधकामाचे काम सुरु आहे.काल पाउस पडला होता तेव्हा पटरीच्या वर पाणी येवुन तो पुढे वाहत होता.

**परशुराम पाटील :-**

या गटारांचा शेवट कुठे आहे? ते तुम्ही आम्हाला सांगु शकाल. या गटाराचे पाणी कुठपर्यंत जाते.

**राजकुमार कांबळे :-**

केबिन रोडच्या गटाराचे तुम्ही बोलता ना. केबिन रोडच्या येथे जे कल्वर्ट आहे तिकडुन जात होते आणि टाकीच्या मागुन ओव्हर फ्लो झाला. तरी ते तिकडुन जाते.

**परशुराम पाटील :-**

इस्ट चे पाणी वेस्ट ला येते. ते बरोबर आहे. मग, तुम्ही रेल्वेच्या गटाराची साफसफाई केलेली आहे.

**राजकुमार कांबळे :-**

मध्यंतरी रेल्वेचे काम झाले ना ……

**परशुराम पाटील :-**

मग, असे म्हणा ना.

( सभागृहात गोंधळ )

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, सभी सदस्यो से विनंती है। की, एक – एक करके बोलिए।

**राजकुमार कांबळे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आता सध्या पाण्याच्या टाकीजवळ जे कल्वर्ट आहे. ते जास्तीत जास्त चोक - अप होते. तर त्याला जास्तीत जास्त मॅन्युअली किंवा सळी वगैरे घालुन मोठा पर्यंत करण्याचा प्रयत्न करु बाकी दुसरे काही करु शकत नाही. आणि आरोग्य विभागाकडुन काही होवु शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

मी आरोग्य विभागाला पत्र दिलेले आहे. शहर अभियंताला पत्र दिले आहे. तर सळ्या खालुन पाणी जाते. तर तो मोठा होईल का?

**राजकुमार कांबळे :-**

मोठा नाही. जेवढे चॉकप वगैरे असेल तेवढे काढायचे.

**शशिकांत भोईर :-**

चौकप वगैरे काढुन मिरा भाईदरचे पावसाचे पाणी पुर्ण जाणार का?

**राजकुमार कांबळे :-**

मला मान्य आहे ना. आरोग्य विभागाकडुन साफसफाई केली.

**सुधा गोयंका :-**

२४ घंटा पाणी गिरेगा तो आदमी उधर खडे रहके चॉकप निकालता रहेगा क्या? ८ दिन तक लगातार बारिश गिरा तो आप कैसे बाते करते हो यह मिरा भाईंदर महानगरपालिका है। आप तो ग्रामपंचायत के जमानेके नाले की बात कर रहे है।

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, महत्वाचे जे काम आहे. त्यात सळी वगैरे घालुन ते वाढवणार नाही. तिथे सिंमेट ब्लॉक आहे. तो ब्लॉक तुम्ही काढला नाही. साहेब तुम्ही निवेदन केले होते. की, सिंमेट ब्लॉक आहे तर ते गटारा काढायला लागेल. ही लक्षवेधी ज्या वेळेला चर्चा केली होती. आणि तुम्ही उत्तर दिले होते. की, पाणी जामचा रस्ता मोकळा करण्यासाठी आपल्याला सिंमेट ब्लॉक काढायला लागेल. आजच्याही दिवसात तो सिंमेट ब्लॉक निघालेला नाही. मग ते नाही निघणार तर पाणी कसे जाईल. कांबळे साहेब बोलतात सळीने काढणार तर सळीने पाणी निघणार का? एक ठोस काम घेतले. ठोस काम केले तर लोक आपल्याला धन्यवाद देतील ना.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आप से एक ही रिक्वेस्ट है। की, सभा समाप्त होने के बाद आप और मा. आयुक्त साहेब और कांबली साहेब जरा वहाँ का नजारा देखने के लिए चलीए। वहाँ की क्या पोजिशन है।

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, जेव्हा कांबळे साहेब तिथे कधी बघायलाच आले नाही. की, गटार कसे साफ होते तर कसे काय व्हायचे ते सांगा ना अधिकारी म्हणुन आपण त्यांची नियुक्ती केले आणि त्यांना मी १५ दिवस अगोदर बोललो होतो की, तुम्ही या नाला बघा पण त्यांनी काही बघितले नाही. आणि सांगतात की, ६० टक्के नाला साफ झालेला आहे. कितपर्यंत स्लॅप आलेला आहे. तर रावलनगर पर्यंत स्लॅप आलेला आहे. आणि तो स्लॅप कुठपर्यंत पडलेला आहे. ते आम्हाला माहित आहे त्यांना माहित नाही.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, इतकी चांगली चर्चा या शहरामध्ये होते की, नालेसफाई करोडो रु. आपण नालेसफाईला घालवतो. ते पण उन्हाळा संपता संपता पावसाळ्याच्या सुरुवातीला त्याचा काहीही फायदा नसतो आणि सळ्या घालुन जर नाले साफ होत असते तर हा हसण्याचा प्रश्न आहे. पण, हा विनोदाचा भाग जर सोडला ना तर खरच आपल्या अधिकाऱ्याने उत्तर देतांना थोडस कर्तव्य वागायला पाहिजे होते. त्यांना खुप वर्षाचा अनुभव आहे. मला एकच म्हणायचे की, आपण करोडो रु. फुकट घालत असतानां आपल त्याच्यावर नियंत्रण का नाही? एक नियंत्रण समिती नेमा. पुढच्या भविष्यासाठी त्याच्यावर तुमचे कंम्प्लीटली नियोजन आणि नियंत्रण पाहिजे. या शहराचा संपुर्ण प्रश्न मिटवायचा असेल तर तुम्ही नियोजन समिती गठीती करा नगरसेवकांन सहित मा.महापौर सहित, मा. आयुक्तांसहित किंवा मा. उपायुक्तांनी त्याच्यावर अधिकारी नेमला पाहिजे. आणि प्रत्येक रस्त्याचा, प्रत्येक गटाराचा प्रत्येक नाल्याचा रोजचा रोज तुम्हाला आढावा मिळायला पाहिजे तरच या शहराची नालेसफाई व्यवस्थित पणे होईल.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आपको और सब्जेक्ट लेने है। इसका जल्दीसे जल्दी खुलासा करिए ना नही तो एक ना एक जन बोलते ही रहेगे।

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, नाले सफाईचे काम कुठपर्यंत आले. प्रत्येक वॉर्ड मध्ये म्हणजे वेस्टमध्ये, ईस्टमध्ये, काशिमिरा, मिरारोड ........

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आता एवढी चर्चा सभागृहात नालेसफाईबाबत झाली. तर आता आपण काम करुया. जावुन बघुन येवु या सर्व सदस्य पण बघायला तयार आहे.

(सभागृहात गोंधळ)

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ही सभा येथे तहकुब करा. आणि नालेसफाई आढावा घ्या.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, मेरा मुद्दा नालेसफाई का नही। वहाँ से पाणी निकालने का रस्ता नही है। उधर रस्ता बनाया जाए वह मुद्दा है।

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्या सुधा गोयंका मॅडम, आपल्याला भरपुर सांगतात. अजुन त्यांना रुलिंग मिळत नाही. त्यांचे समाधान झाले पाहिजे. ॲक्चुली तो नाला अजुन साफ झालेला नाही. ज्यांना ज्यांना ठेका दिलेला आहे. त्या ठेकेदाराला बोलवुन किंवा त्याच्या बरोबर पाहणी करु आपण स्वतः महापौर आहात तुम्ही स्वतः जर फिरलात तर आपण सगळे पण फिरवु. मी, तुम्ही, आणि अधिकारी आणि कॉन्ट्रक्टर वाले यांना घेवु? नालेसफाईची पाहणी करायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृहात चर्चा होत असतानां सर्व सदस्यांनी शहरातील पावसाळा पुर्वी होणारे नालेसफाई आणि काल पडलेला पाउस. यामुळे ठिकठिकाणी पाणी साचलेले आहे. त्यानुसार सभागृहामध्ये नालेसफाईचा विषय मोठ्याप्रमाणात रंगलेला आहे. सभागृहाच्या सर्व सदस्यांना मी विनंती करते की, आपण एक तासानंतर म्हणजे सहा वाजता. नालसफाई दौरा आणि सन्मा. सदस्या सुधा गोयंका सांगतात. की, जो तुंबलेला नाला आहे. त्याठिकाणी आपण प्रत्यक्ष पाहिल्यावर आपल्याला काय उपाययोजना करता येईल. ते कळेल त्यामुळे ७.०० वाजता आपली सभा संपल्यानंतर सर्व सदस्य नालसफाई दौऱ्यावर जावु.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. मला चेना बद्दलचा खुलासा हवा. मॅडम, महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, अजित पाटील यांना विचारा की, काय कारवाई केली? अजित पाटील साहेब, चेनाची कारवाई काय केली ते जरा सांगा? पावसाळ्यामध्ये एकदम हानीकारक होणार आहे. ते सगळ तुमच्या अंगाशी येणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझी एक सुचना आहे. येत्या पावसाळ्यामध्ये भाईंदरमध्ये किंवा कुठल्याही परिसरामध्ये पाणी तुंबणार नाही. याचे ठेकेदाराने आश्वासन द्यावे आणि ह्यांचे पेमेंट पावसाळ्यानंतर करावे. अशी माझी सुचना आहे. जर कुठल्याही प्रभागात ज्या ठेकेदाराने काम केले नसेल तिथे पाणी तुंबले असेल तर त्यांचे पेमेंट करु नये अशी रुलिंग द्या.

**सुधा गोयंका :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील साहब ने जे शब्द बोले उसे मे सहमत हुँ।

**प्रभात पाटील :-**

मला एकच सुचना करावीशी वाटते. आपण जर उद्या नालेसफाई दौऱ्यावर गेलो. मी तिथे असेल नसेल. तरी मी तुम्हाला एक सुचना सांगते की, सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांच्या वॉर्ड आहे. आणि इतरांचे ही वॉर्ड असतील जिथे उघाड्या बंद झाल्या तिथे झोपड्या वसल्यात. त्या भागाची जरुर पाहणी करा. कारण, शहरातले पाणी वाहुन नेण्याचा तो मार्ग आहे. आणि तोच मार्ग शहरामध्ये बंद झालेले आहे. त्याच्यावर कारवाई करणे पण आवश्यक आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, गेल्या मिटींगमध्ये पण सांगितले होते. जय अंबे इंडस्ट्रीअल इस्टेट त्या नाल्यावर बफिंगचे कारखाने झालेले आहेत. तिथे अतिक्रमण झालेले आहे. ते अजुनपर्यंत काढलेले नाही.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रभागामध्ये नाल्यावर एस.एन कॉलेजची इमारत आहे. पुर्ण गावातुन तो नाला गेलेला आहे. आणि तो नाला साफ करायलाच मिळणार नाही. तुम्ही कसा करणार? १००, १५० फुटाचे डिस्टन्स आहे. त्याच्यात माणुस पण तुम्हाला मोजुन सोडावी लागणार आहे. १० पैकी ८ येईल की, नाही ती शाश्वती नाही. तो नाला कसा साफ करणार आणि तो नाला जर साफ करणार नाही तर संपुर्ण गाव बुडणार आहे. तिथे जाळी सुध्दा ठेवलेली नाही. काहीही ठेवलेले नाही.

**अजित पाटील :-**

पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्य परशुराम पाटील यांनी २०, २५ दिवसापुर्वी मला चेनाच्या नालेच्या जागेमध्ये भरणी केल्यामुळे तक्रार केली होती. त्या दिवशी आम्ही त्याची पाहणी केली. चेनाच्या नाल्याचा जो मार्ग आहे तो २० ते २२ फुट रुंदीचा होता. त्याच्या मध्ये बिल्डरने भरणी घालुन ३, ३ फुटाचे दोन पाईप ठेवलेले आहे. परंतु तिकडच्या पाण्याचा प्रवाह विचारात

घेता पाणी तिकडे जाणार नाही. तिथे २२ फुटाचा नाला खणणे आवश्यक आहे. ६ फुटाचा पाणी जाणार नाही. म्हणुन आम्ही आरोग्य निरिक्षकाला खोदाई करण्याचे आदेश दिलेले अहो. तीन चार दिवसात आम्ही खोदाई करुन टाकु.

**परशुराम पाटील :-**

नक्की होणार.

**अजित पाटील :-**

हो नक्की होणार.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला उत्तर द्या. की, तो नाला कसा साफ करायचा. तो नाला साफ करायचा तो नाला साफ झालाच पाहिजे.

**मा. महापौर :-**

सर्व विभागातील किती नाले सफाई झाले याचा दौरा आपण सर्व करुया.

**लिला पाटील :-**

मॅडम, कधी? आज यायचे की, उद्या?

**मा. महापौर :-**

मा. महासभा झाली की, आजच जावुया.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, की राई गावातुन जाणारा नाला हा आदर्श शाळे जवळुन जातो. तिथे साफ कोसळलेले आहे.

**मिलन पाटील :-**

मॅडम, उद्या १२.०० वा. ठेवु द्या.

**संगिता म्हात्रे :-**

तर तो नाला साफ करण्यात यावा. तेथुन विद्यार्थी शाळेत जातात.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, मेरे पास ओम पुष्पक बिल्डींग के बाजु का बडा वाला नाला है। उसका रेकॉर्ड ही है। अपने माहनगरपालिकाके के लोग हाथ से मट्टी निकालते है। ५ फुट, बिच नाले है। वह लेकिन जब खडे होते है। तब मालुम पडता है। की, एक फुट इनलोग निचे गये है। और हमलोग करोडो रुपये का टेंडर इसका पास करते है। अपने पास साफसफाई के लिए एक भी अवजार नही है। यह लोग हात से कैसे निकाल रहे है। वह आपको दिखाना चाहता हुँ। मॅडम, ५ फुट, इंच नाला है उपर - उपर हात से वह मट्टी निकाल रहा है। वह कबतक साफ होगा। हमलोग इतना पैसा खर्च करते है। इतना टेंडर देते है। लेकिन एक भी अवजार युज किया नही जाता। हमारे महानगरपालिका के लिए वह शरम की, बात है।

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, ९० फिटला टेंम्बा हॉस्पीटल आहे. तिथे आता एक थिएटरचे निर्माण चालु आहे. त्याच्या बाजुला टेम्बा हॉस्पीटलच्या मागे एक नाला होता. तिथे जे थिएटर चे काम चालु आहे. ते विझवुन झालेले आहे. कुदरती नाला बंद करुन ते बांधकाम झालेले आहे. दुसरे राधास्वामी संत्संग येथे एक कुदरती नाला होता. तिकडे ही तो नाला बंद झालेला आहे. आपण तेथे दौऱ्यावर जावु. पाहणी करु. आपण मा. महासभेमध्ये चर्चा करुन टेंडर ही पास करतो. टेंडर निघाल्यानंतर ठेकेदार ठेके घेतात. परंतु, मॅडम, आपण दौऱ्यावर जावुन ते सर्व बघुन त्याच्यावर काहीही परिणाम होणार नाही. कारण, ज्या लोकांना आपण ठेके दिलेले आहे. मी पाहिलेपण सुध्दा बोलली. आपल नैचरल नालेवर बांधकाम झाले तिथे थिएटरवाल्यांनी त्या नाल्यावर बांधकाम केलेले आहे. राधास्वामी सत्संगच्या येथे सुध्दा नॅचरल नाला होता. तो ही बंद झालेला आहे. आपल्या एस.आय. नी मला ही कल्पना दिलेली आहे. की, मॅडम, तिकडे असे असे झालेले आहे. तर पाणी कसे जाणार? आपल्या जाफरी खाडी कडचा एंड आपण साफ करुन घेतले नाही तर संपुर्ण वेस्ट पाणी मध्ये बुडणार आहे. आपण नुसते बोलतो. भांडतो एकमेकांवर आपण आरोप पण करतो. परंतु, प्रशासन टेंडर देते. टेंडर घेणारे ठेकेदार हे फक्त ठेका घेतात. त्यांच्याकडे कुठलाही इक्वीमेंट नाही. कुठलेही साधन नाही. फावडे नाही, घमेले नाही. नुसते माणसे आतमध्ये उतरवतात. २० माणसे मिळुन एवढा मोठा नाला कसा साफ करणार? त्यांच्याकडे जे.सी.पी नाही. लॉरी नाही. आपण जावुन काय पाहणी करणार ते मला सांगा.

**राजकुमार कांबळे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो भाईंदर वेस्टला एक जे.सी.बी. आणि एक पोकलन आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आपली धुवा फवारणी, औषध फवारणी कधी होणार ते मला आधी सांगा. कारण, मॅडम हिसाबाच्या बाहेर मच्छर आलेले आहेत.

**राजकुमार कांबळे :-**

सोमवार पासुन चालु होणार आहे.

**नयना म्हात्रे :-**

ठिक आहे.

**राजकुमार कांबळे :-**

भाईंदर पश्चिमला २२ मजुर आहे. एक जे.सी.बी एक पोकलन एक बोट आहे.

**रिटा शहा :-**

नालसफाई म्हणजे भाईंदर वेस्टचे सर्व नाल्यावर तुम्ही फक्त २२ मजुर ठेवले. मग २२ मजुर मिळुन काय करु शकणार? एक जे.सी.बी आहे. पण मॅडम, माझ्या समोरची गोष्ट करु मी सकाळी ८ वाजल्यापासुन ते संध्याकाळ ६.३० वाजेपर्यंत बसली होती. फक्त एक लॉरी कचरा काढुन ठेवलेला होता.

**राजकुमार कांबळे :-**

जाफरी खाडी ही पुर्ण रुंद करुन घेतली आपल्याला जर बघायचे असेल तर आपण उद्या वेळ द्या. मी तुम्हाला दाखवतो.

**रिटा शहा :-**

साहेब, तुमच्याकडे एक जे.सी.बी आणि २२ मजुर तर तुम्ही कसे नाला साफ करणार. भाईंदर वेस्टला नाले किती आहेत ते तुम्ही मला सांगा.

**राजकुमार कांबळे :-**

ठिक आहे. मी माणसे वाढवतो.

**रिटा शहा :-**

भाईंदर वेस्टला नाले किती आहेत?

**राजकुमार कांबळे :-**

भाईंदर वेस्टला भरपुर नाले आहेत.

**रिटा शहा :-**

भरपुर नाल्यावर २२ माणसे काय करतात...

**राजकुमार कांबळे :-**

ज्या ठिकाणी मशिनरी जाते त्या ठिकाणी मशिनरी करते . ज्या ठिकाणी मजुर आहे त्या ठिकाणी .......

**रिटा शहा :-**

जे.सी.बी एकच आहे. तुम्ही कुठल्या ठिकाणी पाठवणार आणि कुठच्या ठिकाणी पाठवणार नाही.

**राजकुमार कांबळे :-**

कच्च्या नाल्यावर पोकलन लावलेले आहे.

**रिटा शहा :-**

साहेब, माझ्या नजरे समोरची गोष्ट आहे. एका तासात फक्त एक लॉरी कचरा गेलेला आहे. आणि त्यानंतर ते तिकडे साफ करायला आले पण नाही.

**राजकुमार कांबळे :-**

मी उद्या प्रत्यक्षात तिकडे येतो.

**रिटा शहा :-**

उद्या सकाळी येवुन बघणे हे ते आता सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील यांनी जेव्हा मुद्दा उचलला की, ह्यावेही मिरा भाईंदर शहरामध्ये पाणी तुंबले तर सर्व ठेकेदाराचे ठेके रद्द करुन त्यांचे बिल द्यायची नाही.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, अभी जैसे कांबले साहब ने बोला की, मी माणसे लावतो. तर माणस आणणार कुठुन. गटर पर काम करने के लिए लगाते है तो वॉर्ड की सफाई होती नही।

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. मगाशी मी आपल्याला सांगितले की, ज्या ज्या प्रभागामध्ये पाणी तुंबले किंवा पावसाचे पाणी साचले त्या प्रभागाचे जो कोणी ठेकेदार असेल. त्यांना आपण पेंमेट करु नये असे तुम्ही रुलिंग द्या.

**शरद पाटील :-**

प्रत्येक वेळेला साफसफाई होत नाही. आणि त्यांना फुकटचे पेंमेट दिले जाते. साफसफाई होत नाही. तेच पैसे आपण ज्यांच बुडलेले घरे असतील त्यांना देवु.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह, सन्मा. सदस्य गेल्या वर्षी २६ जुलै सारखी परिस्थिती पुन्हा या शहरावर येवु नये. म्हणुन सर्व सदस्यांनी ह्यावेळेस नालसफाई पुर्वरत व्हावी. चांगली व्हावी. आणि या शहरात कुठल्याही वॉर्डमध्ये पाणी भरु. नये म्हणुन सभागृहाच्या सर्व सदस्यांनी ह्या विषयावर पुर्ण पणे तोंडसुख घेतलेले आहे. आणि काही सदस्यांनी अशी मागणी केलेली आहे की, ज्याठिकाणी पाणी भरेल त्याठिकाणी त्या ठेकेदाराचा पेमेंट देण्यात येवु नये. मा. आयुक्त साहेबांशी चर्चा केल्यानंतर मा. आयुक्त साहेबांनी त्याचा दुजोरा दिलेला आहे. आणि आपल्या बरोबर तीन अधिकारी काम करण्यास तयार झालेले आहे. तर, अशा प्रकारे ज्याविभागामध्ये जे ठेकेदाराला जे काम दिलेले आहे. अशा प्रकारे ज्या विभागामध्ये जे ठेकेदाराला जे काम दिलेले तर, आपण त्याचे पेमेंट थांबवु आणि त्याचे पेमेंट देण्यात येणार नाही. त्यामुळे ठेकेदाराला येथे अडवल्यामुळे काम अगोदरच आपले चांगले होईल गटारे आपण अपेक्षा धरु.

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम, आणखीन एक गोष्ट की, पण प्रभागामध्ये पाणी तुंबेल किंवा ज्यांच्या घरात शिरले दुकानात शिरले, तर ते पेंमेट देवु त्या लोकांना डायव्हर्ट करुन घ्या.

**मा. महापौर :-**

१५ दिवसांपुर्वी नालेसफाई सुरु झालेले आहे. त्याला कुठल्याही प्रकारचे पेमेंट देणार नाही. मा. आयुक्त साहेब, तसे त्यांची पुर्णपणे दक्षता घेतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, एकतर तो कचरा काढतात आणि चार दिवस सुकवायला ठेवतात. साहेब, तो कचरा एक दोन तासात उचलला पाहिजे. चार चार दिवस कचरा सुकवायला ठेवतात. टाकला की एक तासामध्ये त्याला पेंमेंट बाजुला घेवुन उचलला पाहिजे. आमच्या वॉर्ड मध्ये भाईंदर मध्ये, प्रत्येक वॉर्ड मध्ये चार चार दिवस झाले कचरा पडलेला आहे.आणि काल पाउस पडला तो कचरा पुन्हा ओला झाला. त्यामुळे डेंग्यु हा आजार होतो. म्हणुन तुम्ही ताबडतोब तो कचरा उचलायला सांगा ओला कचरा असेल तर ओला उचला.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही गेल्या वेळेला एक रुलिंग दिले होते. "जय अंबे'' इंडस्ट्रीअल इस्टेट त्यांच्या नाल्यावर अतिक्रमण झालेले आहे. ते अजुन हटवलेले नाही. आपण तसे रुलिंग दिले होते की, ते हटवण्यात यावे. त्याच्यावर संडास पण बांधलेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

एक सुचना आणखिन आहे. ठिकठिकाणी रिपेरिंगचे काम चालु आहे. आणि लोक घरातले रेबिट उचलुन ठेवतात. त्या रेबिट मुळे चुहेंचा प्रकोप जास्त होत चालला आहे. आपल्याकडुन कोणी रेबिट उचलायला जात नाही. नाही तर त्याच्यामुळै दुसरे रोग तयार होईल. मॅडम, मुंबईमध्ये उंदीर पकडण्यासाठी १० रु. कि, ११ रु. ठेवलेले आहे आणि उंदीर तिकडे पडतात. नाहीतर तिकडे प्लेग हा रोग होईल. रेबिट उचलण्यासाठी अलग गाडी लावा. आणि उंदराचा बंदोवस्त करा.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते सिल्व्हर पार्क येथे पावसाळा येण्याआधी पाणी भरलेले आहे. १५ दिवस आधि सिल्व्हर पार्क येथे गुडघ्या एवढे पाणी भरलेले होते.

**धनराल अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही रेबिटसाठी सांगा ते रेबिट उचलत नाही.

**सुरेखा गायकवाड :-**

शांतिवन मधला जो नाला आहे. तो बिल्डरने बुझवलेला आहे. त्यामुळे तेथे पाणी साचलेले होते. मॅडम, आपण त्या बिल्डर वर कारवाई काय करणार? गेल्यावेळेस सुध्दा मा. महासभेत मी हा सिल्व्हर पार्कचा प्रश्न उचलला होता. चार वर्ष झाले. तरीपण आपण त्या बिल्डरवर काय कारवाई केली नाही. आणि तेथे नाला सुध्दा बांधलेला नाही तसेच विजय पार्क जांगिड इस्टेट येथे सुध्दा काशिगांवातुन पाणी येते. आणि लोकांच्या घरात चार ते पाच फुट पाणी असते. गेल्यावेळेला मी साहेबांना फोन केला होता. साहेब, स्वतः आले होते. तर यावेळी अशी घटना घडू नये म्हणुन आपण काय उपाय योजना केलेली आहे.

**अजित पाटील :-**

सिल्व्हर पार्क ते शांतिवन गटाराचे तुम्ही सांगता ना.

**सुरेखा गायकवाड :-**

हो.

**अजित पाटील :-**

सन्मा. सदस्य सुरेखा गायकवाड यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. सिल्व्हर पार्कच्या येथुन रोड क्रॉंसीग करुन नगरपालिकेने उघाडी बांधलेली आहे. आणि उघाडीच्या पॅरलल असा नैसर्गिक नाला आहे. नैसर्गिक नाला हा गेल्यावर्षी फोडला होता. यावर्षी बिल्डर ने पण भरणी केली होती. नगरपालिकेचा नाला खोदायला प्रतिबंधक होता. तो नाला नगरपालिकेने पोलिस संरक्षणामध्ये साफ केलेला आहे. आणि सिल्व्हर पार्कच्या येथे पाणी जाण्यासाठी शेवटपर्यंत सफाई केलेली आहे

**सुरेखा गायकवाड :-**

विजय पार्क आणि जांगिड गोकुळ धाम येथील आपण कारवाई काय केले? गेल्यावर्षी सुध्दा पाणी भरलेले यावेही सुध्दा पाणी भरण्याची शक्यता आहे. सिल्व्हर गार्डन येथुन एक नाला काढायला पाहिजे होता. तर आपण कधी काढणार आहात?

**अजित पाटील :-**

विजय पार्क न्यु वसुंधरा बिल्डींग आहे. तेथे गेल्यावर्षी पाणी तुंबले होते. पाणी तुंबलेल्या रोड क्रॉसिंग करुन त्याची उघाडी नगरपलिकेने बांधलेली आहे. त्याच्यानंतर न्यु वसुंधरा ते शगुन हॉटेल तिथपर्यंतचा नाला नगरपलिकेने साफ केलेला आहे. आणि शगुन हॉटेल ते पोलिस चौकी इथपर्यंत सुध्दा नाला साफ केलेला आहे. तिथे पाणी तुंबणार नाही.

**सुरेख गायकवाड :-**

साहेब, गेल्या वर्षीसुध्दा आपण ते खोदुन घेतले होते. त्याच्यावर काही कारवाई नाही. परंतु, ते भरणार तर हे काय चालु आहे. म्हणजे आम्ही प्रत्येक वेळेला फोन करत रहायचे का?

**अजित पाटील :-**

गेल्यावर्षी तिथे उघाडी नव्हती. उंच रोड होता उघाडी तिथे बांधलेली आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

साहेब, मी चार वेळा खांबित साहेबांना गेल्या मा. महासभेत बोलले की, ते गटार बांधा दोन वर्ष झाले नारळ फोडुन आता कुठे गटार बाधुंन झालेले आहे.

**अजित पाटील :-**

न्यु वसुधंरा बिल्डींगच्या तिथे उघाडी बाधंलेली आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, मेरा यह विनंती है की, मच्छर की फवारणी करने के लिए कहो और अपने डेप्युटी कमिशनर शेख साहेब उनको भी मुझे कम्प्लेंट आया। आप सभापती हो मेरे घर के आजुबाजु में कितने मच्छर है।

**मा. महापौर :-**

शहरामध्ये ठिकठिकाणी पडलेले जे रेबिट आहे. ते घरातील कामे केल्यानंतर रस्त्यावर आणुन टाकतात. सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल यांनी जे सांगितलेले आहे ती सुचना नमुद केलेली आहे. आणि तशाप्रकारे कारवाई होईल.

**प्रभात पाटील :-**

या शहरातील नालेसफाई या शहराचे वाहुन जाणारे सांडपाणी या संपुर्ण प्रकाराला जबाबदार असणार आहे. प्लास्टिक पिशव्यांचा प्रार्दुभाव या विषयावर आपण काहीच बोलत नाही. संपुर्ण शहरामध्ये पाणी चॉपक होत असेल आणि शहराची घाण होत असेल तर ते प्लास्टिकच्या पिशव्यामुळे मुंबई महानगरपालिकेने करोडो रु. च्या पिशव्या जप्त केल्या आपल्या लोकांनी विषयावर कधी लक्ष घातले

का? मा. आयुक्त साहेब, या विषयाकडे आपण लक्ष घातले नाही की, शहरातला पाणी निचरा आणि नालेसफाई यामध्ये महत्वाचा घटक म्हणजे प्लास्टीकच्या पिशव्या. या बाबतीमध्ये शहरात कोणतीही कारवाई होत नाही. मुंबई महापालिकेने गेल्या महिन्याभरात धडक कारवाई करोडो रु. चा माल जप्त केलेला आहे. तर आपल्याकडे सुध्दा तशी कारवाई होणे आवश्यक आहे. अजुनही वेळ गेलेली नाही तर त्या निमित्ताने आपल्या अधिकाऱ्यांना तशा सुचना द्या.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. जो भाईंदर पुर्वेचा, मिरारोडचा स्टॉम वॉटर ग्रेनाईटचा जो प्रश्न आहे तो गंभीर आहे. या ठिकाणी मला नाईलाजाने बोलावे लागते. की, गेले दोन वर्ष, अडीच वर्ष, दिड वर्ष ही सगळी टोलवाटोलवी चाललेली आहे. आरोग्य खात्याचे अधिकारी बांधकाम विभागाकडे ढकलतात. बांधकाम विभागवाले कमिशनर कडे ढकलतात. आणि कोणाला तरी मिळाले. नाही तर उपआयुक्तांकडे सर्व जाते. मा. आयुक्त साहेब, खरंच ही चिंतेची गोष्ट आहे. या सभागृहामध्ये भाईंदर पुर्वेच्या, पश्चिमेच्या आणि मिरारोडच्या प्रश्नाबद्दल सातत्याने दरवर्षी प्रत्येक सभेला चार सभा आड ही सभा होत आहे. की पाणी तुंबणार आहे आणि गाव बुडणार आहे. ह्या बाबतीत प्रशासनाने अंर्तमुख व्हायला पाहिजे. प्रशासन आमचे आहे. सत्ताधाऱ्यांचे आहे. हे किती ही खंर असेल तरी प्रशासनाने आपली जी तटस्थ भुमिका आहे. आपला जो थोडासा ढिसाळपणा आहे. ते आता सोडायची वेळ आलेली आहे. अदर व्हाईज या शहरांचा करोडो रु. चा निधी आपण या कामावरती वापरु. तो फुकट जातो. नागरिकांना त्याचे फळ मिळत नाही. फळ दिसत नाही म्हणुन मी मा. महापौरांच्या माध्यमातुन मा. आयुक्त साहेबांना विनंती करतो. की, ही जी नाले सफाईची गोष्ट आहे ती अतिशय गांर्भियांने घ्यावी. आज संध्याकाळी ७.०० वा. जागेवर पाहणी करुन येण्यापेक्षा उद्या सकाळी ९.०० वाजेचा मुहुर्त खुप चांगला आहे तर ही भेट उद्या ठेवली तर अति उत्तम होईल. कारण, आपण पुन्हा अंधारात जावुन पाहणी केली तर पुन्हा आपल्या बद्दल पेपरमध्ये रकानेच्या रकाने येतील. की, ही अंधाधुदी आहे. काळोखाचे साम्राज्य आहे. आणि सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी ने फक्त १५ मिनीटासाठी उपस्थित केलेली जी लक्षवेधी आहे. तिचा आपण शेवट करावा. आणि पुढच्या विषयाला सुरुवात करावी. अशी आपल्याला नम्र विनंती आहे.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदय, शितल नगरला जे पाण्याची पाईप लाईन लावली त्यामुळे गटाराचे पाणी जात नाही. तर, ते काम कधी करणार. आज झंकार नाल्याला दोन वर्ष झाले.

**मा. महापौर :-**

आपण उद्या सकाळी पाहणी करायला जावु. त्यानंतर तिथेच .......

**एस. ए. खान :-**

आमची झालेली पाहणी आहे. तिथे पाण्याचे पाईप आहे. झंकार नाल्याचे पण दोन अडीच वर्ष झाले. अजुन सुध्दा पाण्याचे पाईप लाईन काढलेली आहे. तुम्ही आता रुलिंग देणार की, आश्वासन देणार काय ते सांगा.

**मा. महापौर :-**

प्रत्यक्ष जागेवर पाहणी केल्यानंतर आपल्याला तिथे आयडीया येईल. आणि सध्या आरोग्य विभागाने त्या पध्दतीने काम चालु सुध्दा केलेले आहे. आपण तिथे त्या जागेवर गेल्यानंतर तशी आपण सुचना करा.

**एस.ए.खान :-**

आरोग्य विभागाचे ते काम नाही. ज्याचे काम आहे त्या डिपार्टमेंटनी काय भुमिका घेतलेली आहे? आणि काम कधी करणार?

**मा. महापौर :-**

तो विषय या विषयाला जोडु नका. नंतर विषय येईल. तेव्हा मी तुम्हाला ५ मिनीट देईल. तेव्हा बोला. सचिवांनी पुढील विषयाला सुरुवात करावी. सर्व सन्मा. सदस्यांनी ज्या नाले सफाईबद्दल ज्या सुचना मांडलेल्या आहेत. त्या सगळ्यांच्या सुचना आपण घेउया उद्या सकाळी ९.०० वाजता महानगरपालिकेच्या जागेवर या तेथुन आपण नालेसफाई दौरा ठेवु या.

**उमा सपार :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते. कांबळे साहेब मी तुम्हाला काय फोन केला होता. की, दिपक हॉस्पीटलच्या समोर जी उघाडी बंद आहे. ते सोनाली हॉटेल कडुन उलट पाणी येवुन श्रीनाथ

कॉम्प्लेक्स कडे चालले तर तिथली साफ सफाई करुन घ्या. मी तुम्हाला काल फोन केला होता. तुम्ही जे.सी.बी आणुन काम अर्धवट करुन निघुन गेले. तुम्ही आम्हाला जबाब द्यां ना आणि एस.के स्टोन जवळ पाणी जाण्यासाठी जी उघाडी बंद केली ते त्रिवेदी कॉम्प्ल्याक्स मधल्या ग्राउंड रुम मध्ये घरात पाणी जावु लागले. ती उघाडी उघडा आपण तिथल्या गटाराचे काम तुम्ही लवकरात लवकर करा. ते काम कधी करणार? उघाडी किती दिवसापासुन बंद आहे. त्या नाल्याचे काम अजुन पुर्ण झालेले नाही.

**राजकुमार कांबळे :-**

काल आम्ही क्रॉसिंग केले. तिकडे काम चालु आहे.

**उमा सपार :-**

किती महिने झाले. अजुन तिकडे काम होत नाही. खालच्या लोकांना किती त्रास होतो ते आम्हाला रोज फोन करतात. आम्हाला जबाब द्यायला लागते. तिथे तुम्ही जबाब देत नाही.

**राजकुमार कांबळे :-**

गटाराचे काम चालु आहे. क्रॉंसीग करुन ठेवले.

**उमा सपार :-**

ती उघाडी उद्या आणि मग, गटाराचे काम पुर्ण करा.

**राजकुमार कांबळे :-**

ठिक आहे.

**एस. ए. खान :-**

काम कधी होणार ते आधी आम्हाला सांगा. तो पर्यंत आम्ही बसणार नाही. त्यांनी पण सांगितले नालेसफाईचे काम होत नाही. अर्धवट काम चाललेले आहे.

**उमा सपार :-**

मा. महापौर मॅडम, उलट पाणी आलेले आहे. तर ते दिपक हॉस्पिटलच्या येथे उघाडी उघडा.

**मा. महापौर :-**

सदस्य खान साहेब, उत्तर देतात. ते ऐका ना.

**शिवाजी बारकुंड :-**

झंकार कंपनी, रिलायन्स हॅटकेशच्या इथली कंपनी, शितल नगर या ठिकाणचे पाईप लाईन काढण्याचे पाईप सर्व अस्मिता टाकीवर आलेले आहेत. आणि काम चालु आहे. रिलायन्सच्या इथले फायलिंगचे काम झालेले आहे. पाईप गॅपचे काम झालेले आहे. साईड वरती सर्व पाईप आलेले आहेत. आणि पाच सात दिवसांत झंकार कंपनी, शितल नगर नाल, हटकेश इथले सगळी कामे पुर्ण होतील.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांनी उद्या सकाळी नाले सफाई व नाले खोदाईचा आढावा घेण्यासाठी प्रत्यक्षात बोलवलेले आहे. पण, माझी अशी सुचना आहे. की, त्याच बरोबर अधिकारी प्रशासन सुध्दा घ्या. कारण, मी हे जाणुन बुजुन का सांगतो. की, प्रभाग समिती ३ च्या अंतर्गत मी स्वतः तिकडची साफसफाईची पाहणी बघायला गेलो होतो. ज्या जिथे पाणी तुंबलेले आहे. तर जे.सी.बी ला खोदून दुसऱ्या ठिकाणी काढले जाते. एखाद्या ठिकाणी एखाद्या बिल्डींगचे मार्ग अडवलेले आहे. पाणी जाण्याचे ते खोदले जाते आणि दुसऱ्या फ्लोरला पाणी जाण्याचे सरळ अशी लाईनचे नाही पाणी काढण्यासाठी म्हणुन प्रशासनांचे अधिकारी आपल्या जोडीला घ्या. तरच निश्चित पाणी निघेल. त्या शिवाय पाहणी दौरा होणार नाही. अशी आपणाकडे विनंती आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे उद्या सकाळी ९.०० वाजता आपल्याबरोबर संबधित खात्याचे अधिकारी असतील.

**रतन पाटील :-**

मॅडम, प्रशासनाचे सगळे अधिकारी पाहिजे,

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मॅडम, पहले यह देखीए की, नाले सफाई के बारे मे सफिशियन्ट समय दिया गया था। २० – २५ दिन दिया था। लेकिन जिस तरह से नालेसफाई हुई बिना मशिनरीके उस तरह के आशाए के लेटर दि गये। लेकीन जो अधिकारी है, उन्होंने उधर ध्यान नही दिया। मुझे एक चिंता हो रही है। अगर आपके निर्देश और एज्युकेशन ने कितना बडा फर्क है आप निर्देश खुद देती हो। और काम कुछ होता नही। मैने याहॉ पर अभी सुना की, आरोग्य की मिटींग हुई थी। उसमे सिर्फ उक सब्जेक्ट था। शहर मे परेशानी है। तकलीफे है। मा. सभापती महोदय का सब्जेक्ट एक था। उसमे गोषवारा तीन

लाईन का था। शहर मे उसी दिन डेंग्यु बिमारी के पाच मरिज का पता चला. मैने नालेसफाई के बारे मे बताया पिछले पाँच साल मे नालेसफाई कैसे होती है। उसमे बांध बांधा जाता है। बांध बांधनेके बाद मध निकाला जाता है। पर इन्होने डायरेक्ट चालु कर दिया। कॉन्ट्रक्टरो के उपर अपने अधिकारीयो का किसीका तालमेल नही है। जो डेली साफसफाई का काम कर रहे है। वह कॉन्ट्राक्टर का काम करते है। उनको बताया की, यह सफाई वाले मजदुर जो है वह इनका क्यो काम कर रहे है। लेकीन इनके पास इनका कोई जवाब नही। आपके आरोग्य डिपार्टमेंट मे किसी तरह का कई कंट्रोल नही है। मा. सभापती महोदय, आपके मिटींग मे एक सब्जेक्ट था। उसमे गोषवारा नही था। अधिकारी भी बराबर सहयोग देते नही। चार महिनेसे आप आरोग्य समिती के सभापती है। शहर मे कितनी बडी तकलीफ है। पाणी आनेवाला है। भाईंदर मे कई ना कई प्रॉब्लेम होगी। लेकिन एक भी अधिकारी आपका साथ नही दे रहे है।

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, उद्या १०.०० तुम्ही प्रभाग क्र.३ च्या कार्यालयात या आपण तेथुन सगळे निघू.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, जेव्हा लंच झाले. त्याच्या अगोदर तुम्ही मला सांगितले होते की, तुमच्या प्रश्नाचे उत्तर मी लंच नंतर देणार पण सन्मा. सदस्य ओमप्रकाश गारोडीयाची लक्षवेधी ही सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी सांगितल्या प्रमाणे पावणे पाच वाजेपर्यंत चालली आणि त्यांनी सांगितले हात जोडुन रिक्वेस्ट केली की ते आता कुठेतरी थांबवा ती लक्षवेधी सुध्दा अती महत्वाची होती. आणि त्याच्या नंतर जी काय आरोग्य विषयावर नाले विषयावर चर्चा झाली ती पण अती महत्वाची होती. परंतु, या सभागृहामध्ये, सदनामध्ये पावणे पाच वाजवले. आपण सगळ्यांनी मिळुन वाजवले ते आपण वाया घेतलेले नाही. आपण नाल्याबद्दल आणि आरोग्यावर विषय घेतलेले आहे. आता आपल्याला सांगतात. की, सकाळी १०. ०० वाजता नालेसफाई आपण नक्की करु आणि सर्व कर्मचाऱ्यांना घेवुन जावु. परंतु, अधिकारी येणार, आपण येणार, मी येणार ,सर्व येणार.आपण नाला सफाई करु. परंतु, ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकामध्ये नगरपालिका होती तेव्हा पासुन आज महानगरपालिका होवुन पाच वर्षे झाले. परंतु, तोच कर्मचारी तीच पध्दत आणि तोच ठेकेदार १५ वर्षापासुन आहे ज्याच्याकडे माणस नाही. तो गटाराची माणस नाल्यावर ठेवतो. नाल्यावरची माणस गटारावर ठेवतो त्याच्याकडे कुठले साधन नाही. तुम्ही आणि आम्ही जावुन काय बघणार आहे? तुम्ही आणि आम्ही मिळुन तर साफसफाई करणार नाही. जी टेंडर पध्दती आपल्याकडे चाललेली आहे. पाच वर्षात आपल्याकडे कॉन्ट्रक्टर असोसिएशन निर्माण झाले. त्या वेस्टच्या नाल्याचे टेंडर आहे. फक्त चार लोक सेट होतात. आणि चार लोक टेंडर टाकतात. लोकशाही पध्दतीने टेंडर पध्दती सुरु करा. मग, नंतर या विषयावर परत बोलायला लिओ साहेबांना कारण होणार नाही. ती लक्षवेधी आणायची ओमप्रकाश गारोडीयाला गरज होणार नाही. आपल्याकडे जी टेंडर पध्दती चाललेली आहे. चार लोकांनी मिळुन टेंडर टाकायचे आणि जे फिक्सिंगचे टेंडर चाललेले आहे. त्या पध्दती बंद करा. आणि लोकशाही पध्दतीने टेंडर पध्दती सुरु करा. तुम्ही आम्ही आणि अधिकारी वर्ग तिकडे जावुन काहीच होणार नाही. त्यापेक्षा प्रेमनाथ पाटील यांनी जी सुचना केलेली आहे. की, ज्या ज्या विभागात ज्यावेळी पाणी भरले त्या त्या ठेकेदाराला पेंमेट द्यायचे नाही. मिरा भाईंदर शहरामध्ये नाल्यांचे अनधिकृत बांधकाम जे कोणी केले असेल. त्याच्या मध्ये नगरसेवक असु द्या, बिल्डर असु द्या. किंवा कुठला खासदार असुद्या. कोणीही केले असेल त्या विभागाचे अतिक्रमण विभागाचे क्षेत्रिय अधिकारी जो असेल त्याला सस्पेंड करा. साहेब, आपण असे काही रुल, रेग्युलेशन निर्माण केले. तर, या शहराचे भवितव्य सुधारणार आणि डेंग्यु, चिकनगुनिया, कॉलरा किंवा टायफाईड अशा साथीच्या रोगांना समोरे जायला गरज पडणार नाही. मॅडम, दुसरी गोष्ट अजुन जेव्हा लंच झाले तेव्हा मी तुम्हाला सर्व्हिस रोड बद्दल विचारले होते. आपण मला सांगितले की, लंच होउ द्या. त्यांनतर मला सांगितले की, लंच होवु द्या. त्यानंतर मला सांगितले की, लंच होवु द्या. त्या नंतर मला विषय काढायला वेळच मिळाला नाही. कारण सर्वांचा महत्वाचा विषय चाललेला होता. नगरसेवकाची भावना असते. सामोऱ्याला इलेक्शन येते. नगरसेवकांना ह्या पावसाळयात इलेक्शन आले. म्हणुन पाणी भरले की, पहिले नगरसेवकांना जावुन पकडणार त्याच्यामध्ये आपण सुध्दा आमच्या बरोबरीने आहात. आपण राजकीय हे जे काम चाललेले आहे. ते बंद करा. आणि मॅडम, सर्व्हिस रोडच्या अनधिकृत बांधकामाचा विषय तुम्हाला लंचच्या अगोदर विचारले होते. त्याच्यावर आपण रुलिंग दिलेले आहे. त्याच्यावर प्रशासनाने कारवाई काम केली. त्याचे मला थोडक्यात जवाब द्यावा.

**मा. आयुक्त :-**

लंच पुर्वी ते आश्वासन दिलेले होते. त्याप्रमाणे सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याच्या बाबतीमध्ये प्रशासनाने केलेली कारवाई मी थोडक्यात आपल्याला विशद करतो. की, सर्व्हिस रोड मध्ये येणारी जी बांधकामे आहेत. त्यांचा पुर्ण सर्व्हे आपण केलेला होता. त्या संदर्भामध्ये मा. महापौरांच्या दालनामध्ये एक बैठक ही झालेली होती. आणि त्यांनतर सदरचा विषय हा स्थायी समितीच्या कायद्यमधल्या तरतुदीप्रमाणे आपण स्थायी समितीच्या मंजुरीसाठी ठेवलेला होता आणि स्थायी समितीने परवाच्या सभेमध्ये त्याला मंजुरी दिलेली आहे. आणि प्रशासनाच्या मार्फेत मी सभागृहाला आश्वासन देवु इच्छितो की, कायदेशीर प्रक्रिया संपुर्ण रित्या पुर्ण करुन कुठेही लॅको एखादा राहु नये की, त्याला लॅकोनाचा फायदा कुठेतरी मिळावा तर अशाप्रकारे कूठल्याही प्रकारची त्रुटी न ठेवता आणि आपल्याला जे जे कारवाई करणे आवश्यक आहे. मग, एखाद्याला कॅबेट दाखल करणे असु द्या. किंवा नोटीसचा इश्यु करणे असु द्या. किंवा कुठलेही असु द्या. जी कामे नोटीसची मुदत संपेल ती नोटीसची मुदत आपण देवु. ती मुदत संपल्यानंतर त्याच्या दुसऱ्या दिवसापासुन त्या सर्व्हिस संपल्यानंतर कामे अनधिकृत बांधकाम ही तोडण्यात येईल आणि त्याच्यासाठी मी स्वतः त्या ठिकाणी उभा राहिल.

**रिटा शहा :-**

साहेब ते ठिक आहे. आपण बोलतो. की, कायदेशीर कारवाई त्याच्यावर होणार परंतु, माझा एक प्रश्न असा आहे की, जेव्हा मा. महापौर मॅडमचे त्याच्यावर रुलिंग झाले. सदर विषय परत स्थायी समितीमध्ये ठेवण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. माझा दुसरा मुद्दा असा आहे की, आपण २१२ खाली जी नोटीस त्यांना पाठवणार आहे. ठिक आहे ते ती मान्य करते. पण ती नोटीस किती दिवसात पाठवणार आहे? किती दिवसात कॅव्हेट फाईल होणार आहे? आणि किती दिवसांत ही प्रक्रिया पुर्ण होणार आहे? कारण आपण त्यांना कॅव्हेट दाखल करुन त्यांना हे केले तर मला असे वाटते की, दाखल करुन त्यांना २४ तासांची नोटीस द्या. त्यांना आठ दिवसांची मुदत दिली. तर लगेच.ठाणा कोर्टामध्ये जाणार आणि स्टे घेवुन येणार. पण महत्वाचा मुद्दा असा आहे की, काशिमिरा रोडवर आपण लाखो रु. खर्च केले. त्या बद्दल मी प्रशासनाला पत्र सुध्दा टाकले की,मी धरणेवर बसणार जेव्हा मी दोन वेळा पत्र टाकले तेव्हा कमिश्नर साहेबांमुळे मी दोनदा मागे घेतले परंतु, मी दि. ४/०६/२००७ रोजी परत धरणेवर बसणार असे मी आपल्याला लेखी पत्र दिलेले आहे. आपल्याला ही त्याची कॉपी दिलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

दि. ६ ला नोटीस इश्यु होती.

**रिटा शहा :-**

किती दिवसात? नोटीस म्हणजे २४ तासाची त्यांना नोटीस द्या. दोन तीन दिवसांचा अवधी देवु नका.

**मा. आयुक्त :-**

कायद्यामध्ये तशाप्रकारची तरतुद नाही परंतु, आपण एखादा असा निर्णय घेतल्यानंतर त्यांना कुठेतरी बेनिफीट मिळावा. जर असे होत असेल तर मग त्याप्रमाणे जी काय सफिशिएन्ट मुदत असेल ती आपण त्यांना तीन दिवसाची मुदत देवु या.

**रिटा शहा :-**

अजित पाटील जेव्हा अतिक्रमण विभागाचे अधिकारी होते. एका केसमध्ये त्यांना आज कॅव्हेट दाखल केले उद्या २४ तासाची नोटीस दिली. उद्या त्यांनी कॅव्हेट फाईल केले त्याच्यानंतर ही त्याला स्टे मिळालेला आहे. तर साहेब असे नसते आपण त्यांना कुठलीही संधी देवु नका. या विषयाचे गांर्भियासाठी आपण मागच्या तीन वर्षापासुन मा. महासभेत लढत आहोत की, सर्व्हिस रोड आपण फक्त एवढे विचार करायचे की, लाखो रु. आपण ह्याच्यावर एवढे खर्च केले.

**(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ३४ चे वाचन केले.)**

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आपण जो रुलिंग दिया था वह बराबर सुननेमे नही आया। रुलिंग वापस दे दो। आपके प्रोसिडिंग मे नही है।

**मा. महापौर :-**

आगे के प्रोसिडींग मे है। इस प्रोसिंडीग मे नही है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

कोळीवाडा, मटन के दुकान का लायसन्स बिना सोसायटी के एन.ओ.सी बैगेर नही देना।

**मा. महापौर :-**

ज्या प्रोसिंडीग मध्ये नमुद केलेले आहे. त्याच्यामध्ये आपण जसे सांगितले त्याप्रमाणे रुलिंग दिलेले आहे की, सोसायटीची एन.ओ.सी घेवुनच त्यांना मास विक्री परवाना देण्यात येईल.

**शिवप्रकाश भुदेका :-**

धन्यवाद.

(सन्मा.सदस्य सभागृह नेते हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र.३४च्या ठरावाचे वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपण जो आता इतिवृत्तांत मंजुर केला. त्यावर मला बोलायचे आहे. आपण बरेचसे ठराव पारित करतो. त्याची अंमलबजावणी होते की, नाही याची आपण कधी शहनिशा करत नाही. आपण जेव्हा पिठासीन अधिकारी होता. त्यावेळी आपण मा. आयुक्तांना निवेदन केले होते. आणि त्यांनी रुलिंग दिली होती की, जे पदोन्नोत्ती बाबत जे मिरा भाईंदर महापालिकेचे कर्मचारी आहे. काही कोर्टात गेले. काही न्याय मागत आहे. त्यांच्यासाठी आज मा. आयुक्तसाहेब निर्णय देणार होते. परंतु, आपल्या दालनात सभा होवुन सुध्दा तद्नंतर आठ दिवसामध्ये त्यांनी काही निर्णय दिला पदोन्नोती बाबत ह्याबाबत काही खुलासा नाही. अद्यापपर्यंत असे कर्मचारी आपल्या पदोन्नोती साठी इकडे तिकडे फिरत आहे. आमच्या नगरसेविका संगिता म्हात्रे यांनी जेव्हा हा मुद्दा प्रश्नोत्तराचा तासाच जेव्हा उपस्थित केला तेव्हा मी स्वतः त्याच्यावर बोललो होतो तर मा. आयुक्त साहेबांनी त्याच्यावर खुलासा करावा. की, आपण त्याच्यावर काय उपाययोजना आखल्या की, आपण फक्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत किंवा आपण कोणताही ठराव पारित करायचा त्यावर अमंलबजावणी होत नाही. ह्याच्यात काय कारण काय आहे. तुम्हाला पदोन्नोतीबाबत अडचण कुठे येते. ह्याचा खुलासा केला तर बरं होईल .

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, शशिकांत भोईर साहेब, संबधित माहिती मागवुन घेईपर्यंत आपण पुढील विषय घेण्यात यावा.

**शशिकांत भोईर :-**

मला फक्त एवढाच खुलासा पाहिजे. कारण, मा. आयुक्त साहेब सुध्दा छाती ठोकपणे बोलते होत. की, आठ दिवसात त्याचा निर्णय लावतो. तर त्याच्यावर त्यांनीच कारवाई केली असेल ना. कोणत्या पध्दतीने कारवाई केले ते त्यांनी सभागृहाला निवेदन करावे. कारण, मॅडम, हा इतिवृत्तांत २०/०१/२००७ चा आहे. म्हणजे आपल्याला सहा महिने पुर्ण झाले. आणि आठ दिवसाल त्याचा निर्णय लावणार होते. ते आपल्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळुन देणार होते. मॅडम, पान नं. १२, १३, १४. हे बघा. त्याच्यामध्ये पदोन्नोती बाबत बोललेले आहे. प्रशासन आपण आहात तरी सुध्दा आपण न्याय मिळु शकले नाही. मुंबई महानगरपालिके मध्ये एका नगरसेवकाचा प्रश्न बऱ्याच वर्षानंतर आला. त्यानंतर त्या प्रश्नाचे काय झाले. ते त्या नगरसेवकालाच माहिती मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेबांना विषय समजलेला आहे. की, विषय पदोन्नोती बाबत आहे. आणि या पदोन्नोतीबाबत विषय पारित केला होता. त्याबाबत त्यांनी नंतर प्रश्नोत्तराच्या तासात घेतले होते. पान क्र. १४ वर शेवटचा पॅरेग्राफ आहे. १५ वर आहे. तुमचा संपुर्ण पॅरेग्राफ आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य, शशिकांत भोईर यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या मुद्दाच्या संदर्भात मी खुलासा करु इच्छितो की, सभागृहामध्ये जी आपली चर्चा झालेली होती. त्या चर्चेच्या अनुशंगाने आपण मा. महापौरांच्या दालनामध्ये अशा अधिकाऱ्यांची बैठक अयोजीत केलेली होती. त्या बैठकीमध्ये ज्यांच्या ज्यांच्या तक्रारी आपल्या कडे प्राप्त झालेल्या होत्या त्या तक्रारीच्या बबातीमध्ये आपण सुनावणी घेतली होती. तत्पुर्वी सभागृहाने जे काही नियम मंजुर केलेले आहे. त्या नियमाप्रमाणे पदोन्नोती देण्यात आलेली होती. आणि ज्यांना ज्यांना पदोन्नोती मिळाली नाही. त्यांनी त्यांनी आपल्याकडे पुन्हा कंम्प्लेटंस दाखल केल्या होत्या. त्याच्यातली काही मंडळी कोर्टात सुध्दा गेली होती. आपण जो प्रश्न तेव्हा उपस्थित केला होता. की, एकुण किती लोक कोर्टामध्ये गेली होती. आपल्याला तेव्हाही सांगितले होते की, सहा की, आठ लोक कोर्टामध्ये गेलेले होते. ती आता प्रशासनाकडुन माहिती घेतली होती. तर त्यांनी आता सांगितले की, त्याच्यामधले आणखिन पाच कर्मचारी आहे. त्याची केसही हायकोर्टामध्ये आहे आणि त्याची तारीख ही ७ तारीख आहे. शेवटी आपण जे काही नियम मंजुर केलेले आहे. त्या नियमाप्रमाणे प्रत्येक कर्मचाऱ्याला पदोन्नोती दिलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, आपण एका ठिकाणी पदोन्नोती साठी बोलता. की, आपण हेरींग घेतली मग, जर हेरींग घेतली असेल तर हे लोक पदोन्नोतीसाठी का कोर्टात गेले आपण मा. महापौरांच्या दालनात सुनावणी घेतली होती. त्यानंतर त्यांना पत्रव्यवहार करायला सांगितले की, त्याच्यावर अन्याय झाला. त्या लोकांनी पत्र व्यवहार करा.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे कर्मचाऱ्यांनी कंम्प्लेंट केली. आपल्याकडे कम्प्लेंट केल्यानंतर त्यांचे असे म्हणणे होते की, तुम्ही आम्हाला पदोन्नोती द्यायला पाहिजे. पण मी, त्यांना असा प्रश्न विचारला की, पदोन्नोती द्यायला पाहिजे. तुमच्यावर अन्याय झाला हे तुम्ही म्हणातय, तर तुम्ही मला दाखवुन द्याना की, तुमच्यावर कशाप्रकारे अन्याय झाला. कुठला नियम डावळुन इतरांना प्रमोशन दिले आणि तुम्हाला दिले नाही.

**शशिकांत भोईर :-**

मग, ते कशासाठी भांडत होते? तुमच्या सुनावणी ने काय प्राकर निष्कर्ष लावला किंवा ते वेगळेच भांडत होते.

**मा. आयुक्त :-**

कर्मचाऱ्यांनी जी तक्रार केलेली आहे. कर्मचाऱ्यांनी तक्रार कशासाठी केले ते मी कसे सांगणार मी, त्यांना सांगितले त्यांचे समाधान केले तुम्ही जी तक्रार केले ह्या तक्रारीत कशासाठी केलेले ते मी कसे सांगणार मी, त्यांना सांगितले त्याचे समाधान केले. की, तुम्ही जी तक्रार केले ह्या तक्रारीमध्ये तुमच्यावर कुठे अन्याय झाला. कुठल्या नियमाप्रमाणे अन्याय झाला. कुठल्या नियमाप्रमाणे अन्याय झाला. ते मला तुम्ही दाखवुन द्या ना.

**शशिकांत भोईर :-**

महाराष्ट्र शासनाच्या जी.आर प्रमाणे त्यांना काळबध्द पदोन्नोत्ती देवु शकला असता.

**मा. आयुक्त :-**

कालबध्द पदोन्नोतीचा वेगळा विषय सांगतात. आणि आपण जे बोलता ते ज्येष्ठता यादी आणि त्याच्यामध्ये जी पदोन्नोती द्यायची आहे ती रेग्युलर पदोन्नोती आहे.

**शशिकांत भोईर :-**

सेवा ज्येष्ठतामध्ये त्यांचा घोळ झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

सेवा ज्येष्ठतामध्ये बसणारच आहे ना. ज्यांची ज्यांची सेवा झालेली आहे ते बसणार आहे. त्यांची एक निवडसमिती असते. त्या निवडसमितीमध्ये हा एक विषय येणारच आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब मग कधी? कारण, आपण आठ दिवसाने निर्णय लावणार होतो तर अद्याप पर्यंत निर्णय लावला नाही.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य, या पुर्वी जी निवडसमिती बसलेली होती त्या निवडसमिती समोर जे जे कर्मचारी आले. त्यांची जी यादी आलेली आहे. तर त्यांना कालबध्द पदोन्नती दिलेली आहे. जे काही शिल्लक राहिलेले आहे. जसे ज्याचे सी.आर राहतो. किंवा आणखिन दुसरे काही जी काय सेवा ज्येष्ठता यादी होती ती अंतीम झालेली नव्हती. अशा कारणामुळे ते राहिलेले होते आता त्याची सगळी पुर्तता झालेली आहे. निवड समितीमध्ये तो विषय घेवुन कालबध्द पदोन्नोती हक्काने मिळणे आवश्यक आहे. तर तो हक्क त्यांना मिळणारच आहे.

**शशिकांत भोईर :-**

तरी अंदाजे किती दिवस लागतील?

**मा. आयुक्त :-**

एक आठवडा लागेल किंवा पंधरा एक दिवस जाईल. पधंरा दिवसामध्ये आपण त्याच्यामध्ये निर्णय घेवु.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपण मध्यंतरी २० तारखेच्या मिटिंगमध्ये पण बोलले होते की, आठ दिवसात निर्णय लावतो. आपण आता सुध्दा आठ दिवस मागतात.

**मा. आयुक्त :-**

मी सुरुवातीलाच आपल्याला निवेदन केले होते. की, मा. महापौरांकडे या संदर्भामध्ये बैठक झाली. ज्या ज्या कर्मचाऱ्यांसाठी मिटींग होती त्याचे अधिकारी आणि मी सुध्दा हजर होतो.

**शशिकांत भोईर :-**

सहा महिने झाले. तरी पण अद्याप पर्यंत निर्णय लागला नाही. आतापर्यंत आपण बोलता आठ दिवसात निर्णय लावु. तर आठ दिवस आपले सहा महिने आम्ही समजायचे का?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य, कालबध्द पदोन्नोतीच्या बाबतीमध्ये मी आपल्याला सांगितले की, कालबध्द पदोन्नोती देतांना जे निकष ठरवायला पाहिजे होते. त्या निकषाची पुर्तता झालेली नसेल. म्हणुन तो विषय राहिलेला होता. म्हणुन त्या संबधितांना पदोन्नोती देण्यात आलेली नाही. आता त्याच्या सगळ्या पुर्तता झालेल्या आहेत. निवडसमितीची बैठक लावुन पंधरा दिवसामध्ये निर्णय होईल. आठ दिवसामध्ये पण होईल. जेवढ्या लवकरात लवकर आपल्याला करता येईल तेवढ्या लवकर आपण करुया ना.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे जे लोक आता कोर्टामध्ये गेलेले आहे. आपला हक्क मागण्यासाठी मग, त्यांची वाट पाहण्याची गरज पडणार नाही.

**मा. आयुक्त :-**

कोर्टामध्ये जे कर्मचारी गेलेले आहे. तर कोर्टामध्ये कर्मचाऱ्याची न्यायालीन बाब असेल तर ती आपण बाजुला ठेवु. बाकी जे असतील त्यांना देवु.

**शशिकांत भोईर :-**

मी तसा पत्र व्यवहार करु किंवा कितव्या दिवशी तुम्हाला विचारु. तसा पत्रव्यवहार करुन. या पदोन्नोतीबाबत आपण आठ दिवसाचे आश्वासन दिलेले आहे. तर मी तुम्हाला पत्र व्यवहार आठ दिवसानंतर करु, की, आठ दिवसापुर्वी करु.

**मा. आयुक्त :-**

आठ दिवसामध्ये आपण सदस्यांची निवड समितीची बैठक लावु. साधारणः जे निर्णय आहे. ते प्रत्यक्ष त्या कर्मचाऱ्यांच्या हातामध्ये ऑर्डर द्यायला पंधरा दिवस लागतील.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही तारिख घोषित करा.

**मा. आयुक्त :-**

सभागृहासमोरच मी सांगतो की, पंधरा दिवामध्ये त्यांचे ऑर्डर हातामध्ये देवु.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, सहा महिन्यापुर्वी तुम्ही आठ दिवस सांगितले होते ना. सभागृहातच सांगितले होते की, मी आठ दिवसामध्ये निर्णय लावतो. तरी अद्याप पर्यंत निर्णय लागलेला नाही. आता पुन्हा आठ दिवसाचे सहा महिने होतील. तुम्ही तारिख डिक्लेर करा ना की, अमुक तारखेला नोटीस देणार. म्हणजे ते पण आश्वासीत राहतील की, ह्या ह्या तारखेला निर्णय मिळणार.

**मा. आयुक्त :-**

१६ तारखे पर्यंत आपण त्याचे निर्णय घेवु.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते मा. महापौर मॅडम, आपण सुध्दा त्याच्यावर मागवलेली तर, आपण त्याच्यावर काय रुलिंग देणार? १५ तारखेला जर आचार सहिता लागली तर १६ तारखेला तुम्ही आम्हाला काय निर्णय देणार.

**मा. आयुक्त :-**

आमच्यासमोर काहीच नाही. आपण कसे सांगणार की, आचार सहिता सुरु होईल सदस्यांना जर तारीख माहिती असेल तर आम्हाला सांगावे की, अमुक अमुक तारखेला ........

**संगिता म्हात्रे :-**

साहेब, आम्हाला फक्त खुलासा करुन द्या की, .......

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी तारीख विचारली तर ती सांगितले की १६ तारखेपर्यंत कर्मचाऱ्यांच्या हातामध्ये आदेश पोहचतील अशी आपण व्यवस्था करु.

**शशिकांत भोईर :-**

आपण मा. महासभेला निवेदन करता की, १६ तारखेला देवु आणि जर नाही दिले तर आम्ही इतिवृत्तांत या सभागृहाला नाहीतर तुमच्या दालनात जाळु.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहामध्ये मी निवेदन करतो. सन्मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन ......

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुमचे निवेदन छोटे आहे. तुम्ही ८ दिवस देता आणि सहा महिने लावता.

**मा. आयुक्त :-**

८ दिवसामध्ये निर्णय घेतला.

**शशिकांत भोईर :-**

आजपर्यंत ते भांडतात. मा. महापौर साहेब आपण ज्यावेळेला इतिवृत्तांत मंजुर करतो. फक्त अधिकारी त्यांच्या फायद्याचे ठरावात देतात. दुसऱ्यांची कामे होत नाही. आज आपण जे धारण देतो की, फेरीवाल्यांना उचला तर, फेरीवाल्यांचा विषय कधी झाला होता. आपण स्वतः त्याच्यावर रुलिंग दिली होती की, फेरीवाल्यांना उचला प्रशासना तर्फे त्याच्यावर कारवाई का होत नाही. लॉजींग बोर्डींगचा विषय झाला. त्याचे काम झाले. कारवाई काय झाली का? मॅडम काहीच कारवाई झाली नाही. आपण फक्त येथे मंजुऱ्या द्यायच्या आणि जेवढे इतिवृत्तांत आहे. ते भेलपुरीच्या दुकानात भेल बांधायला द्यायचे. एवढंच दुसरे काही नाही. आपण नागरिकांना काय सांगणार की, आम्ही इतिवृत्तांतावर ही कारवाई केली. तुम्हाला एक महिन्यानंतर नागरिकांच्या समोर मत मागायला जायचे आहे. सांगणार की, आमच्या घरी जेवढे इतिवृत्तांत आणे ते भेलपुरीसाठी आणले. कारवाई होतच नाही आज कर्ल्वटसाठी किती वेळा भांडलो पण, आपल्या अधिकाऱ्यांनी त्याच्यावर पुर्तता काय केली? आज पावसाळा सुरु झाला गटारे साफ झाली नाही. म्हणुन किती लोकांना सभागृह डोक्यावर घेतला आम्ही नागरीकांचे सर्व गाऱ्हाने आमच्या डोक्यावर घ्यायचे. अधिकाऱ्याने काही करायचे नाही.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर मधली सर्व दुकाने आणि आस्थापना याच्या वरचे बोर्ड मराठीत व्हावे. देवनागरी लिपीचा सन्मान व्हावा. म्हणुन याच इतिवृत्तांतामध्ये तो ठराव मंजुरीला आहे. ठराव तेव्हा झाला होता आज फक्त इतिवृत्तांताला मंजुरी आहे. त्याचे काय होणार आहे? मला कोणी सांगेल का? तुम्ही खरंच त्या ठरावाची अंमलबजावणी करणार आहात. मराठीचा जेथे ऱ्हास होते लोप होतो. तिला कुठे पुर्नरोजन देण्यासाठी आपण हे सगळ करतो. आपला सर्व कारभार मराठीतुन चालत असतांना एक चांगला ठराव आपण तेथे आणलेला आहे.

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. लॉजींग बोर्डींगचा विषय मागच्या मा. महासभेमध्ये झालेला होता. त्या अनुंषगाने शहरामध्ये जे लॉजींग ॲण्ड बोर्डींग आहे. त्यांची यादी आमच्या कडे नव्हती. त्यामुळे त्याचा संपुर्ण सर्व्हे आम्ही करुन घेतलेला आहे. आणि त्या लोकांना टाउन प्लॅनिंग आणि परवाना या दोन्ही विभागाच्या मार्फत नोटीस बजावलेले आहे. त्याचे खुलासे प्राप्त झाल्यानंतर किंवा खुलासे जरी प्राप्त झाले नाही. तरी त्या दृष्टीने आम्ही पुढे ॲक्शन घेणार आहोत.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, तुमचे पुढच ॲक्शन काय होणार?

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

यामध्ये ज्यांना टाउन प्लॅनिंग कडुन परवानगी प्राप्त झालेली नाही. त्यांचे आपण परवाने रद्द करणार आहोत.

**हंसुकुमार पांडे :-**

रद्द करेंगे तबतक इलेक्शन आजाएगा। कमिश्नर साहब ने बोला था की, हम तीन दिन मे इसका खुलासा करेंगे तीन दिन मे इसका स्टेप लेंगे। तो तीन दिन मे कुछ हुआ है क्या वह मे पुछना चाहता हुँ।

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

हमने प्रोसिजर शुरु की है ना।

**हंसुकुमार पांडे :-**

प्रोसिजर क्या शुरु की है। हमे तो कुछ पता नही। दिन दिन लॉजिंग बढते जा रहे है।

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

नोटीस देना भी प्रोसिजर का एक हिस्सा है ना।

**हंसुकुमार पांडे :-**

लेकिन लॉजिंग बना कैसा? आपके परमिशन के बगैर लॉजिग बना कैसा? फिर आपका परवाना विभाग करता क्या है? आँख बंद करके परमिशन देते है।

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

बहोत सालो से लॉजिंग बन रहे है। उसका हमने पुरा सर्व्हे किया है। उनको नोटीस सर्व्हे किया है। और बोथ ऑन द स्पॉट पर ॲक्शन भी हो जायेगी।

**हंसुकुमार पांडे :-**

वह सिर्फ बिल्डींग बनती है। वहॉ बिल्डींग को ही परिमशन रहता है ना। कमिश्नर साहब को मैने बताया वह बिल्डींग को परमिशन नही था। फिर भी वह बिल्डींग दो माले की बन चुकी है। कल ही मैने इस बारे मे कमिश्नर साहब को दिया है। और उधर कोई नही गया। आपके साहब को दिया है। और उधर कोई नही गया। आपके अधिकारी जाते है और बिल्डींग बनती है उसका फावडा और घमेला उधर से लेके आते है। यह शरम की बात है। आपके यहाँ तो बडे बडे लोगो का फोन आते रहता है। और इसके अंदर कुछ होता नही। लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग के मामले मे बोलता हु। आपलोग देखते है की, शहर के बाहर लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग होना चाहिऐ। आपको भी मालुम पडना चाहिए। आप इस शहर के मा. उपायुक्त है। कमिश्नर है मा. महापौर है। अपने लिए शरम की बात है। बाहर के लोग बोलते है आपका वेशावृत्तीका शहर है। पुरे शहर मे लॉजिंग फैली हुई है। अपने म्हात्रे साहब के बंगले के बाजु मे जया लॉज बन गया। जमा लॉज करके चार माले का लॉज है। सब लॉज मे ए.सी लग गया। हर जगह लॉज है। आप लोगो ने कभी उसके बारे मे सोचा है की, लॉज नही होने चाहिए। किसके पास उसका परमिशन है ही नही। लॉजिंग का परमिशन किसीके पास नही है। खाली यह बिल्डींग है। उसमे कमर्शियल दिखाते है। अपने यहाँ सब ऐसा गोलमाल चलता है।

**प्रभात पाटील :-**

बिना परवाना ते बंदच कराना.

**हंसुकुमार पांडे :-**

उसके पास परमिशन है क्या? उनके पास किसीका। परमिशन नही है तो वह चालु हो गया है। महानगरपालिका का प्रशासन, शासन सब हफ्ता खाके यह सब चिज चालु रखा है। मिरा भाईंदर शहर के अंदर तुम लोगोने पुरा इस्ट का सत्यानाश कर दिया है। ६ बजे के बाद यह लोग घुमते है। जब उसके पास लायसन्स नही है, एन.ओ.सी. नही है तो तुरंत के तुरंत उसको बंद करना चाहिए। उसको नोटीस देने का मतलब क्या है? तुम लोग नोटीस देके सबको होशीयार बनाते है। ऐसेही सर्व्हिस रोड के मामले मे भी सबको नोटीस भेजेंगे। नोटीस भेजनेका सवाल क्या है। १९९२ मे जब यह प्लॅन पास हूआ था की, यहा सर्व्हिस रोड बनना चाहिए। तभी वहाँ एक भी बिल्डिंग नही थी। खाली वहाँ एक चंद्रेश ॲकॉर्ड की बिल्डिंग थी। एक चंद्रेश ॲकॉर्ड को छोड के हमलोग सर्व्हिस रोड बना सकते थे। उस वक्त भी सर्व्हिस रोड नही बना। उसके बादमें २५ बिल्डिंग वहाँ बन चुकी। आज भी वहाँ बिल्डिंग का काम चालू है। यह सब चिजों के लिए हमलोग ही उन लोगोको प्रोत्साहन देते है। मिरा भाईंदर महानगरपालिका के कर्मचारी कमिशनर साहब यह सब मिलकर प्रोत्साहन देते है ना की तुमलोग बनाओ होगा तभी होगा जब देखा जायेगा। अगर ऐसा नही है तो आजतक मिरा भाईंदर शहर में यह सब चिज बंद हो जाना चाहिए था। क्यो नही हुआँ?

**प्रभात पाटील :-**

आम्ही तुम्हांला आव्हान करतो की, आपल्या मध्ये एखादा खैरनार का तयार होत नाही. इतके सदस्य खालून ओरडत असतात. आपल्यामधून असा एक माणूस का तयार होत नाही. येथे एक शिवमूर्ती नाईक साहेब का बनत नाही? आम्हाला सुध्दा आवडेल ना तुम्हाला बोलायला तुमची नावे घ्यायला उल्लेख करायला आम्हाला आवडेल.

**हंसुकूमार पांडे :-**

ठाणा मे एक चंद्रशेखर भी आये थे। उन्होंने सामने रहके कितना बियर बार तोडा। और उन्होंने भाई लोगोंको बुलाके बोला की, मेरे बिचमें किसीने भी टाँग अडाई तो में उसको अंदर डालके सडा दूँगा। ऐसा एक कमिश्नर मिरा भाईंदर मे अभितक आया नहीं। सिर्फ शिवमूर्ती नाईक साहेब आये थे। वह कडक थे और वह कारवाई करते थे। उसके बाद कोई कमिश्नर न आया और भगवान को मालूम आगे कोई आयेगा या नही आयेगा।

**प्रभात पाटील :-**

आम्हाला तुमच्यातून एक होवून दाखवाना. आम्ही तुम्हाला आव्हान करतो. आणि तुम्हाला जर काही झाले तर त्याच्यासाठी आम्ही रस्त्यावर येवू. पण अशा या कारवाई करुन दाखवा.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आता विषय निघाला म्हणून बोलायचे आहे. आमच्या बी.पी.रोडवर सुद्धा वैश्याचा व्यवसाय चालतो. तर, बी.पी.रोड जसा फेरिवाल्याचा असा साफ झालेला आहे. तर वैश्या व्यवसाय पण साफ व्हावा अशी मी विनंती करतो. जरा त्याच्यावर पण लक्ष घाला.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, खरंच बी.पी.रोडवर खरेदी करताना इतकी शरम वाटते की पाच पाच मिनिटाच्या अंतरावर वैश्या उभ्या राहिलेल्या असतात. किती निर्लज्जची गोष्ट आहे. ह्यांना सगळ्यांना धरपकड करुन उचलायला सांगा.

**मुक्ता रांजणकर :-**

साहेब, गेल्या टाईमाला आपण रुलिंग दिले होते की, पोलिस खात्याला कळवू या. तर काय कारवाई झाली?

**शरद पाटील :-**

साहेब, त्याच्यावर कारवाई करा आणि भाजी मार्केटमध्ये पण एक लॉज आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहब कभी से खडे है। हंसुकूमार पांडे साहब इतना बोलके बैठे। सब क्या इसी तरह से होगा। छह महिने पहिले सवाल उठते है। छह महिने तक उनका जवाब नही मिलता। यह सब क्या चल रहा है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, आज सभागृह मे इस शहर की दुर्दशा की बात चल रही है। सक्षम अधिकारींयो पर बात चल रही है। आप लोगों ने अभी देखा की यहाँ के सभागृह के सदस्य है। इन्होंने आपके सामने ही, हो सकता है उपर बैठे लोगो को शहर की दुर्दशा और अवस्था दिखती नही। लेकीन यहाँके लोगोंने सब जन प्रतिनिधी दिखानेकी कोशिश की अगर इसके बावजूद भी आपको यह दिखाने के बाद आँख नही खुलती हो और उपर बैठे लोगोंको शहर की अवस्था, दुर्दशा की जिम्मेदारी नही लेने के लिए उनको शरम आती नही है। तो में तो कहता हूँ की, उपर बैठे सभी अधिकारीयोंको सामुहित त्याग पत्र दे देना चाहिए।

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आम्हाला या विषयावर बोलायचे आहे की, सन्मा. सदस्यांनी सांगितले की, सगळ्या अधिकाऱ्यांनी त्याग पत्र दिलेले आहे. हे संयुक्तिक नाही. परवाने देण्याचे लेजिसलेशन हे जे आपण तयार केलेले आहे. ते राज्याने तयार केलेले आहे. कायदयाने तयार केलेले आहे. त्याच्यात ज्या त्रुटी आहे. त्या त्रुटी शोधण्याचे काम महापालिकेचे आहे का? हा पहिला प्रश्न आहे. त्याच्याशी पोलिस खाते आहे. ज्यांना जिल्हाधिकारी परवानगी देतात ते खाते त्याच्याशी संबंधित आहे. तर ह्या अधिकाऱ्यांना त्यागपत्रे दयायला आव्हान करणे हे चुकीचे आहे ना. महापौर साहेबा,

**प्रभात पाटील :-**

आपण जेव्हा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी तुमच्याकडे गेलो. तेव्हा साहेब, तुम्ही त्याच्या मधल्या त्रुटी काढल्या नव्हत्या.

**लिओ कोलासो :-**

काढलेल्या होत्या. पण आम्ही ही मागणी केली नव्हती की, त्यांनी त्यागपत्र दयावा.

(सभागृहात गोंधळ)

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, लॉजिंग ॲण्ड बोर्डींगचा जो विषय चाललेला आहे. ह्याला महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाची परमिशन असेल तर, महानगरपालिकेला नो.ऑब्जेक्शन सर्टिफिकेट दयायचे असेल किंवा प्रांताच्या जिल्हाधिकाऱ्यांचे लॉजिंग बोर्डींगसाठी परमिशन लागते. आणि त्याच पद्धतीने बांधकामाला परमिशन ही महानगरपालिका देते. त्याची जर, रितसर परमिशन असेल. तर त्यांच्या पद्धतीने महानगरपालिकेची जर, परमिशन असेल तर ह्याला कोणीतीही गोष्ट परवाना दयायला रोखू शकत नाही. जेव्हा बांधकाम पूर्ण झाल्यानंतर लॉजिंग ॲण्ड बोर्डींगचा जो दाखला लागतो. तो जिल्हाधिकारी देतो. त्या लॉजिंग ॲण्ड बोर्डींगचा संबंध नगरपालिकेशी कुठे येतो?

**हंसुकूमार पांडे :-**

मेरे ख्याल से लॉजिंग ॲण्ड बोर्डींग का परमिशन अधिकारी का है ही नही।

**परशुराम पाटील :-**

मुंबई महानगरपालिका, महानगरपालिका हर एक महानगरपालिका में ऐसा है। सब जगह मे है। लेकिन आप जो मुद्दा उपस्थित करता है। उसके लिए सिर्फ एन.ओ.सी. की बात आती है। बांधकाम की बात आती है तो अलग बात है। बाकी का कुछ नही बाकी जो है वह जिल्हाधिकारी लॉजिंग ॲण्ड बोर्डींग को परमिशन देता है। घोडबंदर मे जाने दो या उत्तन मे जाने दो तो यहाँपर क्यों ले? महानगरपालिका उसका टॅक्स लेते नही क्या?

**हंसुकूमार पांडे :-**

जहाँ पर हेवी पॉप्यूलेशन है वहाँपर लॉजिंग ॲण्ड बोर्डींग नही होना चाहिए।

**परशुराम पाटील :-**

यह प्रशासन की बात है।

**हंसुकूमार पांडे :-**

हमलोग हमारे मिरा भाईंदर गर्व्हमेंट की बात कर रहे है।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मला फक्त एवढाच खुलासा दया की, आपण इतिवृत्तांत मंजूर करतो. त्याच्यावर कारवाई व अंमलबजावणी का होत नाही? ह्याचे उत्तर प्रशासनाने दयावे. कारण माझ्याकडे दुसरे उत्तर आहे. माझा "ज" चा प्रस्ताव होता. दि. ६/१२/२००६ च्या मिटींगला त्याच्यावर कारवाई काय झाली? तो प्रस्ताव ५३८ कर्मचाऱ्यांबाबत होता प्रशासनाने पुढील कारवाई काय केली? याचा खुलासा करा ना.

(सभागृहात गोंधळ)

**परशुराम पाटील :-**

लॉजिंग ॲण्ड बोर्डींग जे आहे ते बाहेरुन येणार रात्री, अपरात्री यासाठी आहे. वाटेल तो व्यवसाय करण्यासाठी नाही. आपण त्यांना बंदी घालता.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, माझे रुलिंग दया. या इतिवृत्तांताची कारवाई का होत नाही? अंमलबजावणी का होत नाही? तुम्ही त्यांना बसवा ना.

**परशुराम पाटील :-**

तुम्ही एखादया अधिकाऱ्याला घ्या, मा. महापौरांना घ्या, मा. आयुक्त साहेबांना घ्या, कोणत्यातरी प्लॅनिंग ऑफीसर ला घ्या किंवा मा. उपायुक्तांना घ्या. हे असंच आहे. मा. महापौर मॅडम, लॉजिंग ॲण्ड बोर्डींग चा जो व्यवसाय चाललेला आहे. तो फक्त बाहेरुन येणाऱ्या लोकांसाठी म्हणजे रात्री, परात्रीसाठी आहे. आज एअर पोर्ट सारख्या जागेच्या येथे लॉजिंग ॲण्ड बोर्डींग आहे. तर त्याच्यावर पण तुम्ही बंदी घालणार नियमानुसार जर आपले परमिशन देत असेल तर त्यांना तुम्ही रोखू शकणार नाही. तुम्ही प्रशासनावर हुकूम सोडू नका.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मला फक्त एवढा खुलासा पाहिजे की, हे जेवढे इतिवृत्तांत झाले. त्या इतिवृत्तांतमधले ठराव झाले. त्याच्यावर कारवाई झाली. याच्यावर खुलासा करा ना. याच्यावर कोणती कारवाई झाली? कोणती अंमलबजावणी झाली?

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, माझे प्रश्न असे होते. महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग १ - वर्ग २ व पर्यावक्षी पदे बऱ्याच कालावधीपासून रिक्त आहे. ती पदोन्नती भरण्याबाबत प्राप्त उमेदवार कर्मचारी असताना अदयापपर्यंत का भरण्यात आली नाही? २) अदयापपर्यंत पदे न भरण्याची कारणे काय आहे? ३) सर्व साधारण ही पदे किती कालावधीमध्ये भरण्यात येतील? मा. आयुक्त साहेब, आपण पान. नं. १४ बघा. त्याच्यावर आपण आम्हाला आठ दिवसाची रुलिंग दिली होती. त्याच्यानंतर या विषयावर सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब, लिओ कोलासो साहेब, ते सुद्धा त्याच्यावर बोलले होते. आपण आठ दिवसाचा कालावधी दिलेला त्याच्यावर सहा महिने निघून गेले आता तुम्ही परत, आठ दिवसाचे आश्वासन दिलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आचार संहिता लागली तर काय करणार? १२ व्या महिन्यात मी “ज” चा प्रस्ताव केला होता. त्या “ज” च्या प्रस्तावावर अजून अंमलबजावणी झालेली नाही. मा. महापौर मॅडम, मग आम्ही असे समजायचे का की १६ तारखेला हे सर्व इतिवृत्तांत आम्ही मा. आयुक्त साहेबांच्या केबिनमध्ये जाळायचे का? ह्याच्यावर अंमलबजावणी का होत नाही?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, सन्मा. आयुक्तांनी आपल्याला १५ तारखेपर्यंत त्याची पूर्ण माहिती मिळेल. असे सांगितले होते तसे आदेश निघतील.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी परत परत आपल्याला विचारते की, आचारसंहिता लागली तर आचारसंहितेनंतर तुम्ही आम्हाला बोलावणार का?

**उमा सपार :-**

मा. महापौर मॅडम, शिवम हॉस्पिटलच्या पाठीमागे जिथे रेसिडेन्स एरिया आहे. तिथे लॉजिंग ॲण्ड बोर्डींग निघाले. तिथल्या सगळ्या लोकांचे ऑब्जेक्शन आहे. त्याच्यावर तुम्ही कारवाई करायला लावा. तिथल्या लेडीज लोकांना फिरायला मुश्कील झालेले आहे. मी राहते तिथे माझ्या घराच्या पाठीमागे पण लॉजिंग, बोर्डींग आहे. तिकडे सुशिक्षित लोक आहे. तर ते मला येवून बोललात की, मॅडम, हे काय आहे?

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आम्ही या विषयावर आपलं लक्ष वेधू इच्छितो की, जेव्हा लॉजिंग ॲण्ड बोर्डींग किंवा कुठलाही व्यवसाय शहरात सुरु करायचा झाला तर तिथे कायदयाने अनिवार्य केलेले आहे. तर मॅडम, असे आहे की महापालिकेची एन.ओ.सी. घेण्यात येते. महापालिकेची एन.ओ.सी जर या प्रश्नामध्ये दिली गेली असेल आणि तेथिल नागरिकांची जर हरकत असेल तर महापालिकेने ती एन.ओ.सी. रद्द करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे प्रकरण करायला पाहिजे.

**उमा सपार :-**

मा. महापौर मॅडम, शिवम हॉस्पिटलच्या मागे नविन बिल्डिंग उभारली तिथे रेसिडेन्स एरिया आहे. तिथल्या लोकांचे ऑब्जेक्शन आहे आणि जेव्हा मी तिथे गेली तेव्हा ते लोक मला बोलले की, मॅडम, हे काय आहे? येथे लॉजिंग ॲण्ड बोर्डींग निघाले, तर लोकांनी रहायचे कसे? इतका छोटासा रस्ता आहे. तिथून यायचे जायचे. तर लोकांनी कसे करायचे. तर मॅडम, तुम्ही तिथे ऑब्जेक्शन घ्या. तिथे लॉजिंग ॲण्ड बोर्डींग व्हायला देवू नका.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, तुम्ही विषय पत्त्यावर २२ विषय घेतलेले आहे. एकंदर मला कोणत्याही सदस्यांवर टिका करायची नाही. आणि केली ही नाही. परंतु, सभागृहाचा जर कल बघितला तर एकही सदस्यांची मानसिकता नाही की, आजच्या विषय पटलावरचा एकतरी विषय मार्गी लागावा. ज्या पद्धतीने सभागृहात चर्चा चालू आहे. मागच्या, मा. महासभेमध्ये ज्या वेळेला मा. आयुक्त साहेबांनी लॉजिंग ॲण्ड बोर्डींगबाबत रुलिंग दिले होते. त्यावेळेला अतिशय सन्मा. सदस्यांनी सभागृहातल्या सगळ्यांनी मा. आयुक्त साहेबांना डोक्यावर घेतले आणि आता मा. आयुक्त साहेबांनी प्रोसेस चालू केलेली आहे. आणि आता आपण कितीही बोंबललो तरीसुद्धा जी नियमाप्रमाणे कारवाई आहे ती कारवाई केल्याशिवाय गत्यंतर नाही. प्रशासनाकडून संबंध लॉजिंग ॲण्ड बोर्डींग ए.टी.पी कडून सुद्धा नोटिसेस ईश्यू झालेल्या आहेत. आणि परवाना विभागाकडून सुद्धा नोटिस इश्यू झालेल्या आहेत. एकंदर सभागृहाचा कल बघता. आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक या सभागृहाच्या विषय पत्रिकेवरचा विषयावरती कामकाज करायचे नाही हे गृहित धरुन या सभेचा सभा त्याग करतो आणि आम्ही ........

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्यावर ह्यांचे म्हणणे असे आहे की, २१ विषयापैकी १० ते १२ विषय होणे गरजेचे आहे आणि जर तसे होत असेल तर आम्हाला .......

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौरांना सांगितले काय नाही असे बोलता येणार नाही. तुम्हाला घ्यायचे असेल तर दहा विषय घ्या. नसेल तर तुम्ही एकमेकांचा लक्तर काढत बसा.

**हॅरल बोर्जीस :-**

"काका" तुम्ही सकाळपासून बोलत होते. तेव्हा आम्ही शांत बसून ऐकलेले आहे. परंतु, ज्या पद्धतीने सभागृहामध्ये एक सदस्य उठतो दहा मिनिटं गोंधळ घालतो.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही सभागृह नेते आहात.

**हॅरल बोर्जीस :-**

"काका" पहिलचं सांगतो, तुम्हाला कामकाज करायचे असेल तर कामकाज करा आणि उरलेले विषय आहे त्याच्यावर तुम्ही मार्गी लावा आम्ही राष्ट्रवादीचे नगरसेवक या सभेचा सभात्याग करुन आम्ही बाहेर जातो.

**रोहिदास पाटील :-**

१०, १२ विषय पूर्ण करा. मी मा. उपमहापौर साहेबांना सुद्धा विनंती केली. मा. महापौरांनासुद्धा सांगितले की, १० ते १२ विषय व्हायला पाहिजे. हे सभागृहाचे कामकाज आहे.

(सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस, स्टिवन मेन्डोसा, हरेश गावंड, हेलन गोविंद, जेन्वी अल्मेडा व महेंद्रसिंग चौहाण यांनी ५.३० वाजता सभात्याग केला.)

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मला फक्त खुलासा दया.

**लिओ कोलासो :-**

तुमची १५ मिनिटाची लक्षवेधी होती. तर त्या लक्षवेधीचे तुम्ही केले काय? तुम्ही सभागृहाचा फुकटात वेळ घालवला. तुम्ही केलेल्या चर्चेचे निष्कर्ष सांगा. सभागृहाने काय रुलिंग दिले आणि रिझल्ट काय लागला ते दाखवा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. संबंधित विभागाचे अधिकारी किंवा संबंधित मा. आयुक्त यांनी त्या प्रश्नाचा खुलासा करावा.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब यांनी जो प्रश्न केलेला आहे तो संगिता म्हात्रे आणि काका आम्ही या संदर्भामध्ये सुद्धा मा. आयुक्त साहेबांकडे मिटींग घेतली होती. त्यावेळी आम्हाला सांगण्यात आले की, या प्रश्नाचा निर्णय आठ दिवसांत लागेल. संजय गोखले जे संबंधित खात्याचे अधिकारी होते. आत्ता त्यांची मिरारोडला ट्रान्सफर झाली. साहेब आपण काय करतो ते कळत नाही की, आज अधिकारी येथे आहेत तर उदया मिरारोडला पोहचतात तर हे आम्हाला अनअकलिनी झाले आहे. संजय गोखलेकडे आस्थापनेचे जे विषय आहे. ते टाकून तिथे गेलेले आहे. त्यांनी आम्हाला वेळोवेळी आव्हान काढण्यासाठी प्रश्न प्रत्येकवेळी सांगत गेले की, उदया त्यांची बिल काढतो. परवा बिल निघणार आहे आणि आज जर ही बिल निघत नसेल तर संजय गोखलेला सस्पेन्ड करा असे मी मांडतो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, त्याच्यावर मी उपरोक्त असे बोलेल. की, जे इतिवृत्तांत आणि जे ठराव आपण पारित करतो. त्याच्यावर प्रशासना तर्फे अंमलबजावणी होत नसेल तर मी मा. आयुक्त साहेबांच्या नावाचा निषेधाचा ठराव मांडतो. कारण यांच्याकडुन कामे होत नाही. कारण, ठराव पारित केल्यानंतर आमच्या सही लागत नाही. की, अमंलबजावणी करायची त्याची सही असते कारवाई त्यांनी करायची असते. आम्ही निषेधाचा ठराव मांडतो की, मा. आयुक्त साहेबांकडुनही कारवाई होत नाही.

**प्रकरण क्र. ३४ :-**

दि. २०/०१/२००७ व दि. २०/०१/२००७ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १० :-**

दि. २०/०१/२००७ व दि. २०/०१/२००७ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जिस.** **अनुमोदक :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३५ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी प्रकरण क्र. ३५ च्या ठरावाचे वाचन केले.)

**मदन उदितनारायण सिंग :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, त्याच्यामध्ये शांतीनगर वे पण समावेश करण्यात यावे. ते ऑलरेडी ताब्यात घेण्यात आलेले आहे. आणि ते जे रेट आहे तर प्रकरण क्र. ४८ आहे. तो विषय सुध्दा ह्याच्यातच द्यावा. म्हणजे एक प्रकरण कमी होउन जाईल.

**रोहिदास पाटील :-**

ह्या ठरावात जरी क्लब करायचे असेल तरी करा. आमचे त्याच्यावर काही हरकत नाही. त्या ठरावामध्ये तो प्रकरण क्लब करुन घ्या.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांनी सुचना केली. की, हा विषय पहिल्या ठरावामध्ये क्लब करुन घ्या. तसे केले तर आपल्या विषय पटलावरचा एक विषय कमी होईल. आणि त्या सोबत शहरामध्ये इतर काही एस.टी.पी असतील ते कार्यान्वीत करुन आपल्या ताब्यात घेवुन महापालिकेने त्याची तजवीज व्यवस्था केली. तर ते अधिक चांगले होईल. त्या दृष्टीकोनातुन तरी प्रयत्न वाढेल.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील. तसेच सन्मा. सदस्य एस.ए.खान यांनी ज्या ठरावाचे वाचन केले. जेसल पार्क ते मिरारोड शांतीनगर गृहसंकुलन हे दोन्ही ठराव एकत्र करुन सेम ठराव मांडलेला आहे. तर, आपण ही सुचना सामावुन घ्यावी. आणि हा ठराव कायम करण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किंमतीचे काय? तिकडे किती परसेंट आहे. आणि इकडे किती परसेंट आहे. सेम अमांउट आहे की? किंवा अर्धा टक्का एक टक्का जास्त कमी येतो ते बघुन घ्या.

**एस.ए.खान :-**

सेम अमांउट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचा उल्लेख करुन घ्या.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, याच विषयाच्या अनुसरुन मी आपल्याला विनंती करतो. गोल्डन नेस्ट फेस नंबर १३,१४,१५,१६,१८ ह्या ठिकाणी देखील एस.टी.पी तयार आहे. गोल्डन नेस्टच्या येथे संपुर्ण पणे क्लिअर केलेले आहे. तिथे काही प्रॉब्लेम नाही. त्याच्यामध्ये एस.टी.पी चा विषय आहे ना तर मला वाटते ह्याच्यामध्ये आपण समावेश केले तर बर होईल.

**रतन पाटील :-**

आपल्या ताब्यात आल्यानंतर घेता येईल अजुन आपल्या ताब्यात आले नाही.

**दिनेश नलावडे :-**

आपण आता महानगरपालिकेकडे ताब्यात घेतोच ना.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. ब्रॉडवे आर.एन.ए इथला एस.टी.पी टॅंक आपण कधी ताब्यात घेणार आहात. त्याचा आपण खुलासा करता का?

**शिवाजी बारकुंड :-**

ब्रॉडवे आर.एन.ए बाबत दोन तीन वेळा मिटींग झाली. होती वैती साहेबांकडे पण मिटींग झाली होती. त्यावेळी तो बिल्डर नव्हता. आता त्यांनी सोमवार, मंगळवार इकडे येण्याचे कबुल केलेले आहे. त्या मिटींगमध्ये फाईनल होईल.

**सुरेखा गायकवाड :-**

सर, लवकरात लवकर फायनल करुन त्याच्यावर कारवाई करुन ते आपल्या ताब्यात घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ६ टक्के चा विषय आता चर्चेला झाला. आपल्या महापालिकेचे लेखा परिक्षक आहेत का? तर ह्या ठरावामुळे आपल्याला आर्थिक नुकसान वगैरे आहे का? कारण गोषवाऱ्यात एवढ डिटेल दिलेले नाही. किती आर्थिक नुकसान होउ शकते हा निर्णय घेतल्यानंतर ........

**सुरेश बनसोडे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो.सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी जो काही प्रश्न मला विचारला की, उपरोक्त जेसल पार्कच्या या निर्णयामुळे महापालिकेला किती तोटा होणार आहे. तर, त्याचे आकडे ही माझ्यामुळे आहे. सध्या १३ टक्के दराने आपल्याला २२ लाख ७३ हजार ९५० रुपये येतात. आणि ६ टक्के दराने आपण १० लाख ४९ हजार ५१५ रुपये. आपल्याला मिळतील म्हणजे त्यामध्ये आपला लॉस होणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा लॉस होतो. तर, बजेट मध्ये तुम्ही ३०,४० लाख रुपयाचा लॉस कुठे दाखवला.

**ध्रृवकिशोर पाटील :-**

साहेब, हा फक्त जेसल पार्कचा मिरारोड नाही.

**मिलन म्हात्रे :-**

जेसल पार्कचा का?

**सुरेश बनसोडे :-**

मी फक्त जेसल पार्कचे सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

जेसल पार्कचा फिगर काय आहे.

**सुरेश बनसोडे :-**

जेसल पार्कचा फिगर सध्या १३ टक्के दराने २२ लाख ७३ हजार रुपये आहे. आणि आपल्याला लॉस साधारणतः ११ ते सव्वा ११ लाख रुपये होउ शकेल.

**मिलन म्हात्रे :-**

शेवटचे फायनल फिगर किती आले?

**सुरेश बनसोडे :-**

फायनल फिगर अकरा ते सव्वा अकरा लाख रुपये आपल्याला त्यातुन तोटा उद्‌भवतो.

**मिलन म्हात्रे :-**

शांती नगरचे...

**सुरेश बनसोडे :-**

साहेब, जेसल पार्कचे आहे त्याचेच मी वर्क आउट केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते आपल्याला काढायला लागेल. आपण निर्णय घेतलेला आहे.

**सुरेश बनसोडे :-**

साहेब, हा प्रकरण क्र ३५ जो आहे. जेसल पार्क मलनिसारण केद्रांचे आहे. त्याबाबत आपल्याला एवढी फिगर मिळाली.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही निर्णय पटकन एकत्र लावुन घेतला ह्याची तयारी की, त्याची तयारी असे झाले ना. आपण जेव्हा निर्णय घेतो. तेव्हा फायदा तोटा तरी बघायला पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

सर या दोन्ही प्रश्नामध्ये किमान २५ लाख रु. तुट येण्याची शक्यता आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सर, तुट जास्त येईल.

**लिओ कोलासो :-**

जास्त येईल तर आपल्याला रि-ॲप्रोप्रेशन करुन ते बजेटमध्ये घ्यायला पाहिजे कारण तेवढा फिगर आपण ॲट व टाईम विड्राव्ह करु शकणार नाही.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा.सदस्य मिलन म्हात्रे आणि लिओ कोलासो साहेबांनी जी चर्चा करायला घेतले. आपण पहिल्यांदा जेसल पार्क चा एस.टी.पी चार वर्षापुर्वी आपल्या ताब्यात घेतला होता. त्याला आपण १३ टक्के ने आकारणी करत होतो परंतु, शहरामध्ये आपल्याला जे अंडर ग्राउंड ड्रेनीज सिस्टम आणि सिव्हरेज स्टिटमेंट प्लान संदर्भात जी आपली जी योजना आहे. त्या शहरामध्ये ज्या मोठ्या वसाहती आहेत. त्या मोठ्या वसाहतीने स्वतःचे सिव्हरेज स्टिटमेंट प्लान विकसीत केलेले आहेत. ज्यांनी विकसीत केले. त्यांच्याकडुन आपण ते पुर्ण चालु स्थितीमध्ये असल्यावरच आपण ताब्यात

घेणार आहोत तर, शहरामध्ये आठ ते दहा प्लान आपल्याला तयार करुन मिळतील तर, त्याच्या मोबदल्यात आपण फक्त आपण त्याचे मेन्टेन्स आपण करणार आहोत. आणि त्याच्यासाठी आपल्या लोकांना घरपट्टीमध्ये विशेष स्वच्छता कर लागू लावून जे लोक त्या प्लानचे उपभोग घेत आहेत तर त्याची आपण वसुली करणार आहोत. तर, मोठ्या प्रमाणात आपल्याकडे हे प्लान येत आहे. आणि आतापर्यंत आपण फक्त एकच सिव्हरेज स्टिटमेंट प्लान करुन विशेष स्वच्छता कर घेत होतो. शांती नगरचा आहे. कॉम्प्लेक्स कर घेत होतो. ब्रॉडवे अॅवीन्यु कडे आहे. गोल्डन नेस्टच्या फेस ३ मध्ये आहे. शांती पार्कचा स्वतःचा एस.टी.पी आहे. असे मोठे - मोठे गृहसंकुलन ज्यांनी बनवले. त्यांचे सगळे एस.टी.पी आपल्या ताब्यात येतात. म्हणजे भविष्यामध्ये महापालिकेला सिव्हरेज स्टिटमेंट प्लान या शहरासाठी बनवायचा आहे. प्रत्येक इमारतीचा संडास चा आउट लेट हा जमीनीमध्ये सोडलेला आहे. त्या ऐवजी तो सिव्हरेज स्टिटमेंट प्लानला जोडला जाणार आहे. तर भविष्यात आपल्याला होणारा जो खर्च आहे. तो प्लान आपल्या ताब्यात आल्यामुळे आपलाही खर्च कमी होतो ह्याच्यात जर फरक येत असेल सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांचे असे म्हणणे मला वाटते की आपण पुर्वी १३ टक्के घेत होतो. आणि आता ६ टक्के घेतो त्याच्यामुळे महापालिकेला किती मोठा लॉस होणार आहे. आणि सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांचे असे म्हणणे आहे की, मग, तो लॉस होणार आहे. तर त्याच्यामध्ये आपल्याला एखाद्या रक्कमेचे रि - अॅप्रोप्रिएशन करायचे असेल तर हा लॉस आपण भरुन काढणार त्यापेक्षा मी तर असे म्हणेल की, एस.टी.पी आपल्या ताब्यात जेव्हा येणार तेव्हा आपल्याकडे तयार प्रॉपर्टी आपली लायबलिटी आपल्याकडे येत असेल आणि आपल्याला त्या जनतेला काही सुविधा द्यायच्या आहे. त्यामुळे मला वाटले की, १३ टक्के हा जास्तच चार्ज होता हे १३ टक्के असलेल्या घरपट्टीवरती आपण चार्ज करणार होतो जर जेसल पार्कला १३ टक्के एखाद्या इसमाच्या प्लाट चे घरपट्टी भाडे १००० रु , असेल तर तो फक्त ह्याचे १३० रुपये टॅक्स भरत असेल. तर तो फक्त ह्याचे १३० रु. टॅक्स भरत असेल परंतु, शांतीनगर, मिरारोड ची जी वसाहत आहे. त्या ठिकाणी काही फ्लॅट ना ३०००रु., ३५०० रु. देखील टॅक्स आहे मग, त्यांना १३ टक्के भरायची वेळ आली तर त्यांना ती फार मोठी रक्कम वाटते त्याच्यामध्ये ६ टक्के आहे. तर त्याच्यामध्ये काही डिफ्रन्स येत असेल जर आपल्या ऑडीटचे काही विशेष त्याच्यावरती म्हणणे असेल. तरी पण मिलन म्हात्रे साहेब, माझी अशी सभागृहाला विनंती आहे की, एका बाजुला जेसल पार्कची जुनी वसाहत आहे. त्याची घरपट्‌टीची टक्केवारी कमी आहे. परंतु, आपण मिरारोडची घरपट्टी लावताना त्यांना मोठया दराने आपण घरपट्टी लावतो. तर तिथून आपल्याला जवळ-जवळ पाच सिव्हरेज स्टिटमेन्ट प्लॉन्ट आपल्या ताब्यात येत आहे. त्याच्यामुळे आपण जेसलपार्कच्या बाबतीत आपण थोडंस लवचिक झालो. तर इतर ठिकाणी आपण अधिक लोकांना चांगल्याप्रकारे सुविधा देउ शकतो किंवा त्यांच्यावरती जाचक असा हा विशेष स्वच्छता कर लागणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये तुमचा हा जो गोषवारा दिलेला आहे ना. त्याच्यात करमूल्य किंमती वर १३ टक्के म्हणजे मुल्यांकन केलेले आहे. आपण कराचा मुल्यांकन करुन जी अमाउंट लावलेली आहे. ते बरोबर आहे की, चूक ते आम्हाला कळत नाही. किती परसन्ट कमी केले. त्याला आमचा विरोध नाही. पण ते करत असताना पहिले जे टेबल आणि जे सेटस्टेड तयार झाले. ते चुकीचे होते का? आता होणारा जो लॉस आहे तो किती होईल. त्याच्याबद्दल आपण काहीतरी विचार केला पाहिजे की, आता १३टक्के वरुन डायरेक्ट तुम्ही म्हणजे २ रु. वरुन १ रु. वर आलात तर त्यावेळीचे २ रु. चुकीचे होते का? आणि मग ते कोणी काढले. कारण तो ठराव सुद्धा ह्या लोकांनीच केलेला आहे. मी स्थायी समितीला असताना सुद्धा १३ टक्के ठराव झालेला आहे. सुचक अनुमोदन ह्यांच्यापैकीच आहेत. त्याच्यामध्ये महापालिकेचे नुकसान जास्तीत जास्त होणार नाही असे बघा. खरं बघायला गेले तर वैती साहेब बोलतात की, शांती नगरची ती अख्खी स्किम रस्ते वगैरे सगळेच त्यांनी आपल्याला कधीच दयायला पाहिजे. पण ते तर दिलेलेच नाही रस्ते, गटार वगैरे ते सगळ्या पाणी तुंबल्यावर लोक बोंबा मारत तुमच्याकडे येतात, म्हणजे तो काय तिथे आपल्याला स्किम देणार ती काय मेहरबानी नाही. ती २० ची विकर स्किम आहे. ते त्यांनी सगळे तयार करुन आपल्याला दयायला पाहिजे. अटीशर्तीचे तसे १९७६ सालाचे अॅग्रीमेंट आहे. स्टेट गर्व्हमेंट चे १९७६ सालाचे अॅग्रीमेंट वाचा त्यातला संपूर्ण इंटर स्ट्रक्चर आहे. ते त्यांनी तुम्हाला हॅन्ड वर्क करुन टाकायचे. असे असताना आपण एक ठराव निराळा करायचे. परत आता डबल क्लबींग करायचे. डायरेक्ट ५० टक्के चा शेर बँक द्यायचा. हे कर तुम्हाला लेखा परिक्षकांना वावगं किंवा व्यवस्थित वाटत असेल तर बघा म्हणजे तुम्हाला कुठेतरी म्हणावे लागेल की, त्यावेळी करमूल्य चुकीचे होते ते ठराव चुकीचे झाले. आता आम्ही सुधारावे किंवा मॉडीफार करतो किंवा कमी करतो. महागाई वाढत जाते ना. पाण्याचे दर वाढले कमी झाले नाही. हाउस टॅक्स वाढला कमी

झाला नाही. आपण आता स्थायी समितीला तेच करत गेलो. ३.५० रु. चा ७ रु. पाण्याचा दर पाण्याचा दर आम्हीच केला शांतीनगरला आपण ७ रु. पाणी देत होतो. तर तो १४रु. घेतो. १४ ते १५ रु. १००० हजार लिटरला देतो. ह्याच्यावर कोणाचा अंकूश आहे का? म्हणजे तो वॉल खोलायचे तुमच्याकडून १५रु. घेतो. तुम्ही त्यांच्या शांतीनगरमध्ये पाणी पोचवायचे. आणि त्यांनी फक्त वॉल खोलायचे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे शांतीनगरच्याबाबत अतिरिक्त माहिती देतो. शांती स्टार बिल्डर हा सोसायटीकडून पैसा घ्यायचा आणि मिलन म्हात्रे साहेब, आपल्याला माहिती देतो की, १४ रु. ७५ पैसे जो टॅक्स लावत होतो. शांती नगर स्वतःच्या पाण्याची स्किम, त्यानंतर स्वतःचा सिव्हरेज स्टिटमेंट प्लॉन्ट, त्यानंतर रस्त्यावर असलेल्या सर्व दिवाबत्तीची सोय आणि रस्त्याची दुरुस्ती ह्या सगळ्या गोष्टीची जबाबदारी ही शांती स्टार बिल्डरची होती. आपण जेव्हा ५ एम.एल.डी. पाणी त्यांना दयायला लागलो. आपल्याला ती स्किम हस्तांतरीत केली. त्यांनतर एस.टी.पी. हस्तांतरीत केले. त्याच्यानंतर लाईट आपल्याकडे ताब्यात घेतली. त्याच्याकडची गटारे आपल्या ताब्यात घेतली. आज तिथे शांती नगरची चार गार्डन महापालिकेने विकसित केलेले आहे म्हणजे आपण हळूहळू त्याच्या प्रोजेक्टमध्ये बऱ्याच गोष्टी हस्तांतरीत पॅरेलली केल्या. त्याच्यामध्ये शांतीनगरच्या रहिवाशींनी जेव्हा जेव्हा या बाबी आमच्या माध्यमातून बिल्डरच्या निदर्शनास आणल्या. तेव्हा तेव्हा त्याने त्यांच्याकडून घेणार तो सर्व्हिस चार्ज जो आहे. ता कमी कमी करत चाललेला आहे. मात्र त्याचे एफ.एस.आय चे कॅल्क्युलेशन अजूनपर्यंत रस्त्यांचे किंवा १४रु. घेत होता. त्याच्यामध्ये पाणी एस.टी.पी. स्ट्रिट लाईट, रस्त्याचे मेन्टेनन्स आणि गटाराची दुरुस्ती अशा प्रकारचा घेत होता परंतु, त्यात त्याने सुधार केले. ते फक्त आपल्याला नॉलेज लावण्यासाठी..

**मिलन म्हात्रे :-**

पण, त्याचे ॲग्रीमेंट वाचा ना। त्याच्या ॲग्रीमेंटमध्ये नागरिकांना जे काही सुविधा द्यायच्या ते त्यांनीच दयायच्या आहे. हाय कोर्टच्या आणि सुप्रिम कोर्टच्या ऑर्डर आलेल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ठराव झालेला आहे. जर, प्रशासनाकडून ऑडीटकडून हरकती असेल की, हा ठराव चुकीचा आहे. नाहीतर, हा विषयचा ठराव मंजूर करुन पुढचा विषय घ्या. जर, ऑडीटचा आक्षेप असेल. तर, त्या विषयावर जास्त चर्चा करा ना. ठराव तर झालेला आहे. तुम्ही किती बोलला तरी त्याला विषय काय आहे, मी तुमचे ऑब्जेक्शन घेत नाही. ऑडीटच्या आक्षेप असेल १३ टक्के वरुन ६टक्के तर तुम्ही बोला ना. ठराव झालेला आहे. प्रशासनाचे काय म्हणणे आहे. जर, शासनाकडून बरोबर नाही. तर तुम्ही फुकट करा.

**मिलन म्हात्रे :-**

ज्या ठरावामध्ये महापालिकेचे आर्थिक नुकसान होते. ४५१ खाली तो विखंडीत होतो. एवढा मला माहित आहे. म्हणुन मी सांगतो की, आम्हाला त्याच्यामध्ये जायचे नाही. कॉम्प्लीकेशन मध्ये जायचे नाही. नुकसान करा. पण, काहीतरी समजण्यासारखे करा. १३.५० टक्के वरुन तुम्ही डायरेक्ट ६.५० टक्के वर याल मग, उद्या आम्ही ठराव ठेवतो. ना की, वाढवलेले हाउस टॅक्स सगळे निम्मे करा. म्हणुन ते पण करुन टाका. सगळ्या गावाचे भले होईल. आम्ही पाणीपट्टीची पण मागणी करतो ७ रु. च्या ऐवजी २ रु. ने द्या म्हणुन ............

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, शांतीनगर घरकुल योजना जी आहे ती आर्थिक दुर्बल घटकांसाठी होती. त्यावेळी १९७६ मध्ये जेव्हा यु.एस.इ ॲक्ट लागु केला. त्यानंतर वेळोवेळी आपण त्यांना पाच पाच वर्षाची मुदत दिली त्यांनी सेक्टर व्हाईज बांधकाम करत गेले आजपर्यंत त्यांनी १०० पैकी डी.पी रोड, सार्वजनिक वाचनालय, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विभागीय कार्यालय, तसेच सार्वजनिक दवाखाना, ही चार वस्तु अजुन दिलेले नाही. ती पण, त्यांनी आपल्याला बांधुन विनामुल्य हस्तांतरित करायचे ते पण शांतीस्टार बिल्डर्स कडुन करुन ह्यांना अन्यथा सेक्टर १ त्याची बाकी आहे. ती बांधेल आणि तो पळुन जाईल. मग, आपण त्याला कुठे शोधणार? ते पण बर्डन उद्या महापलिकेवर येईल. कमीत कमी या चार वस्तु त्याच्याकडुन बनवुन घ्या. मा. आयुक्त साहेब मी पुन्हा बोलतो सार्वजनिक दवाखाना, तळमजल्यावर सार्वजनिक वाचनालय, १०० पैकी डी.पी रोड आहे. आणि महापालिकेचे विभागीय कार्यालय हे शांतीस्टार बिल्डर्सने बनवुन आपल्या ताब्यात द्यायचे आहे. असे अंडर टेकन महानगरपालिकेला त्युांनी लिहुन दिलेले आहे. या गोष्टीला मी वेळोवेळी आपल्याकडे पत्र व्यवहार केलेले आहे. मला फक्त असे उत्तर येते की, आमचे प्रयत्न चालु आहे. पण अजुन पर्यंत मला माहित नाही. की, आपण त्याच्यात काय केलेले आहे. जेवढ्या गार्डन बनविले आपण बनवलेले आहे. ते चुकीचे

आहेत. जेवढे रिप्रेशन गार्डन शांतीस्टार बिल्डर्स ने बनवुन द्यायचे आहे. अन्यथा जिथे पाहिजे तिथे आपण खर्च करत नाही. आणि जेथे नको तिथे शांतीस्टार बिल्डर्स च्या फेवरमध्ये आपण काम करतो ते कुठेतरी थांबवा मॅडम, धन्यवाद.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यावर तुम्ही नेमका निर्णय काय घेतला? तो ठराव मंजुर केला. आमचे जे आर्थिक नुकसान झाले. त्याच्याबद्दल निकाल काय झाला? आधि निकाल द्या मग, पुढच्या विषयाचे वाचन करा ना.

**मा. महापौर :-**

ठराव ३५ आणि ४८ मंजुर केलेला आहे. आणि कायद्याच्या काही अडचणी असतील त्याप्रमाणे प्रशासन कारवाई करेल.

**मिलन म्हात्रे :-**

त्यामध्ये जर महापालिकेने नुकसान होत असेल त्याबद्दल मॅडम, आपले काय मत आहे?

**मा. महापौर :-**

ऑडीटर ने त्याचा रिपोर्ट दिलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बघा दोन विषय आहेत. त्याच्यातले त्याच्यावर त्यांनी एकावरच वक्तव्य केलेले आहे. एकाची तयारी त्यांच्याकडे नाही. म्हणुन सांगतो आपण दोन विषय क्लप केले. लेखा परिक्षकांचे काय म्हणणे आहे. ते आपण बघु या.

**सुरेश बनसोडे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. एका बद्दल मी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांना सांगितले दुसरे सृष्टी कॉम्प्लेक्स, आणि शांतीनगर गृहसंकुलन यामध्ये १३ टक्के दराने सध्या आपण सृष्टी कॉम्प्लेक्ससाठी २२ लक्ष ७७ हजार ८३७ रु. गोळा करतो. ६ टक्के दराने जर, आपण घेउ लागलो तर आपल्याला १० लाख ५१ हजार ३०९ रु. ५० पैसे इतकेच प्राप्त होतील त्यानंतर शांतीनगर गृहसंकुलनासाठी १३ टक्के दराने आपण ६२ लक्ष ५० हजार ८१४ रु. घेतो. जर ६ टक्के दराने आपण गोळा केले तर २८ लाख ८४ हजार ९९० रु. ८६ पैसे असे फिर्गस आपल्याला प्राप्त होतील.

**मिलन म्हात्रे :-**

हा ठराव झाल्याने ह्याच्यात एवढा लॉस आहे. आणि तेवढा लॉस ह्याच्यामध्ये आहे फिक्स फायनल सांगुन टाका. म्हणजे विषय संपला जेसलपार्कचा पण एवढा लॉस आहे. आणि ........

**सुरेश बनसोडे :-**

साधारणः जेसलपार्क मध्ये सव्वा अकरा लाख रु. लॉस आहे. आणि सृष्टी कॉम्प्लेक्स, शांतीनगर या दोघांमध्ये मिळुन ४५ लाख रु. लॉस आहे.

**प्रकरण क्र. ३५ :-**

जेसल पार्क मलनिःसारण केंद्रामुळे नागरिकांना आकारण्यांत येणाऱ्या विशेष स्वच्छता कराबाबत.
(मा. स्थायी समिती सभा दि. ११/०५/२००७ रोजीचे प्रकरण क्र. १५)

**ठराव क्र. ११ :-**

जेसलपार्क मलःनिस्सारण केंद्र मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत कार्यान्वीत केले जात आहे. सहरहू मलःनिस्सारण केंद्राच्या देखभाल, दुरुस्ती व निगा यासाठी सदर भागातील लाभार्थीकडून करयोग्य मुल्यावर १३% दराने विशेष स्वच्छता कर वसुली करीत आहे. सदरहू विशेष स्वच्छता कर जादा असल्याने त्याचा बोजा जेसलपार्क रहिवाश्यांवर पडत आहे. आरोग्य सेवा, स्वच्छता इत्यादी कामे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्तव्यातील आहेत. सध्या महानगरपालिका जेसल पार्क रहिवाश्यांकडून वसुल करीत असलेला विशेष स्वच्छता कर १३% हा ज्यादा असल्याने सदरहू विशेष स्वच्छता कर ६% दराने आकारण्यात यावा अशी शिफारस करणारा ठराव मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.१३ दि. ११/०५/२००७ अन्वये पारित करण्यात आलेला आहे.

मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.१३ दि. ११/०५/२००७ अन्वये शिफारस केल्याप्रमाणे जेसल पार्क भागातील रहिवाश्यांकडून विशेष स्वच्छता कर ६% दराने सन २००७-२००८ या वर्षापासून आकारणी करुन वसुल करण्यास मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील.** **अनुमोदक :- श्री. मदन उदितनारायण सिंग.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३६ चे वाचन केले. )

(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. ३६ च्या ठरावाचे वाचन केले.)

**नयना म्हात्रे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, येथे जे नाव दिलेले आहे. चौकोनाचे नाव तर त्याच्यात महाराजा अग्रसेन मार्ग आणि महाराणा प्रताप रोड हे पहिल्यापासुन नाव आहे. तिकडे चार रस्ते जात नही आणि परत दुसऱ्या चौक्याचे नाव दिलेले आहे. नाहीतर तिकडे गैरसमज होईल आपण आतमध्ये गेलो तर तिन रस्त्यामध्ये चौकाचे नाव दिलेले हे मला माहित आहे. पण मेन रोडवर कुठेही चौकाचे नाव दिलेले नाही. ते कायद्यात बसते का?

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेब, आपण तो गोषवारा रद्द करायला दिलेला आहे ना.

**रिटा शहा :-**

साहेब, आपण आम्हाला पत्र पाठवले की, हा गोषवारा रद्द मानावा.

**दिपक खांबित :-**

आम्ही रद्द केले. फक्त स्थायी समिती सभा दि. २२/११/२००६, १४५ चा जो स्थायी समितीने ठराव केलेला आहे. ना त्यावर फक्त निर्णय घ्यायचा आहे. बाकीचा गोषवारा आम्ही टोटल रद्द केला.

**मा. उपमहापौर :-**

ह्या बाबतीमध्ये सन्मा. सभागृहाच्या आणि विशेष अधिकाऱ्यांच्या लक्षात ही बाब आणु इच्छितो की, आपण कुठल्याही रस्त्याचे नामकरण करतांना काय निकष लावता ते कळत नाही. ह्या रस्त्यांना राष्ट्रपुरुषांची, राष्ट्रसंताची किंवा एखाद्या नावाजलेल्या साहित्यीक, लेखक, कवी किंवा काही पराक्रम करणार असतील या भुमीमध्ये ज्यांचे शैक्षणीक, क्रिडा किंवा सामाजिक क्षेत्रामध्ये काही योगदान असेल. अशा लोकांची नावे असावी ज्यांचे काहीतरी या भुमीमध्ये त्यांनी विशेष बाब केलेली आहे. असे काहीतरी नावे असावे. ही नावे असावी. सदस्याकडुन गेल्यानंतर त्याबाबत आपल्याकउे ताबडतोब गेल्या वर्षभरात मला वाटते चार ते पाच वेळा नामकरणाचा प्रस्ताव आता त्याच्यामध्ये असा एक स्पष्ट असे लिहलेले आहे की, मिरा रोड भागातील रस्ता शांतीनगर आणि मिरा रोडमध्ये शांतीनगर मध्ये २५ रस्ते आहे. मग, त्यातला कुठला रस्ता त्याला श्री. जयगुरु जन्मेश्वर मार्ग असे नाव दिले हे स्पष्ट होत नाही. त्याच्यामुळे गोंधळ होतो मागे उमाकांत मिश्रा चौक हे नाव १९९४ साली त्यावेळेचे त्या परिषदचे नगरसेवक श्री. मुझफ्फर हुसेन साहेब यांनी स्वतः त्या नामकरण फलकाचे उद्घाटन केले होते. आणि नंतर आमचे अति उत्साहीक कार्यकर्त्यांनी त्या चौकाच्या ठिकाणी जावुन दुसरे कुठचे तरी नाव लावले चिटकवले त्याच्यामुळे खुप वादावादी झाली आणि मग, त्या दोन्ही लोकांना शांत बसवुन योगायोगाने ते दोन्ही चौक मुझफ्फर साहेबांनी विकसीत केले होते. मग, त्यांनी त्या दोन्ही ग्रुपना शांत बसवुन तुमचे जिथे नाव आहे ते नाव तसेच ठेवतो आणि आपले जे दुसरे नाव लागलेले आहे ते मी नव्याने विकसीत केलेल्या चौकाला नाव देतो म्हणजे समाजामध्ये आपल्या थोड्याश्या चुकीमुळे महापालिकेचे कन्सल्ट इंजिनियर आहेत. त्यांनी त्या खात्याला जमा केली पाहिजे आपल्या रेकॉर्डला नाव चेक केले पाहिजे नाहीतर, मिरारोड भागातील रस्ता शांतिनगर मग ह्याच्यातल्या कुठल्यातरी रस्त्याला जयगुरु जन्मेश्वर महाराज नाव द्यायचे आता ह्याच्यामुळे आपण नेमके काय करु शकतो. आता पटकन एका सदस्यांनी सोबत ठराव मांडला तर ही नावे द्यावे. असा एक सोबत ठराव मांडला तर ही नावे देण्याचे जे प्रघात आहे तो आतापर्यंत स्थायी समितीमध्ये त्या विषयावर चर्चा होवुन आलेला आहे. नगरपालिका अस्तित्वात आल्यापासुन मला वाटते फक्त दोनच वेळा नामरिणाचे विषय आले होते परंतु, आता ते सरसपणे येतात. आणि कोणीही मागितले तरी तो येतो ए.पी.जी व्होरा रोड ते त्यांच्या कॉलेज ने मागणी केलेला विषय आहे. तुम्ही असाकसा सभागृहासमोर आणता त्या ठिकाणच्या स्थानिक नगरसेवकांना किंवा मिरा भाईंदर शहरातील कुठच्याही नगरसेवकाचा प्रस्ताव घ्यायचा एखाद्या संस्थेने आपल्या संचालकाचे नाव दिले त्या संचालकाचे येगदान आहे ते तिथे बिल्डर्स होते. त्यांनी ती शाळा बांधली नाव द्यायला हरकत नाही. परंतु तुम्ही असे कोणाचेही नाव आणतात का? आज या विषयामुळे प्रमोद महाजन सारखा राष्ट्रीय नेतृत्व ज्याचे नाव आले आणि तो ठराव आपल्यात विषयात पुन्हा मागे घेवुन जावा लागला तर अशा प्रकारची नामुश्की का येते? तर असे विषय ज्या डिपार्टमेंटचे काम आहे त्यांनी ही बाब पडताळुन पहावी आणि आता पुढील माहिती साठी माझी एक विनंती आहे मा. उपमहापौर या नात्याने आपल्या या

शहरामध्ये किती रस्त्यांची नामकरण झाली काही नावे नंतर घातली गेली काही आधीच घातलेली आहेत. काही रितसर आली तर जेवढे असतील तेवढी नावे दाखवा आणि एकदा खातर जमा करुन घ्या. की, आपल्याला अजुन या शहरामध्ये किती रस्त्यांची नामकरण करायचे आहे. कुठचेही नाव कुठेही लावु नका. त्याच्यामुळे अन्यथा ही सदस्यांमध्ये भानगडी होतील. त्याच्यामुळे काहीतरी पॉलिटीकल मायलेज कोणाला तरी मिळतील किंवा असे काम केले? हे करण्यापेक्षा ज्या व्यक्तिचे नाव देतो. त्या वास्तुची शान वाढेल असे काहीतरी नावे द्या. उगीच कोणीतरी सांगितले म्हणुन ती नावे द्यायचा प्रघात बंद करुन टाका. आणि यासाठी कमिशनर साहेब आपण स्वतः अधिक जागृत पाहिजे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, सदर विषय क्र. ३६ ह्या अंतर्गत आपला विषय आहे. की, रस्त्यांना, चौक्यांना नावे द्यायची आणि त्याच्यामध्ये प्रशासनाने आम्हाला गोषवारा दिलेला आहे की, स्थायी समितीमध्ये काही पास झालेले आहे. ते डायरेक्ट ह्याच्यामध्ये दिलेले आहे. आणि त्या अंतर्गत आपण आम्हाला पत्र दिलेले आहे की, ते गोषवारे रद्द मानावे मग तुमचे गोषवारे कॅन्सल झाले तर विषय कुठे राहिला?

**मिलन म्हात्रे :-**

आता प्रमोद महाजनांचे नाव द्यायचे हे सभागृह ठरवणार ना मी म्हणजो इस्टच्या चौपाटीला स्वामी विवेकानंदाचे नाव द्यावे अशी आमची सुचना आहे.

**एस.ए.खान :-**

गोषवारा रद्द झाला म्हणजे विषय रद्द झाला ना.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह, सन्मा. सदस्यांना सांगतो मा. आयुक्त साहेबांनी गोषवारा दिलेला त्यांनी रद्द केलेला आहे. विषय रद्द होत नाही.

**रिटा शहा :-**

गोषवारामध्ये काही राहिले नाही तर आपण पास काय करणार मला सांगा ना.

**मा. महापौर :-**

त्यांनी दिलेला गोषवारा रद्द केलेला आहे. स्टॅडिंग च्या मिटींगमध्ये झालेला ठराव आहे तो ठराव आपल्या गोषवाऱ्यात लावलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

स्टॅडिंग चा ठराव आपला गोषवारा होवु शकत नाही.

**मा. महापौर :-**

सभागृहाने ठरवायचे आहे की कुठली नावे द्यायचे ती महासभेमध्ये जो घेतलेला विषय आहे तो रद्द होउ शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

विषय पत्रिकेला टिपणी लागते. मा. आयुक्त साहेबांची सही असते मागच्या वेळेला सही नसलेला गोषवारा आम्ही परत केलेला आहे. महापालिकेच्या मा. महासभेचा गोषवारा मा. आयुक्त साहेबांच्या सहीने निघतो. स्टॅडिंग चा ठराव गोषवारा होउ शकत नाही.

**प्रभात पाटील :-**

आज पारित करु नका. असा जर विषय असेल की, तुमचा विषय रद्द होत नाही. आणि आम्ही मा. महासभेचे काही ठरवायचे आहेत. तर हा विषय पुढच्या सभेला घ्या. आम्ही तुम्हाला रस्त्यांची नावे देतो. आजचा विषय टोटली रद्द करा. आणि पुढच्या सभेला घ्या. आम्ही तुम्हाला रस्त्यांची नावे देतो. असा मी ठराव मांडते आणि सन्मा. सदस्या रिटा शहा यांचे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेला अवलोकन आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, सदरच्या विषयावर सर्व सदस्यांच्या भावना ह्या ज्वलंत भावना आहेत. रस्त्यांना विविध तऱ्हेचे नाव द्यायला पाहिजे मा. उपमहापौर साहेबांनी मघाशी सुचने मध्ये जी नावे ज्या पध्दतीने द्यायला पाहिजे आणि ती नावे दिली जात नाही. त्या ठिकाणी स्थानिक लोकांमध्ये वाद निर्माण होतात. आपण आता टेक्निकली मुद्दा सांगितला की, आपण गोषवारा रद्द केला आणि आपण सभागृहात विषय मांडायला पाहिजे सभागृहात सुचना करायला पाहिजे सन्मा. सदस्यांनी सभागृहाची परिपुर्ण माहिती घेतलेली नाही. अभ्यास ही केला नाही. माझी ह्याच्यामध्ये अशी सुचना राहिल की, यापुर्वी

आपण जेवढी नावे दिलेली आहेत ती संपुर्ण नावे आपण अवलोकनात आणावी. म्हणजे प्रत्येक सदस्याला समजेल की, याठिकाणी कोणत्या कोणत्या रस्त्याला कोणती कोणती नावे आहेत. सदर विषय स्थायी समितीने शिफारस केलेले आहे. मान्य आहे. आणि तो विषय शिफारसीला आल्यानंतर चर्चा होणे फार जरुरीचे आहे. स्थायी समितीने विषय मंजुर केल्यानंतर ता विषय मंजुर होते ही जरुरी आहे. परंतु, सर्व सदस्यांच्या भावना अशा आहेत. की, या ठिकाणी झालेली संपुर्ण नावे एकत्रित आणावी आणि आवलोकन करावे आणि जी विषय पटलावर नावे आहेत त्याच्या ही अभ्यास करायला तुम्ही सदस्यांना वेळ द्यावा. आणि हा विषय तुम्ही पुढच्या मिटींमध्ये आणला तर अतिशय रित्यागृह आपल्याला अभ्यास करता येईल. मी सभागृहाला विनंती करतो आणि सदस्यांनी मा. महापौरांनी ही विनंती मला करावी.

**प्रभात पाटील :-**

मॅडम, त्यापेक्षा हा विषय आज होवुच नये. आम्हाला वेळ द्या. पुढच्या वेळेला हा विषय घ्या. असा मी ठराव मांडते, आणि आम्हाला आमची नावे प्रपोज करता येईल.

**शुभांगी नाईक :-**

मा.महापौर मॅडम, मागच्या मिटींगमध्ये सुध्दा गोडदेव नाक्याचे नाव मी आणलेले होते. आणि मला त्यावेळी विरोधी पक्षनेते आहेत त्यांनी मला सांगितले होते की, स्वर्गिय आनंद दिघे मार्ग असे त्या चौकाला नाव द्यायचे होते. पण ते नाव वारंवार पत्र व्यवहार करुनही सुध्दा आपल्याकडे हे नाव आलेले नाही त्यावेळी गोडदेव चौकाला आनंद दिघे मार्ग हे नाव देण्यात यावे.

**शरद पाटील :-**

मॅडम, गोडदेव चौकाला नाव दिले नाही.

**शुभांगी नाईक :-**

मी वारंवार पत्र व्यवहार केलेले आहे. गोडदेव नाक्याचे मी प्रत्येक वेळेला सांगत आलेली आहे. आणि विरोधी पक्षनेते बोललेले की, स्वर्गिय आनंद दिघे मार्ग म्हणुन द्या.

**दिपक खांबित :-**

गोडदेव नाक्याला ऑलरेडी स्वर्गिय भगवान बापट व्यापार चौक असे नामकरण झालेले आहे. तथापी बदल करण्याचा अधिकार हा मा. महासभेला आहे.

**शुभांगी नाईक :-**

मग नाव बदल करा ना. तुम्ही त्याच्यामध्ये बदल करा.

**एस. ए. खान :-**

हा विषय पुढच्या मा. महासभेमध्ये घ्या.

**शरद पाटील :-**

आम्ही विनंती करतो एका राष्ट्रिय नेत्याचे नाव आहे. तुम्ही त्याचा विचार करावा. तुम्ही आता विषयच रद्द करतात. जेसल पार्क चौपाटीला जे नाव दिले त्याचा विचार करावा.

**मा. उपमहापौर :-**

परंतु, हा विषय स्थायी समितीच्या माध्यमातुन येवु दे. अशा प्रकारची सुचना आहे. त्याच्यामध्ये सदर विषय रितसर येतील.

**रिटा शहा :-**

मॅडम, आता कुठला पण घ्यायचा प्रश्न येतच नाही. आता संपुर्ण विषय पुढच्या मिटींगमध्ये घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी जो ठराव मांडलेला आहे. तो ठराव प्रभाग समितीच्या मिटींगमध्ये पास करुन स्थायी समितीमध्ये पास केला. आणि तो विषय मा. महासभेत आलेला आहे. तर तुम्हाला पुढच्या मिटींगमध्ये घ्यायची गरजच का आहे? पुढच्या मिटींगमध्ये तुम्ही दुसरा विषय घ्या ना. दुसऱ्या चौकांचे नामकरण करा ना.

**मा. उपमहापौर :-**

बरेचसे नगरसेवक सांगतात तो ठराव पुढे ढकलावा तुम्ही मांडत असाल तर मतदानावर घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ठराव मांडला ना.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील जी, टेक्निकली मुद्दा असा आला की, गोषवारा होता तो रद्द करण्यात आला या ठिकाणी.........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गोषवारा वेगळा आणि स्थायी समितीने ठराव मांडला तो वेगळा आहे. दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत. आणि कमिशनर साहेबांनी कॅन्सल केलेला आहे तो गोषवारा कॅन्सल केलेला आहे हा ठराव कॅन्सल केलेला नाही. विषय वेगळा आहे.

**एस. ए. खान :-**

गोषवारा कूठला आहे? गोषवारा बघाना.

**रिटा शहा :-**

गोषवारा स्टॅंडिंग चा ठराव आहे. प्रशासनाने तशी काहीही टिपणी दिली नाही. तसा ठराव आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशासनाने तसा खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेता हा विषय पुढील सभेत ठेवण्यात येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठरावाचे काय झाले?

**मा. महापौर :-**

ठराव कॅन्सल झाला विषय पुढील सभेत ठेवण्यात येणार आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग समितीमध्ये सविस्तर चर्चा झालेली आहे. त्यावेळी सगळे नगरसेवक उपस्थित होते. त्यानंतर स्टॅंडिंग कमिटी मध्ये चर्चा झालेली आहे. त्यामध्ये खान साहेब सुचक आहेत. आणि अनुमोदक हंसुकुमार पांडे आहेत.

**मोहन पाटील :-**

त्यांचा ठराव रद्द होत नाही. प्रभाग समितीचा ठराव स्थायी समिती मध्ये आला.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, स्टॅंडिंग कमिटीचा ठराव रद्द होणार नाही.

**एस. ए. खान :-**

तो ठराव रद्द होत नाही. आपल्या गोषवारा आहे तो रद्द होणार आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब तुम्ही खुलासा करा ना. तुम्ही कुठला रद्द केलेला आहे.

**दिपक खांबित :-**

विषय पुढच्या सभेमध्ये घेणार आहे.

**मोहन पाटील :-**

ते ठराव तर होणारच ना? प्रभाग समितीचा ठराव आहे स्थायी समितीचा ठराव रद्द होणार नाही सेम विषय दुसऱ्या सभेमध्ये घ्यायचा झाला.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो की, आता जो सभा सदस्य रोहिदास पाटील नगरसेवक यांनी मघाशी जो ठराव माडला जेसल पार्क आणि शांती नगरचा टॅक्सच्या बाबतीमध्ये त्याच्यामध्ये ठराव मांडला आणि त्याने अनुमोदन हे शानु गोहिल ने दिलेले आहे. आणि त्याच्यानंतर अनुमोदन हे त्यांच्या ग्रुपचे कसे काय? हा खोटेपणा आम्हाला चालणार नाही हा सत्ताधारी पक्षाला ठराव मांडण्याचा अधिकार आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण सुचक आहात तर मॅडम, अनुमोदक राहतील ना त्यांनी अनुमोदन दिलेले आहे. आपला एक प्रतिनिधी दुसऱ्या प्रतिनिधीला अनुमोदन म्हणुन राहु द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

समांतर आकारणीमध्ये आमचे नाव निघालेले का? मा. महापौर मॅडम, ह्याच प्रतिनिधीने प्रभाग समितीमध्ये या सभागृहाचा गार्डन आहे. तिथे मायरा मेंडोसा याचं नाव देण्याचा ठराव हा सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण यांनी आणला होता मी त्यावेळी बोललो.....

**परशुराम पाटील :-**

मॅडम, याच्यावर काय निर्णय देणार? नाहीतर बदल करायला लावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, त्यावेळी निर्णय झालेला होता की प्रभाग...

**परशुराम पाटील :-**

हा ठराव मला मंजुर नाही. याला माझा विरोध आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, त्यांना वेगळा ठराव मांडायला सांगा ना.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, ठराव भी हो गया है। और दुसरा विषय भी चालु हो गया है।

**रोहिदास पाटील :-**

दुसऱ्या विषयाचा ठराव केला. राष्ट्रीय नेत्याने जे मत मांडले त्याच्यात तुमची प्रवृत्ती दिसुन आली की, तुमचे मन किती खोटे आहे. एका प्रमोद महाजन सारख्या नेत्याचे नाव देते वेळी सभागृहाने वास्तविकता हसत घ्यायला पाहिजे होते. त्याच्यात सुध्दा तुम्ही कोतेगिरी दाखवली आम्ही त्याच्याबद्दल काही बोलत नाही त्याबद्दल किव येते.

**मिलन म्हात्रे :-**

प्रमोद महाजन स्वामी विवेकानंदा पेक्षा ते मोठे होते का? नाही. स्वामी विवेकानंदाचे नाव दिलेले आहे. भारतीय जनता पार्टीला ते मान्य नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आम्ही या मा. महासभेचा निषेध करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

समांतर आकारणी होती तेव्हा तुम्हाला वाटले नाही. की ते एक्सेप्ट करायचे चार वेळा समांतर आकारणीचा प्रस्ताव माझा आला होता नाव दिले तुम्ही अनुमोदन म्हणुन आणि आज तुम्हाला मते पाहिजे.

**जयंत पाटील :-**

मॅडम, त्या विषयाला कोणी विरोध केलेला नव्हता? सर्व सभागृहाने तो विषय एकमताने पारित केलेला होता. शानु गोहिल ह्या सुध्दा त्या प्रभागाचे नगरसेविका आहेत. तुम्ही सुचक आहात त्या अनुमोदन आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तो ठराव झाला तो मंजुर झाला. त्यानंतर दुसरा ठराव झाला तो तुम्ही रद्द केला आता कुठे तुम्ही जागे झाला.

**जयंत पाटील :-**

रद्द झाला नाही. आम्ही बहुमताने केला.

**रोहिदास पाटील :-**

दुसरा ठराव पण तुम्ही पुढे ढकलता पाहिला ठराव झाला. दुसरा ठराव झाला.

**जयंत पाटील :-**

कोणता ठराव पुढे ढकलला? पण अनुमोदन म्हणुन शानु गोहिल आहे.

**रोहिदास पाटील :-**

होउ शकत नाही.

**जयंत पाटील :-**

कसे होउ शकत नाही. त्यांनी अनुमोदन दिलेले आहे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर साहेब आपल्याला सुध्दा माहित आहे. आपल्या समोर त्यांनी अनुमोदन दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील मी आपल्याला विनंती करते की, आपण सुचक रहा. ठराव वाचुन झाल्यानंतर अनुमोदन हे शानु गोहिल ने दिलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

अजिबात नाही.

**परशुराम पाटील :-**

तुम्ही ठराव आणला. आम्ही प्राधान्य दिले आणि आमचे नगरसेविका शानु गोहिल त्यांनी अनुमोदन दिले साहेब, अतिशय चुकीचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, समांतर कर आकारणीचा ठराव आम्ही आणला तेव्हा आम्ही सुचक आणि अनुमोदक आणले चार वेळा तुम्ही लोकांनी सभा त्याग केला होती. त्यावेळी लक्षात आले नाही.

**मोहन पाटील :-**

तुम्ही जेव्हा ठराव मांडला त्या वेळेला पहिल्यांदा कोणी बोलले होते ह्याच्यासाठी जरा टेपींग वाजवुन दाखवा.

**शुभांगी नाईक :-**

मा.महापौर मॅडम, सभागृहाचा वेळ का फुकट घालवता सकाळ पासुन वेळ किती फुकट गेलेला आहे. आम्ही फुकटवेळ काढायला आलेलो नाही. एकदा ठराव मंजुर झाल्यानंतर पुन्हा पुन्हा तोच विषय का घेता? आता विषय घ्या सचिव साहेब, दुसऱ्या विषयाला सुरुवात करा. पुन्हा पुन्हा तोच विषय घेतो.

**परशुराम पाटील :-**

पुढचा विषय घ्यायचा नाही. अनुमोदन दिलेले आहे. त्याचा आधि निर्णय लावा.

**मोहन पाटील :-**

विषय झाला. तर, त्याच्यावर निर्णय काय झाला? मा. महापौरांनी रुलिंग दिले की, अनुमोदन शानु गोहिल आहे.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**मिलन म्हात्रे :-**

गोषवाऱ्यामध्ये चुक आहे. प्रभागनिहाय शववाहिनी आणि रुग्णवाहिका पाहिजे असे ते बोलतात.

(सन्मा. सदस्य एस.ए.खान यांनी प्रकरण क्र. ३७ च्या ठरावाचे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

२१ रुग्णवाहिका या शहरात आदरणीय गणेश नाईक यांनी दिल्याबद्दल मी श्री. गणेश नाईक यांच्याबद्दल मी अभिनंदन ठराव मांडत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

अनुमोदन आहे. साहेब,

**परशुराम पाटील :-**

साहेब, पण ते महानगरपालिकेला दिलेले आहे की, पक्षाला दिलेले आहे.

**मोहन पाटील :-**

संस्थेला दिलेले आहे.

**परशुराम पाटील :-**

संस्था म्हणजे कोणती?

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये जी मंडळ आहे. त्या संस्थाला दिलेले आहे.

**परशुराम पाटील :-**

महापालिकेने घेतलले काही वाईट आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ठराव तिकडे वाचत आहेत. आपण बसुन घ्या.

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. सदर विषय त्या वेळ नसुन सुध्दा कारण मागच्या वेळेला मागच्या बजेटच्या संदर्भात ज्या वेळेला चर्चा चालु होती. त्यावेळेला त्या चर्चेमध्येअसे गृहित धरले गेले की, प्रत्येक प्रभाग समितीला १ रुग्ण वाहिनी आणि १ शव वाहिनी प्रत्येक प्रभाग समितीला महापालिकेने सुपुर्त करायची. अशा पध्दतीने तो ठराव झाला होता आणि मिराभाईंद मध्ये चार प्रभाग समिती आहे. प्रत्येक प्रभाग समितीला १ रूग्णवाहिका, १ शववाहिका उपलब्ध करावी. अशी माझी सुचना आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा.महापौर मॅडम, माझी अशी सुचना आहे की, आपल्याकडे आरोग्याचे चार उपकेंद्र चालतात. आणि भाईंदर मध्ये सिरीयस ॲटॅक आल्यानंतर न्यायला वाहन नाही. कोणताही मुंबईला घेवुन जाण्यासाठी कोर्डेक वाहन ची गरज आहे. त्यावेळी आपल्याकडे आरोग्य अधिकारी नव्हते. आपल्याकडे नर्स नव्हती म्हणुन आपण ती कार्डेक वाहने खरेदी करत नव्हतो. आता आपल्याकडे नर्स आहेत. डॉक्टर आहेत तर कुठल्यातरी एक आरोग्य केंद्राच्या अधिन मध्ये कार्डेक वाहनची पण आपण व्यवस्था करावी अशी माझी सुचना तुम्ही नमुद करा.

**शरद पाटील :-**

मा.महापौर मॅडम, माझी पण एक सुचना आहे. आपण जर चेसिस कशाला मागवता तर बंद बॉडी तिकडुन आणली तर चांगली पडेल. आणि स्वस्थ पडेल.

**रमेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, आप प्रत्येक विभाग मे एक रुग्ण वाहिका देने वाले है। तो हमारे पास दो शव वाहिणी है। और १ शव वाहिनी का पर्चेस करनेवाले थे। तो १ कम पडी है तो आप किसको देंगे। हमारे पास टाल दो है। १ पर्चे स करनेवाली है। ३ पर्चेस करनेवाली ५ हो गई तो यह गोषवारा गलत है।

**मोहन पाटील :-**

मा.महापौर महोदया, आदरणिय सन्मा. नगरसेवक आमचे एस.ए.खान साहेबांनी जो ठराव मांडला तो आमच्या डोक्यावरुन गेलेला आहे तर कृपया तो ठराव वाचुन दाखवावा.

**रमेश जैन :-**

आप किसको एक रुग्ण वाहिका ज्यादा देंगें। और शव वाहिनी किसको कम देंगे वह स्पष्ट करो।

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, ठराव क्र. १४५ प्रकरण क्र. १४१ मा. स्थायी समितीची सभा दि. २२/११/२००६ ला झालेला तो ठराव आपण रद्द करणे ते योग्य नाही. नाहीतर आपण तो विषय तहकूब करु शकता. पण, ठराव मात्र रद्द करु नका. तसे आपण रुलिंग दया कारण रद्द असा चुकीचा शब्द वापरलेला आहे. कृपया ती दुरुस्ती करुन घ्यावी.

**मा. महापौर :-**

ठराव क्र. ३६ हा पुढील सभेत ठेवण्यात येईल. अशी रुलिंग दिलेली आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, तहकूब सभेमध्ये घ्या.

**मा. महापौर :-**

तहकूब सभेमध्ये प्रशासनाचा गोषवारा येईल आणि त्या तहकूब सभेमध्ये घेतला जाईल.

**रोहित सुवर्णा :-**

स्थायी समितीचा ठराव आपण रद्द करु शकत नाही. तो रद्द करणे योग्य नाही.

**मा. महापौर :-**

गोषवाऱ्यामध्ये सगळे विषय येतील.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, धन्यवाद.

**प्रकरण क्र. ३६ :-**

रस्ते, चौकांना नावे देण्याबाबत विचार विनिमय करणे.
(मा. स्थायी समिती सभा दि. २२/११/२००६ रोजीचे प्रकरण क्र. १४१)

(सदरचा विषय मा. महापौर यांच्या आदेशानुसार तहकुब करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३७ चा ठराव वाचून दाखवतो. शववाहिका आणि रुग्णवाहिका खरेदी करणे.

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ३७ च्या ठरावाचे वाचन केले.)

**रमेश जैन :-**

टोटल कितनी ॲम्ब्यूलन्स आप लानेवाले है।

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, आलेल्या सुचनेसह तो ठराव करा. आम्ही सुचना दिली. बंद बॉडी तिथून डायरेक्ट कंपनीकडून मागवा. चेसिस कशाला मागवता.

**नगरसचिव :-**

अधिकृत टाटा कंपनी ह्यांच्याकडून मागवलेले आहे.

**शरद पाटील :-**

नुसते चेसेस मागवू नका. बंद बॉडी कंपनीकडून घ्या.

**जयंत पाटील :-**

मॅडम, या शहरामध्ये राष्ट्रवादीने १५ ॲम्ब्यूलन्स आणल्या. इतर पक्षाचे आहेत, इतर संस्थचे आहेत. या शहरामध्ये कमीत कमी २५ ॲम्ब्यूलन्स आहेत. आपण २ ॲम्ब्यूलन्सची मागणी करतो. तेव्हा वेगळा अडथळे जाणार आहे. या शहरामध्ये आजारपण वाढलेले आहे. मा. आयुक्त साहेब, या शहरामध्ये एवढे आजारपण वाढलेले आहे का? की सारखे ॲम्ब्यूलन्स ची लाईन लागलेली आहे. त्याच्यापेक्षा त्यांच्याकडून दोन ॲम्ब्यूलन्स घ्या ना?

**मोहन पाटील :-**

टोटल २१ रुग्णवाहिका शहरामध्ये आहेत. आणि मिरा भाईंदर शहरामध्ये आवश्यकता किती आहे? तर आणखिन आवश्यकता आहे का?

**जयंत पाटील :-**

आपल्याला जर हे अगोदर माहित असते तर आणखिन १५ ॲम्ब्युलन्स आणले नसते.

**मोहन पाटील :-**

पाटील साहेब, तुम्ही छान मुद्दा आणला. शव वाहिनीची आवश्यकता आहे. चार शववाहिनी तुम्ही आणा आणि जर दोन आपल्याकडे आहे. तर दोन मागवा. तर चार प्रभागात चार शव वाहिनी ही होतील २१ रुग्णवाहिका हे आता नव्याने आल्या.

**मा. उपमहापौर :-**

आपल्याकडे एक आहे. फक्त १ शव वाहिनी आणि १ ॲम्ब्युलन्स महापालिकेची असावी. कारण दोन गाडया आपल्या दहा दहा वर्षात झालेल्या आहेत. जेव्हा आवश्यकता लागेल तेव्हा प्रशासनाने मागवून घ्यावे.

**मोहन पाटील :-**

माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, या शहरामध्ये २१ रुग्णवाहिका दिलेल्या आहेत. जर तुम्ही आम्हांला ह्याच्यामध्ये थोडा अवधी दिला तर चार रुग्णवाहिका आपण प्रभागात टेस्ट करुन प्रयत्न करतो.

**जयंत पाटील :-**

या रुग्णवाहिके वर महापालिकेचे नाव येईल.

**मोहन पाटील :-**

महानगरपालिकेचे नाव त्याच्यावर असेलच.

**मा. उपमहापौर :-**

या प्रकरणामध्ये सभागृहाच्या निदर्शनास जो आणू इच्छितो. तो एक शव वाहिनी आणि एक ॲम्ब्यूलन्स आणावी. अशा प्रकारचा ठराव मांडलेला आहे. सन्मा. सभागृहाच्या वतीने मा. आयुक्त साहेब, मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो शहरामध्ये राष्ट्रवादीने नुकतेच १५ ॲम्ब्युलन्स दिलेल्या आहेत. भाजप चे ॲम्ब्युलन्स चालतात. आणि संस्थांचे ॲम्ब्यूलन्स चालतात. त्याच्यामुळे आपल्याला ॲम्ब्यूलन्स ची गरज आहे. अशातला भाग नाही. परंतु, आपल्या महापालिकेच्या मार्फत चालणार ॲम्ब्यूलन्स आणि शववाहिनी या दोन्ही दहा दहा वर्षाच्या झालेल्या आहेत. आपल्याला जेव्हा आवश्यकता लागेल. तेव्हा प्रशासनाने ती मागवावी तर ते मागवण्याची घाई करु नये.

**मा. महापौर :-**

ठराव बहूमताने मंजूर. सचिवांनी पुढील विषय घ्यावा.

**प्रकरण क्र. ३७ :-**

शववाहिनी व रुग्णवाहिका खरेदी करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.

**ठराव क्र. १२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या सद्यास्थितीत सुमारे ८ ते ९ लाख इतकी आहे. तसेच शहराची सीमा ही मुंबई महापालिकेच्या सीमेला लागुन असल्याने शहरात नागरीकरण झपाट्याने होत आहे.

सद्यास्थितीत महानगरपालिकेकडे २ रूग्णवाहीका व २ शववाहिन्या कार्यरत आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेत ४ प्रभाग असून प्रत्येक प्रभागाकरिता एक स्वतंत्र रूग्णवाहिका असणे आवश्यक आहे. परंतु अपुऱ्या रूग्णवाहिकेमुळे नागरीकांना वेळीच सेवा उपलब्ध होत नाही व त्यांना खाजगी रूग्णवाहिकेवर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे. महानगरपालिकेची सध्याची व पुढील लोकसंख्या तसेच नागरिकरणाचा वेग पाहता नागरिकांना कोणतीही गैरसोय होउ नये म्हणून प्रत्येक प्रभागात रूग्णवाहिका व शववाहिनी उपलब्ध करणे गरजेचे असल्याने एक रूग्णवाहिका व एक शववाहिनी खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु नागरीकांच्या निवासस्थाना पासुन स्मशानभुमी दुरवर असल्याने नागरिकांना प्रेत बऱ्याच दुरवर आपल्या खांद्यावरून न्यावे लागते मृत पावलेल्या व्यक्तींचे निवासस्थान व स्मशानभुमी यामधील अंतर पाहता नागरीकांना प्रेत खांद्यावरून स्मशानभुमीपर्यंत नेणेकामी नातेवाईकांस त्रास सहन करावा लागतो तरी नागरिकांच्या सोयी करिता महापालिकेमार्फत एक प्रेतवाहू वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. त्यामुळे शववाहिनी ऐवजी प्रेतवाहु वाहन खरेदी करणे आवश्यक आहे.

प्रेतवाहू वाहन व रूग्णवाहिकेकरिता टाटा कंपनिचे अधिकृत विक्रेते यांचेकडून टाटा ४०७ एसएफसी मॉडेलची चेसिस खरेदी करून सदर चेसिसवर निविदा मागवून रूग्णवाहिका व प्रेतवाहू वाहनाची बॉडी बांधण्यास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.          अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ३८ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

आपण गोषवारा दिलेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, तत्पूर्वी मला निवेदन करायचे आहे. दि. २३/०१/२००७ रोजी मी प्रशासनाला एक पत्र दिलेले होते. मा. आयुक्त साहेबांच्या नावावर, मा. उपायुक्त साहेबांच्या नावावर, स्थायी समिती सभापती यांच्या नावाने सुद्धा पत्र होते. झोपडपट्ट्या, गलिच्छ वस्त्या, दलित वस्त्या घोषित करणेबाबतचा विषय आपण सभेपुढे घ्या. परंतु, गेल्या सहा महिन्यापर्यंत हा विषय घेतलाच नाही. तद्नंतर मागील मिटींगमध्ये "ज" चा प्रस्ताव म्हणून मला आणावा लागला. तद्नंतर आपण माझ्या प्रस्तावाचा सन्मान केला. आणि विषय पटलावर हा विषय घेतला. तर ही नैतिक जबाबदारी कोणाची होती. ह्याचा जर प्रशासनाने खुलासा केला तर चांगले होईल कारण आम्ही वारंवार आमच्या सुचना आम्ही प्रशासनाला देतो. परंतु, प्रशासन त्या सुचनांची कधीही अंमलबजावणी करावी असे त्यांना कधीही वाटत नाही तरी आपण प्रशासनाला सांगून जरा खुलासा करावा की ही झोपडपट्ट्या घोषित करण्याची कारवाई ती कोणातर्फे व्हायला पाहिजे होती. याचे प्रशासनाचे निवेदन करा.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, कमिशनर साहेब, सर्व सन्मा. सभागृह या शहरामध्ये जेव्हा दि. २८/२/२००२ ला महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर दि. ११/०८/२००२ ला निवडणूका झाल्या. तर त्याचवेळेला प्रशासनामार्फत मी एक माहिती जमा केली. आणि ज्यावेळेला २००० च्या जनगणनेप्रमाणे. २००१ मध्ये आलेल्या आकडेवारीप्रमाणे या शहराची लोकसंख्या पाच लाख वीस हजार तीनशे एक होती. त्यावेळेला शहरामध्ये झोपडपट्ट्या होत्या. मात्र ३५, ३५ झोपडपट्ट्यामध्ये २० या शासकीय जागांवरती होत्या. १४ खाजगी जाग्यांवरती होत्या. एक रेल्वेच्या जागेत होती ज्यावेळेला रेल्वेने बंदरवाडीची झोपडपट्टी काढली. त्यावेळेला शहरात झोपडपट्ट्या ३४ राहिलेल्या होत्या. त्यावेळेची लोकसंख्या होती ३८ हजार १३७ आणि झोपडयांची संख्या होती १२ हजार ८३२ आता परिस्थिती अशी आहे की, एका झोपडपट्टीतच १२ हजार झोपडया झाल्या असतील ह्याचा अर्थ प्रशासन १००टक्के आपले कर्तव्य योग्यरितीने बजावत नाही. दरवेळेला झोपडपट्ट्यांची संख्या वाढते आणि हा कोणाच्या इंटरेस्ट मध्ये विषय आला आहे की, झोपडपट्ट्यांना सुरक्षा देण्याचा दि. ०१/०१/१९९५ च्या आदीच्या झोपडपटट्या अधिकृत व्हाव्यात. मला वाटते आपल्याकडे कोणाची तरी फार इच्छा आहे की या शहरामध्ये एस.आर.ए. स्किम राबवायची आणि एस.आर.ए. स्किम राबवण्यासाठी आधी झोपडपट्ट्या घोषित केल्या पाहिजे. स्लम डिक्लेर केला पाहिजे. आणि स्लम डिक्लेर करण्यासाठी आधी असलेला "ज" चा प्रस्ताव आज प्रमुख विषयांमध्ये येतो. मा. महापौरांना या सभागृहासमोर विषय आणण्याचे अधिकार असतील. परंतु, चुकीचे विषय मा. महापौरांनी आणू नये. या शहरामध्ये संपूर्ण झोपडपट्ट्या करण्याचे आपले धोरण

आहे का? ज्या महाराष्ट्र शासनाने मुंबई मधल्या, आणि धारावी मधली सगळ्यात मोठी झोपडपट्टी आशियाची. त्याच्यामध्ये एस.आर.ए. स्किम राबवण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र शासनाने एस.आर.ए. स्किम ही पहिल्यांदा मुंबई महापालिकेमध्ये राबवण्याचा जेव्हा निश्चित केले. तेव्हा त्या खाजगी जागा आहेत त्या खाजगी जाग्याच्या मालकाकडून काही व्यापारांनी, काही नेत्यांनी जागा विकत घेतल्या आणि मग, स्लम आहे ती जागा. आमचीच आहे. त्याचा बेनिफिट जास्त घ्यायचा. आणि स्लम विकसित करायची योजना आखली. त्याच्यामध्ये सुद्धा फार मोठा घोटाळा जो निर्माण झाला. त्याची सि.बी.आय मार्फत जेव्हा चौकशी सुरु झाली. सि.आय.डी. मार्फत सुद्धा चौकशी सुरु झाली. तेव्हा ती इमारत जाळली गेली. मग, आपल्या मिरा भाईंदर साठी एस.आर.ए. ची स्टेप कधीच नव्हती. मग, एस.आर.ए, स्किम आणण्याची योजना कोणाची मग ती स्किम आणताना आपण काय निकष लावले. या शहरामध्ये १२ हजार झोपडपट्टया होत्या. त्या आता एवढया मोठया झाल्या. ज्याच्यासाठी कोस्टल, पोलिस कमिशनर एरिया असणार आहे की, त्या जागेवरती आपल्या नजेरसमोर मा. आयुक्त महोदय आपल्याला आणि आपल्या अतिक्रमणच्या विभागाला घेवून मी प्रत्यक्ष जागेवर गेलो होतो. त्यादिवशी मुंबईमधली काढलेली माती आणून तिथे भराव केला जातो. आपल्या नजरेसमोर तिथे अतिक्रमण करण्याचे काम सुरु आहे आणि आपण काहीही करत नाही. आपण जाउन फक्त तो रस्ता मोकळा केला. तिथे फक्त प्लॉस्टिकच्या गोणी लावलेल्या आहेत. कुठचेही घर पक्कं नाही आणि दररोज चार लोक तिथे बसतात. ते घर विकून झाले की पुढच्या जागेवर कार्यालयात भेटतात. पुन्हा ते घरं विकून झाले की पुढच्या जागेवर कार्यालयात हटतात. हे कुठेतरी थांबले गेले पाहिजे. महाराष्ट्र शासनाचे धोरण होते ०१/०१/१९९५ च्या आधीच्या झोपडपट्टया अधिकृत कराव्यात. त्यांनतर पुन्हा महाराष्ट्र शासनाने विलासराव देशमुखांच्या कारकिर्दीमध्ये २००२ च्या झोपडपट्टया अधिकृत होण्याचा एक प्रयत्न ही केला. परंतु, हा प्रयत्नांत कोणीतरी कोर्टात गेले. त्यामुळे हे थांबलेले आहे. इकबाल सिंग चेअर साहेबांनी कालच एक निवेदन केलेले आहे की, कुठच्याही परिस्थितीमध्ये २००२ च्या झोपडपटट्यांमध्ये एस.आर.ए स्किम राबवून देणार नाही. धारावी मधल्या त्या झोपडपट्टया २००२ नंतरच्या मी कंन्सीडर करणार नाही. म्हणून त्यांनी सांगितलेले आहे. मग, आपल्याकडे ही स्किम आणण्यामध्ये कोणाला इन्ट्रेस्ट आहे. मी तर म्हणतो की सभागृहाने आज असे ठरवायला पाहिजे की, शहरामध्ये स्लम कमी करा ना, जे स्लम आहेत. त्यांची संख्या निश्चित करा. आपल्याकडे जे फोटोपास दिलेले आहे. त्या फोटोपासमध्ये देखील कितीतरी लोकांनी बोगस फोटोपास बनवलेले आहे. त्याचा जनक कोण? त्या विषयामध्ये चर्चा व्हायला पाहिजे. तर या शहरामध्ये झोपडपट्टी वाढवण्यासाठी आपल्यातलाच कोणीतरी कारणीभूत आहे, अधिकारी तर आहेतच. पण कोण नगरसेवक आहे. ज्यांच्या माध्यमातून हा सारखा विषय येतो. आपण या योजना कोठे राबवणार आहात. कशासाठी आणि झोपडपट्टया आपण अधिकृत का करणार आहोत मग, २००१ साली सर्व्हे केलेला आहे. त्याच्यामध्ये ज्या ३५ झोपडपट्टया होत्या. मग, आपली जबाबदारी होती की रेल्वेने तोडलेल्या झोपडपट्टीच्या लोकांना आपण कुठेतरी समाविष्ट करायला पाहिजे होते. त्यांना समाविष्ट का केले नाही? म्हणजे नविन झोपडपट्टी ही आपल्या नजरेसमोर विकसित होते. तर त्याला जबाबदार कोण? माशाचा पाडयाकडे जाणाऱ्या जागेवर नविन झोपडपट्टी विकसित झाले. त्याला जबाबदार कोण? नवघर गावाच्यामागे आपले प्रस्तावित रस्ते आहेत. त्याच्यावर झोपडपट्टया होतात. त्याला जबाबदार कोण? साहेब, आपल्याला आजच्या सभागृहाच्या माध्यामातून विनंती करतो की, ह्या लोकांनी फौजदार गुन्हे दाखल करावे. गुन्हे दाखल करण्याची प्रोव्हिजन आहे. एम.पी.डी.ए. लागू करावे. झोपडपट्टीला हा कायदा लागू करावा. आपण हा कायदा का लागू करत नाही. कमिशनर साहेब, या शहराचे आपले नाते फक्त तीन ते चार किंवा सहा महिने असेल. त्यानंतर आपलं या शहराशी नाते नसेल. पण, या शहरात आम्ही जन्मलो आणि या शहरात आम्ही मरणार आहोत. मग, या शहराचा आमच्यासमोर बजबजपुरी झालेली आम्हाला चालणार नाही. आम्ही आपल्याला वारंवार विनंती करतो. आपण ह्याच्यावर एम.पी.डी.ए लागू करा. आपण चालू कधी करणार आहोत? मला वाटते आपण एक महिन्यापूर्वी कनकियाच्या पाठीमागची झोपडपट्‌टी आपण पाहून आलेलो होतो. मी सर्कलला फोन केला होता. साहेब आपल्या महापालिकेच्या रस्त्याचे कुठे खोदाईचे काम सुरु झाले. कुठे काम सुरु केले. माती उचलली तर त्याच्यावर आपण लगेच रायल्टी लावायला येता. मग, ही माती मुंबई वरुन आणतात. आणि आमच्या शहरात टाकतात. तीन-तीन टनाचा एक एक दगड आणला. एवढे मोठे दगड कॅरी करुन ज्या नवीन अधोरित पद्धतीच्या गाडया निघालेल्या आहेत. ज्याच्यामध्ये मोठी व्हेईंग कॅपेसिटी आहे. ओझे वाहून नेण्याची कॅपेसिटी आहे. अशा गाडया आणतात. तर त्याच्यावर आपण गुन्हे दाखल करत नाही. आतापर्यंत महानगरपालिकेने ह्याच्यापैकी कोणाला पत्राने कळवले का? की पोलिसांना किंवा आम्हाला की आम्हाला एवढा बंदोबस्त दया. कारण, आम्हाला एवढया झोपडया काढून टाकायच्या आहेत. मी तुम्हाला सांगितलेले की, त्या लोकांना टॅक्स लागणार नाही. ह्याची जबाबदारी देखील आपण

घ्या साहेब, उदया मिटींग होईल किंवा नाही. परंतु, आपण याबाबत आता तरी सकारात्मक तरी व्हायला पाहिजे. शहरामध्ये आमच्या गावकरांनी एखादं घर बांधायला घेतले तर आपला अधिकारी जावून तिथे दादागिरी करतो की दुरुस्तीची परवानगी आणि दोन मोठे बांधतो. इंडस्ट्रीमध्ये दुरुस्तीची परवानगी घेतली. १०,०००/- रु. भरले तर आपले अधिकारी तिथे पोहचतात. अनेक लोक तिथे पोहचतात. त्यांना विचारतात की, तुम्ही असे कसे करता. पण, ह्या झोपडया ज्या बांधतात. ह्या तर सरकारी जागेवर बांधतात ना. हे खरं अतिक्रमण आहे. ते तुम्ही काढत नाही. हे आपण कधी करणार आहोत. याबाबत चर्चा होईल ह्या सभागृहामध्ये ह्या झोपडपट्टया अधिकृत करण्यासाठी चर्चा करणे हे किती शरमेची बाब आहे. त्याच्यापेक्षा ह्या शहरात नविन झोपडपट्टया होतात त्या घालवणे गरजेचे आहे. त्या झोपडपट्टयामध्ये आज आपण सांगत असतो. बांगलादेशी, बांगलादेशी कुठे राहतात ते बघा. या शहरामध्ये चोरांचे प्रमाण वाढलेले आहे. भुरटे चोर वाढलेले आहेत ते कुठे राहत असतील चोऱ्या कोण करत असतील. असेच लोक अशाच ठिकाणी गुन्हेगार राहत असतील. दि. ०१/०१/१९९५ च्या आधीच्या शासनाचे धोरण झाले तर २००२ सालच्या झोपडपट्टया आहेत. ज्या अधिकृत व्हायच्या आहेत ते होतील. परंतु, शहरामध्ये वारंवार वाढणाऱ्या जसा एडस् वाढत चालला आहे. तशा झोपडया वाढत चाललेल्या आहेत. याला कुठेतरी रोकधाम झाली पाहिजे. या महापालिकेतला कोणी नगरसेवक त्यांच्या झोपडपट्टया वाढवायला जात नाही. शहरामध्ये काही दोन-तीनच नावे आहेत. त्यांच्यावर पण गुन्हे दाखल करा. मोर्चे करणाऱ्यांवर पण गुन्हे दाखल करा. कोणाला घाबरण्याचे काही कारण नाही. आम्ही असे गुन्हे दाखल करायला गेलो तर आमच्यावर कसल्या कसल्या प्रकारचे गुन्हे दाखल होत असतील आजमिन पात्र गुन्हे दाखल करतो. पण अधिकाऱ्यांवरती अजूनपर्यंत आजमिन पात्र गुन्हे दाखल होत नाही. अधिकारी कर्तव्यगार असतो. आणि आपण या शहराचे पालक आहात. आपल्याकडे सुप्रीम ऑथोरिटी आहेत. आपण हे निर्णय घेतलेच पाहिजे. ह्या झोपडपट्टया अधिकृत करायच्या. तिथे एस.आर.ए. स्किम राबवायची. ज्यांनी आणले असेल. त्यांच्या माहितीसाठी एस.आर.ए. स्किम मिरा भाईंदरसाठी लागू नाही आणि ती लागू करण्यासाठी झोपडपट्टी घोषित करणे गरजेचे आहे. परंतु, त्या करणेच्या भानगडीत न पडता. उलट झालेल्या फोटोपासची चौकशी झाली पाहिजे. असे माझे मत आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, आपल्या परवानगीने बोलू इच्छितो. मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये सन्मा. उपमहापौर यांनी झोपडपट्टी विषयी जो आढाव घेतला. ज्या झोपडपट्टया म्हणजे १९९५ च्या आहेत. ते अधिकृत आहेत आणि त्या अधिकृत करण्यासाठी ज्या पद्धतीने त्यांनी ह्या ठिकाणी आपले म्हणणे मांडले. खरतर या सभागृहामध्ये आम्ही सुद्धा जितके जबाबदार आहेत. जेवढे अधिकारी जबाबदार आहेत. आता आमचे सन्मा. सदस्य बोलतील की, आम्ही जबाबदार नाही.

**रतन पाटील :-**

कसे काय? आम्ही वेळोवेळी विरोध केलेला आहे. आम्ही करणार नाही. सत्ताधारी जबाबदार आहे असे आपण म्हणा. शब्द मागे घ्या. आम्ही आधी म्हणतो की, १९९५ नंतरच्या झोपडपट्टया उध्वस्त करा.

**मोहन पाटील :-**

साहेब, १९९५ नंतरच्या झोपडपट्टया उध्वस्त करा. परंतु, १९९५ नंतरच्या ज्या झोपडया आहेत. त्यानंतर २००२ चे झोपडपट्टयांवर पण १९९५ लिहिले आहे.

**रतन पाटील :-**

स्थायी समितीने हाच ठराव केला की, त्यांचे फोटोपास चेक करा.

**मोहन पाटील :-**

आम्हांला हे सांगायचे आहे की, १९९५ च्या नावाखाली २००० ची झोपडपट्टी नोंदली गेलेली आहे. तर याची संपूर्णपणे सविस्तर माहिती काढल्ी पाहिजे. ह्याचा कुठेतरी अंत केला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

पाटील साहेब, ही तुमचीच कमाई आहे. असे जाहिर करुन पुढचे बोला.

**मोहन पाटील :-**

आम्ही आमचे आपत्य म्हणतो. गोरगरिबांकडे बघायचे ते आमचे आपत्य आहे आम्ही मानू. परंतु, १९९५ च्या नावाखाली ज्या पद्धतीने जे फोटोपास दिले. त्याचा संपूर्ण सर्व्हेक्शन व्हायला पाहिजे. त्याच्याशिवाय ह्या पुढच्या गोष्टी एस.आर.ए. वगैरे नंतर आलेल्या आहेत. परंतु, ज्याला वाटेल मनामध्ये टॅक्स लावा. टॅक्स कशाला लागला. आपल्या अधिकारी गेले टॅक्स लावले. तेव्हा त्यांना कळलं नाही की, ही झोपडपट्टी कधी बांधलेली आहे. त्याच्यामध्ये संपूर्णपणे नोंद केलेली आहे. आता आम्ही ह्याच्या पलिकडे तुम्हाला बोलू शकतो. त्याच्या भागाचे क्षेत्रिय अधिकारी आहेत. त्यांना संपूर्ण माहिती आहे. की

आपल्या शहरामध्ये आपल्या कोणत्या क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकाम होते. कुठे झोपडी उभी राहते. त्याला टॅक्स लागला जातो. त्याला कुठे सुविधा दिली जाते. हा विचार कधी केला का? आता एस.आर.ए. स्किम येईल किंवा नाही. हा विषय नंतरचा आहे. परंतु, आपण जे केलेले आहे. मा. उपमहापौर साहेब, आपण बोलतात की, आपण जे केले त्याच्यावर लक्ष घालणे प्रकाश ज्योत टाकणे फार जरुरी आहे. कारण १९९५ पासूनच्या नावाखाली ज्या सर्व झोपडपट्टया आहेत. १९९६-९७-९८-९९ ते २००७ पर्यंत त्या झोपडपट्टया आहेत. त्याही १९९५ मध्ये समावेश झालेला आहे. असे काही दाखले त्याठिकाणी आहेत. त्याचे सर्व्हेक्षण होणे फार जरुरी आहे. ते पण सर्व्हेक्षण करा त्याच्यानंतर एस.आर.ए स्किम करा. एस.आर.ए स्किम करणे हा विषय नंतरचा आहे. कारण, मुंबईमध्ये एस.आर.ए स्किम केली. परप्रांतीय लोटे थांबवा ही एस.आर.ए स्किम केली तर अनभिक्त झाला. मग, अडिच एफ.एस.आय. चा झाला तर त्याला पाणी पाहिजे. गटार पाहिजे, रस्ते पाहिजे, ह्या अन्य गोष्टी पाहिजे. मग, त्या गोष्टी आपल्याकडे नसतात आणि ते जर उभे केले तर त्याला माणसं पाहिजे. म्हणजे या शहरात हा पण धोका आहे. जर एस.आर.ए करायचे. तर आपल्याकडे पाण्याची सुविधा किती आहे? आपल्याकडे रस्ते किती आहे? आपल्याकडे गटाराची योजना कुठे आहे? मघाशी आपण चर्चा केली. त्या चर्चेमध्ये एस.टी.पी. प्लान बाबत चर्चा केली. बुझलेली गटार नाही. प्लॅन टाका. पाणी सोडायचे कुठे? पाणी सोडायला जागा नाही. म्हणजे या शहरातल्या विकास कर्त्यांनी या गोष्टीवर विचार केला पाहिजे. नंतर एस.आर.ए स्किम चा विचार करु. जेणेकरुन अडिच एफ.एस.आय. जेव्हा एका ठिकाणी होईल त्यावेळी असलेली लोकसंख्या समोर येणारी लोकसंख्या आणि जी अडिज एफ.एस.आय मुळे येईल ती एक्स्ट्रा वाढेल ती लोकसंख्या त्या संपूर्ण प्लॅनला नियोजन केले पाहिजे. तेव्हा हा विषय पुढे आपण आणला पाहिजे. मी सर्वस्व जबाबदारी तुमच्यावर टाकतो हा विषय नाही. परंतु, ती जबाबदारी आपली आहे. त्याला नाकारुन टाकता येणार नाही. म्हणून १९९५ पर्यंत आपण जे फोटोपास दिले. त्याचे सर्व्हेक्षण परिपूर्ण करा. नंतर हे करा. झोपडपट्टया होतात. आपण थांबवू शकत नाही. कारण, मा. उपमहापौर साहेबांनी सांगितले की, जेव्हा प्रथम झोपडपट्टया जेव्हा निर्माण झाल्या. त्यावेळी ३५ झोपडया होत्या. आज भरपुर झोपडया झालेल्या आहेत. म्हणून ते थांबवण्याचा प्रयत्न करा. ज्या आहेत त्यांना सुविधा दया. मग, प्रश्न येत नाही. मग, १९९५ च्या आतमध्ये आहेत त्यांना सुद्धा दयायच्या नसतील तर ते आताच काढा. नाहीतर पुन्हा काढता येणार नाही. म्हणून या शहराला आणखिन कुठेतरी नविन अर्थकारण की त्याला नविन पैसा लागेल. याची चिंता करण्यापेक्षा आपण आज आळा घातला तर उदया शहराचा विकास चांगला होउ शकतो. धन्यवाद.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बोलते मला तरी असे वाटते की, बऱ्याचशा नगरसेविका आणि नगरसेवक या ठरावाच्या बाजूने आहेत. पण ते बोलू शकत नाही. सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब आता जे बोलले ते बरोबर बोलले. मॅडम, मा. उपमहापौर साहेब बोलले की, झोपडपट्टीमध्ये काही अतिरेकी राहतात. एवढयाशा झोपडयामध्ये अतिरेकी काय करणार. बॉम्ब काय झोपडपट्टीमध्ये लपवणार म्हणजे काय बोलायचे त्याचे भान आहे का?

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते. १९९५ पूर्वीच्या ज्या झोपडपट्टया आहेत त्या फक्त ठेवाव्यात असा आपला येथे विषय चाललेला आहे. ज्या झोपडया १९९५ नंतरच्या असतील त्या काढून टाका.

(सभागृहात गोंधळ.)

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा़ उपमहापौर चंद्रकांत वैतीजी यांनी सविस्तर माहिती आपल्याला दिली आणि जे वक्तव्य त्यांनी केले. त्या वक्तव्याशी मी सहमत आहे. चारच दिवसापूर्वी स्थायी समितीमध्ये मी हा विषय अतिशय उत्कृटपणे मांडला होता. आणि या विषयावर निश्चितच आपण गंभीर राहिले पाहिजे. मी आपल्याला सांगितले की, नवघर स्मशानाच्या पाठीमागे जी नविन झोपडपट्टी झालेली आहे. आणि हि गोष्ट कुठल्याही तऱ्हेने लपून राहिलेले नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांच्याकडे त्या संबंधित टेप असावी. अशी माझी खात्री आहे. नाहि तर शुटींग असावी. कारण, त्यांच्या एका कार्यक्रमामध्ये त्या गोष्टीची शुटींग केलेली आहे. सचिव साहेबांना ते माहित आहे की तिकडे ती झोपडपट्टी नव्हती. मी ज्यावेळेस या विषयावर स्थायी समितीमध्ये बोललो आणि तीन दिवसापूर्वी आपल्याकडे मी पत्र ही दिलेले आहे. तेव्हा आपण आपल्या अधिकाऱ्यांना बोलवले आणि त्यांना फोटोपास दिले असे आपण सांगितले म्हणजे खोटे केले ते आपणच तिकडे मान्य केले की, आपल्या अधिकाऱ्याने २००२ साली जी झोपडपट्टी नव्हती. त्या झोपडपट्टीला आपण फोटोपास दिलेले आहे. आता या अधिकाऱ्यांवर आपण

काहीच कारवाई करणार नाही. कारण ते आपले अधिकारी आहे देणारे गेले. त्यातले काही अजून खालचे अधिकारी आहेत की, ज्यांच्या माध्यमातून फाईल वर वर चढत गेली. या सभागृहाला मी सांगू इच्छितो झोपडपट्टी बद्दल बऱ्याच जणांना प्रेम आहे. माझ्या प्रभागामध्ये झोपडपट्टीमध्ये आहे. माझ्या प्रभागामध्ये तीन झोपडपट्टया आहे. मघाशी बोलता बोलता कोणी सांगितले की, सत्ताधारीपक्ष झोपडया निर्माण करतो. कोणीही सत्ताधारी पक्ष कधीही करत नाही. कुठल्याही सत्ताधारी पक्षाला झोपडपट्टी निर्माण करणे हे आवड नाही. सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब लक्षात घ्या. आणि आपल्या माहितीसाठी मी सांगतो. की गोर्वधनच्या एका झोपडपट्टीला सेनानगर हे नाव आहे. आपण ही गोष्ट विसरु नका. सेनानगर हे विशिष्ट कोणाचे नाव नाही. तर सेनेच्या व्यक्तीने ती झोपडपट्टी बनवली म्हणून त्या झोपडपट्टीला सेनानगर हे नाव दिले. इंदिरा नगर झोपडपट्टी, आंबेडकर नगर झोपडपट्टी तिकडे लागणारे झेंडे त्या त्या काळामध्ये पक्ष निर्माण होतात किंवा सत्तेवर त्यांचे झेंडे तुम्ही लावले जातात. आपल्या स्वार्थासाठी ते झोपडपट्टी लावले जातात. त्यात आणखिन एक महत्त्वाचा भाग असा आहे की, आपला अर्धा बजेट या झोपडपट्टयांसाठी जाते. ह्यातले अतिशय महत्त्वाचे भाग आहे. आपण ही गोष्ट लक्षात घेत नाही. आपण त्यांना संडास देतो, रस्ते देतो, लाईट देतो. आणखिन काय काय देतो. मी तर एवढं कंटाळलो कारण मी सकाळी चहा पित असताना कार्यकर्ते येतात आणि सांगतात की, दादा तिकडचे संडास चोकस झालेले आहे. म्हणजे कुठली गोष्ट कधी सांगायची. हे सुद्धा त्यांना कळत नाही. त्यांच्या एकूण एक गोष्टीकडे आपल्याला लक्ष दयावे लागते. कारण त्यांच्या झोपडपट्टीचे नाव हे आपल्या मतदार यादीमध्ये आहे. त्यांचे नाव मतदार यादीमध्ये आहे. आमची कठीण परिस्थिती असते. या गोष्टीचा विचार सगळ्यांनी केला पाहिजे. की प्रामाणिक पणे कर भरणाऱ्या नागरिकांना आपण काय देतो? मघाशी जेसलपार्कचा विषय झाला. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी तिकडे अतिशय चांगले विचारले की, आपल्या महापालिकेचे आर्थिक नुकसान या मलःनिसारण केंद्र जर आपण आपल्या ताब्यात घेतले आणि ६ रु. दराने जर लावले त्यांचा विषय अतिशय चांगला होता. परंतु, जेसलपार्क लोकांना पण आपण काय दिलेले आहे. त्यांना गटार नाही. त्यांना आपण जी गटार दिलेले आहे. ते कधीही खराब झालेले नाही. त्यांना सुलभ शौचालय नाही. कुठलेही सार्वजनिक शौचालय दिलेले नाही. म्हणजे आपल्या महापालिकेचा फंड अतिशय चांगल्या ठिकाणी आपण वापरतो. आणि त्याच्या कितीतरी पटीने आपला जास्त फंड झोपडपट्टयांमध्ये जातो. या गोष्टीसाठी विचार केला जातो. मग कोणाला झाडुवाला घरी लागतो किंवा कपडे धुवायला बाई लागते. तो विषय होत नाही. या शहरातल्या किती लोकांना किती माणसं लागणार आहे. हा ही विचार आपण केला पाहिजे. प्रत्येकाच्या घरामध्ये कपडे धुवायला बाई नाही आणि असले तरी किती लागणार आहे. प्रचंड प्रमाणावर या शहरामध्ये झोपडपट्टीची वाढ चाललेली आहे. या शहराचे सौंदर्य नाहीसे होत चाललेले आहे. ह्या गोष्टीचा विचार ह्या नगरसेवकांनी केला पाहिजे. आपण गांर्भियाने करायला पाहिजे आणि ज्याप्रमाणे मा. उपमहापौर साहेबांनी सांगितले की, जे नविन झोपडी बनवतात. झोपडपट्टीत ''दादा'' निर्माण झालेले आहे. विचार करा आणि त्यांना कुठल्या फौजदारी केस खाली अडकवता येईल याचे साहेब आपण गांर्भीयाने विचार करा. मला माहित आहे की, जशी आमची मुदत सपंलेली आहे. तशी आपलीही मुदत लवकर संपते किंवा आपली मुदत संपण्याच्या अगोदर काहीतरी ठोस आम्हाला दाखवा. तरच आपलं नाव आम्ही आपण गेल्यानंतर काढू. एवढीच आपल्याला खात्री देतो.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य जयंत दादा यांच्या विषयाशी संबंधित विषय आहे. त्यांनी फार चांगले मुद्दे मांडले. परंतु, काही कदाचित राहिले असेल हे मला माहित नाही. परंतु, त्यांच्या वॉर्डात जी झोपडपट्टी आहे. जेसल पार्कवरुन घोडबंदरला जाणारा प्रस्तावित रस्ता डी.पी. रोड, हा तिथे सगळा ब्लॉक झालेला आहे. तुम्ही त्या झोपडया हटवणार आहात. भविष्यामध्ये तुम्हाला सुभाषचंद्र बोस येथे तो प्रश्न तुमच्या भविष्यामध्ये इंदिरानगर येथे उभा राहणार आहे. त्याच्या बाबतीमध्ये आपल्याकडे काही उपाययोजना आहे. साहेब मी तुमच्या निदर्शनास आणते. तुमचा एक माणूस पहिल्या माळ्यावर तुमच्याकडे आठवडयाची नोटींग करायला ठेवा. ती झोपडपट्टीतील किती जागा तुमच्या सुवर्ण जयंती मध्ये हजर असतात. तुम्ही आठवडयाचा रेकॉर्ड ठेवा आणि त्याच्यावर रुलिंग दया. तुमचा माणूस तिथे ठेवा. कदाचित ते अधिकारी ऐकत असतील. आम्ही डायरेक्ट अधिकाऱ्यांना बोलतो तर त्यांना वाईट वाटते. परंतु, आमच्यावर निरिक्षण आहे की, तुमचा एक अधिकारी आणि चार अधिकारी हेच कामे करतात. आणि त्यांच्या भवती त्याच लोकांचा गोंधळ असतो. तुमचा एक फोटोपास किती ठिकाणी चालत असतो. इंदिरा नगरमध्ये पण तोच चालतो. आणि बाजूला झालेल्या झोपडपट्टीत पण तोच चालतो. हे प्रकरण किती दिवस चालणार आहे. शहराच्या विकासाच्या दृष्टीने ह्या गोष्टी कुठेतरी थांबल्या पाहिजे. आणि पाहिली गोष्ट मी हे सांगते की, जेसलपार्कचा जो डी.पी. रोड आहे तो खाली

करा. त्यांनी मघाशी चांगली लक्षवेधी आणलेली त्याच्याअगोदर सन्मा. सदस्य मदनसिंग यांनी चांगली लक्षवेधी आणलेली त्या लक्षवेधीचे पुढे काय झाले ते मला माहित नाही.

**नगरसचिव :-**

सभेच्या कामकाजाची वेळ झालेली आहे. सभागृहात ७ वाजलेले आहे.

**मा. महापौर :-**

हा विषय पुढे कंटिन्यू चालू राहिल. ही सभा तहकूब होत आहे.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सायं :- ७.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**